# जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ अमरावती, ■ सोमवार १० ऑगस्ट २०२६ ■ मूल्य ४.०० ■ पृष्ठे १०







देवदर्शनावरुन परतताना काळाचा घाला!

## धारमध्ये भीषण अपघात, ६ मित्रांचा जागीच मृत्यू



**धार /वृत्तसंस्था-** मध्य प्रदेशातील धार जिल्ह्यात बदनावर-उज्जैन फोरलेन हायवेवर रविवारी एक भीषण अपघात झाला. या अपघातात सहा तरुणांचा जागीच मृत्यू झाला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, दुपारी एकच्या सुमारास पंचकवासा गावाजवळ हा अपघात झाला. एका भरधाव आणि अनियंत्रित ट्रकने समोरून येणाऱ्या इको व्हॅनला जोरदार धडक दिली. धडक इतकी भीषण होती की व्हॅनचा अक्षरशः चक्काचूर झाला.

या अपघातात व्हॅनमध्ये प्रवास करणाऱ्या सहाही तरुणांचा जागीच मृत्यू झाला, तर एक तरुण गंभीर जखमी झाला आहे. जखमी तरुणाला उपचारासाठी बदनावर येथील नागरी रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. व्हॅनमधील सर्व तरुण गुजरातच्या वडोदरा येथील रहिवासी होते.

उज्जैन येथे भगवान महाकालचं दर्शन घेऊन ते व्हॅनने गुजरातला परतत होते. त्याच वेळी समोरून रॉंग साईडने येणाऱ्या ट्रकने त्यांच्या व्हॅनला धडक दिली. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तात्काळ ☞(पान २ वर)

# 'जो खेलेगा, वो खिलेगा'

## PM मोदींनी क्रीडापटूंना दिला मंत्र

### CWG मधील ऐतिहासिक कामगिरीनंतर पदकविजेत्या खेळाडूंची खास भेट

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था-** कॉमनवेल्थ गेम्स २०२६ (राष्ट्राकुल क्रीडा स्पर्धा) मध्ये भारतीय ॲथलीट्सच्या शानदार आणि ऐतिहासिक कामगिरीनंतर देशभरात उत्साहाचे वातावरण आहे. क्रीडांगणावर भारताचा तिरंगा फडकवून परतलेल्या भारतीय पथकाचे अत्यंत दिमाखात स्वागत करण्यात आले. रविवारी भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी कॉमनवेल्थ गेम्स २०२६ मधील पदकविजेत्या खेळाडूंची आपल्या निवासस्थानी भेट घेतली आणि या ऐतिहासिक यशाबद्दल त्यांचे अभिनंदन केले. पंतप्रधान मोदींनी खेळाडूंचा उत्साह तर वाढवलाच शिवाय त्यांच्यासोबत घालवलेल्या आठवणींचा एक सुंदर व्हिडिओही सोशल मीडियावर शेअर केला.

पंतप्रधानांच्या अधिकृत 'एक्स' अकाऊंटवरून शेअर केलेल्या व्हिडिओमध्ये भारतीय खेळाडूंचा उत्साह ओसंडून वाहत होता. व्हिडिओची सुरुवात महिलांच्या ५१ किलो वजनी गटात भारताला सुवर्णपदक मिळवून देणारी स्टार बॉक्सर साक्षी चौधरीने केली. साक्षीने आनंद व्यक्त करताना सांगितले, हॅलो फ्रेंड्स, मी साक्षी चौधरी... आज आम्हा सर्व कॉमनवेल्थ गेम्स पदकविजेत्यांना आदरणीय पंतप्रधान सरांनी आपल्या निवासस्थानी आमंत्रित केले आहे. या गोष्टीचा आम्हा सर्वांना अत्यंत अभिमान वाटत आहे.



पंतप्रधानांना भेटून आम्हाला खूप आनंद झाला, त्यांचा स्वभाव अत्यंत साधा आणि नम्र आहे.

भेटदरम्यान पंतप्रधान मोदी यांनी खेळाडूंशी संवाद साधताना देशात क्रीडा संस्कृतीला चालना देणारा आपला प्रसिद्ध मंत्र पुन्हा एकदा दोहराला. पंतप्रधान मोदी यांनी हसतमुखाने सांगितले, जो खेलेगा, वो खिलेगा... ऑलवेज चियर फॉर भारत! संवादाच्या शेवटी पंतप्रधान आणि सर्व खेळाडूंनी एकमुखाने 'भारत माता की जय'चा जयघोष केला, ज्यामुळे वातावरण देशभक्ती आणि अभिमानाने भरून गेले.

**मेडल टॅलीमध्ये भारताची दणदणीत कामगिरी**

कॉमनवेल्थ गेम्स २०२६ मध्ये भारतीय पथकाने एकूण ३९ पदके जिंकून जगभरात आपल्या क्रीडा कौशल्याचा डंका वाजवला. भारताच्या खात्यात १३ सुवर्ण, १७ रौप्य आणि ९ कांस्य पदके जमा झाली. या उत्कृष्ट कामगिरीच्या जोरावर भारत पदकतालिकेत चौथ्या स्थानावर राहिला. भारताच्या ३९ पदकांमध्ये ☞(पान २ वर)

## दिल्लीत उद्या खासदार मोदींना भेटणार, इकडे मुख्यमंत्री फडणवीस आणि जयंत पाटलांचा एकत्र प्रवास

### राजकीय चर्चांना उधाण, हर्षवर्धन सपकाळ यांचा टीका

**नाशिक :** राज्याच्या राजकारणात गेल्या काही महिन्यात मोठ्या राजकीय घडामोडी घडल्या असून ठाकरेंच्या सहा खासदारांनी एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेत प्रवेश केलाय. त्यानंतर, शरद पवारांची राष्ट्रवादी काँग्रेस देखील सत्तेसोबत जाणार असल्याची चर्चा आहे. त्यातच, शरद पवारांचे (NCP) सर्वच खासदार उद्या १० ऑगस्ट रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदींची भेट घेणार आहेत. मात्र, ही भेट विविध प्रश्नासंदर्भाने असल्याचं सुप्रिया सुळे यांनी स्पष्ट केलंय. त्यातच, दुसरीकडे राष्ट्रवादीचे वरिष्ठ नेते जयंत पाटील यांनी आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासमवेत एकाच विमानाने मुंबई ते



कोल्हापूर प्रवास केल्याने अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. आता, या विमानप्रवासावर काँग्रेसने प्रतिक्रिया दिली आहे.

काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी जयंत पाटील यांचा फडणवीसांसोबतचा प्रवास आणि राष्ट्रवादीच्या खासदारांची मोदी भेट, यावर भाष्य केलं. समाज स्वास्थ्याच्या दृष्टिकोनातून ते योग्य नाही. एकाच विमानात प्रवास करणं, एकाच व्यासपीठावर बसणं, एकाच बसने जाणं अशी आपली एक परंपरा आणि संस्कृती राहिलेली आहे. मात्र, भाजपने पैसे आणि सत्ताच्या माध्यमातून गुंडागर्दीच्या माध्यमातून या आपल्या जुन्या आणि ☞(पान २ वर)

मनोज जरांगे पाटलांची बावनकुळेंवर व्यंगात्मक टीका

## हडप्पा संस्कृती अन् अजंठा लेणीप्रमाणे दिसणारा प्राणी



**सोलापूर/वृत्तसंस्था- :** मराठा आरक्षणाचे उपोषणकर्ते मनोज जरांगे पाटील यांनी संध्या मराठा आरक्षण आणि जात प्रमाणपत्र रद्द संदर्भाने दौरा करत आहेत. कालपासून ते सोलापूर दौऱ्यावर असून आज पंढरपुरातूनही त्यांनी राज्यातील सत्ताधारी नेत्यांवर हल्लाबोल केला. यावेळी, भाजप नेते तथा मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्यावरही टोकाची टीका केली. बावनकुळे हे नाव कधी ऐकलंच नाही, मुळव्याध ऐकलं आहे. आमचं कुळ तर ९६ कुळ आहे, हे बावनकुळ कुठनं काढलं. बावनकुळे प्राणी असा विचित्र दिसतो. पूर्वीच्या हडप्पा संस्कृतीमधील मोहानजोदाडो प्रमाणे व अजंठातील लेणीप्रमाणे हा माणूस दिसतो, अशा शब्दात मनोज जरांगे पाटील यांनी पुन्हा एकदा चंद्रशेखर बावनकुळे यांच्या व्यंगावर लक्ष केले.

पंढरपूर तालुक्यातील सरकोली येथे आज जरांगे पाटील यांची सभा झाली. यावेळी जरांगे पाटील यांनी बावनकुळे यांच्यावर टीका केली, हडप्पा संस्कृती व अजंठा लेणीप्रमाणे बावनकुळे हा प्राणी दिसतो, तुम्हाला तुमचा नेता प्रिय असेल पण आमची जात आमचा बाप आणि समाज हाच पक्ष असल्याचे जरांगे पाटील यांनी म्हटले. आपण वर्षभर मुंबईतील आंदोलनापासून फडणवीस यांच्यावर बोललो नाही. पण, बावनकुळे जर आमची प्रमाणपत्र रद्द करणार असेल तर आम्ही बोलू. तुम्हाला तुमचा नेता प्रिय आहे. पण आमची जात, आमचा बाप, तर समाज आमचा पक्ष आहे. आम्हाला दुसरे कोणी मोठे नाही, असे म्हणत मनोज जरांगे पाटील यांनी बावनकुळे यांना पुन्हा एकदा ☞(पान २ वर)

## कामचुकार अधिकारी-कंत्राटदारांवर नितीन गडकरींकडून कारवाईचा हातोडा

**नागपूर/प्रतिनिधी :** - शहरातील खोदलेल्या खड्ड्यांबाबत जनतेत नाराजी असताना केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी यासंदर्भात कठोर भूमिका घेतली आहे. खोदलेले रस्ते न बुजविणाऱ्या कंत्राटदारांना ब्लॅक लिस्ट करण्यात यावे तसेच कामात हलगर्जी करणाऱ्या अधिकाऱ्यांना निलंबित करा, असे आदेश त्यांनी रविवारी दिले. नागनदी प्रकल्प, अतिक्रमणानंतरचे पुनर्वसन आणि



शहरातील विविध विकासकामांचा आढावा घेण्यासाठी झालेल्या बैठकीत गडकरी यांनी अधिकाऱ्यांना धारेवर धरले. लोकमतने यासंदर्भात वृत्त प्रकाशित करीत सरकार आणि महापालिका प्रशासनाचे लक्ष वेधले होते. ☞(पान २ वर)

## आता, २५ हजारांच्या नोकरीसाठी बोगस परीक्षा

### संभाजीनगरमध्ये हजारो उमेदवारांची फसवणूक, विद्यार्थी संतप्त

**संभाजीनगर /वृत्तसंस्था- :** वैद्यकीय प्रवेशासाठी महत्त्वाची आणि अनिवार्य असलेल्या NEET परीक्षेचा पेपर फुटल्यानंतर देशभरातून संताप व्यक्त करण्यात आला. त्यानंतर, जंतरमंतरवर झालेल्या आंदोलनात देशभरातील तरुणाईचा सक्रीय सहभाग पाहायला मिळाला. मात्र, अद्यापही परीक्षा आणि नोकरी वरुन उमेदवारांची फसवणूक



सुरूच असल्याचे दिसून येत आहे. विशेष म्हणजे, सीजेपीचं नेतृत्व करणाऱ्या अभिजीत दीपकेंच्या संभाजीनगरमध्ये नोकरीच्या आमिषाने हजारो युवकांची फसवणूक झाल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. विमानतळावर आकर्षक नोकरी देण्याचे आमिष दाखवत एका खासगी कंपनीने महाराष्ट्रातील हजारो सुशिक्षित बेरोजगारांना गंडा घातल्याचा आरोप करण्यात येत आहे. शासकीय भरतीप्रमाणेच पारदर्शक प्रक्रिया असल्याचा देखावा निर्माण करून प्रत्येक विद्यार्थ्याकडून ५०० ते ७०० रुपयांची फी उकळण्यात आली. महिन्याला २५ हजार रुपयांचा पगार आणि विमानतळावरील झगमगीत नोकरीच्या आमिषाला बळी पडत राज्यभरातील शेकडो विद्यार्थी आज छत्रपती संभाज नगरच्या उस्मानपुरा येथील एका शाळेत पोहोचले, पण आपली फसवणूक झाल्याचा दावा ☞(पान २ वर)

## विवाह जुळवणाऱ्या ॲपवरील माहितीचा गैरवापर, तरुणीला लाखोंचा गंडा

**ठाणे /प्रतिनिधी :** ठाण्यातील ३३ वर्षीय तरुणीची, विवाह जुळविणाऱ्या ॲप्लिकेशनवरून घेतलेल्या माहितीचा गैरवापर करून, दीपू धाकरे या भामट्याने आठ लाख २७ हजारांची फसवणूक केल्याचा धक्कादायक प्रकार उघड झाला आहे. कोपरी पोलिसांनी फसवणुकीचा गुन्हा दाखल केला असून, आरोपीचा शोध सुरू आहे, अशी माहिती रविवारी दिली. ठाण्यातील कोपरी कॉलनी भागात राहणारी ही ३३ वर्षीय तरुणी मुंबईतील बँकेत नोकरी करते. तिने विवाह जुळविणाऱ्या शादी डॉट कॉम या अप्लिकेशनवर नोंदणी केली होती. याअप्लिकेशनवरील माहिती घेऊन दीपू धाकरे असे स्वतःचे नाव सांगणाऱ्याने आपण आर्किटेक्ट असल्याचा दावा केला. मात्र, अपेक्षित स्थळ नसल्याने तिने त्याच्याशी बोलणे थांबवले. त्यावर आपण मित्र राहून बोलू, शकतो, अशी गळ त्याने घातली. त्यानंतर व्हॉट्सअपवर मेसेज आणि ☞(पान २ वर)

## भाजपा आमदाराचा व्याही निघाला लखोबा

### ओळख लपवून २५ महिलांशी लग्न, कोट्यवधींची फसवणूक

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था-** भाजपाआमदाराच्या व्याह्याने ओळख लपवून २५ महिलांशी लग्न केल्याची तसेच कोट्यवधी रुपयांची फसवणूक केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. अनुज त्रिवेदी असं आरोपीचं नाव असून, आता त्याचे व्याही असलेले भाजपाचे सीतापूर येथील आमदार ज्ञान



तिवारी यांनीही त्याच्याविरोधात तक्रार नोंदवली आहे. ज्ञान तिवारी यांनी अनुज त्रिवेदीविरोधात फसवणुकीसह एकूण ७ आरोपांखाली तक्रार नोंदवली आहे. सीतापूर येथील भाजपा आमदार ज्ञान तिवारी यांनी दोन वर्षांपूर्वी त्यांची मुलगी डॉ. प्रज्ञा तिवारी हिचं लग्न अनुज त्रिवेदी यांचा मुलगा प्रखर त्रिवेदी याच्यासोबत लावून दिलं होतं. दरम्यान, ज्ञान तिवारी यांनी आपल्या तक्रारीत म्हटलं आहे की, १४ फेब्रुवारी २०२४ रोजी सीतापूरमधील मिश्रिख परिसरातील चंद्रावल येथील रहिवासी असलेल्या अनुज त्रिवेदी यांचा मुलगा प्रखर याच्यासोबत माझ्या मुलीचं लग्न झालं होतं. या विवाह ☞(पान २ वर)






## कौटुंबिक वाद विकोपाला, सख्या चुलतभावानेच संपवलं भावाला

**अकोला/प्रतिनिधी :** जिल्ह्यात धक्कादायक घटना घडली आहे. बाळापूर पोलीस स्टेशन हद्दीतील निंबी मालोकार येथे दोन सख्या चुलतभावामध्ये झालेला वाद जीवघेणा ठरला आहे. गोळीबारात एकाचा मृत्यू झाला आहे. अमोल मालोकार असं मृतक व्यक्तीचे नाव आहे. तर अजय मालोकार असं आरोपीचं नाव असल्याची माहिती मिळत आहे. दरम्यान, पोलिस सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, कौटुंबिक वादातून ही हत्या झाल्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. याबाबत पोलिस अधिकचा तपास करत आहेत.

शेतीच्या वादातून एका युवकाची गोळ्या झाडून हत्या केली. एक नव्हे तर ३ ते ४ गोळ्या झाडून युवकाला जागीच ठार केलं आहे. अमोल गजानन मालोकार असं हत्या करण्यात आलेल्या युवकाचे नाव आहे. दरम्यान, मृत अमोल मालोकार याच्याचं दूरच्या चुलत भावानेचं गोळ्या झाडून हत्या केल्याचं बोलल्या जाते. अकोला शहरापासून १० किमी अंतरावर असलेल्या 'नींबी मालोकार' गावात ही घटना घडली. आज सायंकाळच्या सुमारास निंबी मालोकार शेतशिवारात अमोलच्या





कानामध्ये आणि इतर ठिकाणी गोळ्या झाडून हत्या करण्यात आली आहे. मात्र, शेतकरी कुटुंबात संपत्तीचा वाद थेट जीवावर बेतल्याची घटना घडल्याने एकच खळबळ उडाली आहे. मृत अमोल गजानन मालोकार याची हत्या त्याच्याचं चुलत भाऊ अजय नामक व्यक्तीने केल्याचे बोलले जाते. अजय याच्यावर सध्या पोलिसांना संशय आहे, घटना घडल्यापासून तो फरार आहे. घटनेची माहिती मिळतात वरिष्ठ पोलीस अधिकारी निंबी मालोकार गावात दाखल झाले आहे. गोळीबार करणाऱ्या आरोपीच्या शोधार्थ पोलिसांकडून चार पथक गठीत करण्यात आले. लवकरच आरोपीला अटक करण्यात येईल, असं आश्वासन अकोल्याचे पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांनी मृत कुटुंबीयांच्या नातेवाईकांना दिलंय. दरम्यान, या प्रकरणात बाळापुर पोलीस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल ☞(पान २ वर)

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# थिलोरीत वार्ड क्रमांक ४ मध्ये घाणीचे साम्राज्य!
## नाल्या तुडुंब, पावसाळ्यात नागरिकांचे आरोग्य धोक्यात

**खल्लार/प्रतिनिधीः-** थिलोरी ग्रामपंचायत अंतर्गत येणाऱ्या दलित वस्ती वार्ड क्रमांक ४ मध्ये स्वच्छतेचा बोजवारा उडाला असून, ठिकठिकाणी घाणीचे साम्राज्य निर्माण झाले आहे. परिसरातील नाल्या तुडुंब भरल्याने सांडपाणी रस्त्यावर वाहत असून, नागरिकांना दुर्गंधी आणि अस्वच्छतेचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे नाली आहे की नाही, अशी परिस्थिती परिसरात निर्माण झाली आहे.



सध्या पावसाळ्याचे दिवस सुरू असून नाल्यांमध्ये साचलेले घाण पाणी आणि कचऱ्यामुळे डासांचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात वाढला आहे. परिणामी नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. चिकनगुनिया, डेंग्यू, मलेरिया यांसारख्या आजारांचा धोका वाढण्याची शक्यता असल्याने ग्रामपंचायत प्रशासनाने तातडीने स्वच्छता मोहीम राबविण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

वार्ड क्रमांक ४ मधिल नाल्यांची नियमित साफसफाई होत नसल्याने पावसाचे पाणी व सांडपाणी एकत्रित होऊन रस्त्यावर येत आहे. काही ठिकाणी नाल्या कचरा, गाळ आणि घाणीने पूर्णपणे भरल्या आहेत. त्यामुळे नागरिकांना ये-जा करताना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

ग्रामपंचायतीने केवळ कागदोपत्री स्वच्छता न करता प्रत्यक्ष परिसराची पाहणी करून तातडीने नाल्यांची साफसफाई, सांडपाण्याचा निचरा आणि फवारणी करावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे. पावसाळ्यात परिस्थिती आणखी गंभीर होण्यापूर्वी प्रशासनाने ठोस उपाययोजना न केल्यास नागरिकांच्या आरोग्यावर त्याचा विपरीत परिणाम होण्याची शक्यता आहे.

> ग्रामपंचायतीकडून नुकताच नाल्यांचा उपसा करण्यात आला आहे. मात्र, पावसामुळे ज्या ठिकाणी पुन्हा घाण साचली असेल, त्या ठिकाणी पाहणी करून नाल्यांची पुन्हा साफसफाई व उपसा करण्यात येईल.
>
> **-प्रमोद चारथळ**-ग्रामसेवक, थिलोरी

> गेल्या २० वर्षांपासून नाल्यांची परिस्थिती अशीच आहे. दरवर्षी दलित वस्तीच्या विकासासाठी निधी येत आहे, मग तो निधी जातो कुठे? प्रशासनाने याची चौकशी करून प्रत्यक्षात किती निधी आला आणि कुठे खर्च झाला, याचा हिशोब ग्रामस्थांसमोर मांडावा
>
> **-संदेश वाकपांजर** -ग्रामस्थ,थिलोरी

# विकासकामे जनतेपर्यंत पोहोचवा
## -'हर घर तिरंगा' उपक्रम उत्साहात साजरा करा
### आ. प्रवीण तायडे यांचे कार्यकर्त्यांना आवाहन

**अचलपूर/प्रतिनिधीः-** अचलपूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रवीण तायडे यांच्या प्रमुख उपस्थितीत अचलपूर व परतवाडा येथे भाजप पदाधिकारी व कार्यकर्त्यांची विशेष आढावा बैठक संपन्न झाली.

आगामी सामाजिक व राष्ट्रीय उपक्रमांसह पक्षाच्या संघटनात्मक कामाचा यावेळी आढावा घेण्यात आला. अचलपूर तालुक्यातील कार्यकर्त्यांची बैठक आमदार प्रवीण तायडे यांच्या स्थानिक जनसंपर्क कार्यालयात, तर शहरातील पदाधिकाऱ्यांची बैठक विश्राम भवन, परतवाडा येथे पार पडली. आगामी १५ ऑगस्ट स्वातंत्र्यदिनानिमित्त 'हर घर तिरंगा' अभियान उत्साहाने राबविण्याचे आवाहन आमदार प्रवीण तायडे यांनी केले. तसेच १४ ऑगस्टच्या फाळणी विभीषिका स्मृती दिनाबाबतही मार्गदर्शन करण्यात आले. केंद्र व राज्य शासनाच्या विविध कल्याणकारी योजना तळागाळातील नागरिकांपर्यंत पोहोचविण्याच्या सूचना यावेळी देण्यात आल्या.



अचलपूर मतदारसंघाच्या सर्वांगीण विकासासाठी आपण कटिबद्ध असून शासनाच्या विविध योजनांच्या माध्यमातून विकासकामांना गती दिली जात असल्याचे आमदार प्रवीण तायडे यांनी याप्रसंगी सांगितले.

बैठकीत भाजप शहराध्यक्ष कुंदन यादव यांनी प्रास्ताविक केले, तर माजी नगरसेवक रूपेश ढेपे यांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले. यावेळी ज्येष्ठ पदाधिकारी, नगरसेवक, महिला पदाधिकारी तसेच ग्रामीण व शहर भागातील कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. शासनाच्या योजना जनतेपर्यंत पोहोचवून संघटन अधिक मजबूत करण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला.यावेळी भाजपा चे जिल्हा उपाध्यक्ष विशाल काकड,शहराध्यक्ष कुंदन यादव,सुनील चौधरी,तालुकाध्यक्ष शंकर मालखोडे ,प्रांगणा तोंडगावकर , अनु महाराज मिश्रा ,माजी नगरसेवक रुपेश ढेपे ,मनीष खंडेलवाल,प्रफुल बर्वे, राम महाराज चुलेट, रवी खंडेलवाल,निलेश तारे,स्वप्नील मडघे,शंकर भाषांनी, पंकज उमक ,महेश कडू ,ललित ठाकूर ,गौरव रघुवंशी, सतीश शर्मा ,यश पुरोहित आदी पदाधिकारी - कार्यकर्ते उपस्थितीत होते.

## १ व १० वरील उर्वरित

### धारमध्ये भीषण अपघात

घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी अपघाताची माहिती गोळा करून अपघातग्रस्त वाहनं हटवली.

अपघातामुळे महामार्गावर काही काळ भीतीचं आणि गोंधळाचं वातावरण निर्माण झालं होतं. तसेच घटनास्थळी स्थानिकांची मोठी गर्दी जमल्याने वाहतूक कोंडी झाली होती. सध्या पोलीस या अपघाताचा सखोल तपास करत आहेत. महाकाल दर्शनानंतर आपल्या घरी वडोदराला परतणाऱ्या या तरुणांवर काळाने घाला घातला. या अपघातामुळे कुटुंबीयांना मोठा धक्का बसला आहे.

### 'जो खेलेगा, वो खिलेगा'

पुरुष आणि महिला खेळाडूंचे योगदान

पुरुष खेळाडू: २३ पुरुष खेळाडूंनी शानदार कामगिरी करत २३ पदके पटकावली (५ सुवर्ण, १३ रौप्य आणि ५ कांस्य).

महिला खेळाडू: महिला खेळाडूंनी आपल्या ताकदीचे प्रदर्शन करत १६ पदके मिळवली (८ सुवर्ण, ४ रौप्य आणि ४ कांस्य). सुवर्णपदकांच्या बाबतीत महिला ?थलीट्सचे पारडे जड राहिले.

बॉक्सिंग रिंगमध्ये १०० टक्के यश

यावेळच्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत भारतीय बॉक्सर्सची कामकामगिरी सर्वात जास्त आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरली. रिंगमध्ये उतरलेल्या भारताच्या सर्व १० मुक्केबाजांनी पदके जिंकून इतिहास रचला. बॉक्सिंग पथकाने १०० टक्के यश मिळवत देशाला ७ सुवर्ण आणि ३ रौप्य पदके मिळवून दिली. साक्षी चौधरीसह इतर मुक्केबाजांच्या या ठोशाने भारताच्या पदकतालिकेला मजबूत करण्यात सर्वात महत्त्वाची भूमिका बजावली.

ज्युडोमध्ये भारताला पहिल्यांदाच मिळाले सुवर्णपदक

केवळ बॉक्सिंगच नाही तर ?थलेटिक्स, पॅरा ?थलेटिक्स आणि ज्युडोमध्येही भारतीय खेळाडूंनी अनेक विक्रम मोडीत काढले.

?थलेटिक्स आणि पॅरा ?थलेटिक्स: ट्रॅक अँड फील्ड स्पर्धांमध्ये भारतीय ?थलीट्सनी आपल्या गती आणि ताकदीचा जलवा दाखवला. भारताने यामध्ये एकूण १६ पदके (३ सुवर्ण, ७ रौप्य, ६ कांस्य) आपल्या नावावर केली.

ज्युडोमधील इतिहास: कॉमनवेल्थ गेम्स २०२६ मध्ये देशाच्या ४ ज्युडोका (व्ल्र्दै) खेळाडूंनी पदके जिंकली. कॉमनवेल्थ गेम्सच्या इतिहासात भारताने पहिल्यांदाच ज्युडो स्पर्धेत सुवर्णपदक पटकावले. एकाच दिवशी अस्मिता डे हिने महिलांच्या ४८ किलो वजनी गटात आणि हर्ष सिंग याने पुरुषांच्या ६० किलो वजनी गटात देशाला हे सुवर्ण यश मिळवून दिले.

### दिल्लीत उद्या खासदार मोदींना

या सभ्यपणाला कुठेतरी गालबोट लावलेलं आहे, अशी प्रतिक्रिया काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी दिली. तसेच, असे प्रवास करणं काही चुकीचं नाही, मात्र प्रवास झाल्यानंतर त्यावर लगेच शंका जी उपस्थित केल्या जाते. त्याला भारतीय जनता पार्टी जबाबदार आहे, असेही त्यांनी म्हटले.

एखाद मंडळ भेटत असेल तर वावगं नाही

सुप्रिया सुळे यांनी पंतप्रधान नरेंद मोदींच्या भेटीसंदर्भाने माहिती दिली होती. शरद पवारांच्या राष्ट्रवादीचे सर्व खासदार नरेंद्र मोदींची भेट घेणार आहेत. पंतप्रधान हे संपूर्ण देशाचे असतात, त्यांनी सर्वांनाच भेटले पाहिजे. जे पंतप्रधान संसदेतच येत नाही, त्यामुळे त्यांच्याकडून अशी अपेक्षा करणं चुकीचं आहे. प्रंतप्रधान यांना भेटण्यासाठी एखादं मंडळ जात असेल तर त्यात वावगं काही नाही, असेही हर्षवर्धन सपकाळ यांनी म्हटले. मात्र, कोणाला जर भेटायचं असेल तर तर जाणाऱ्यांची आणि भेटणाऱ्यांची दोघांची मर्जी आहे, असेही सपकाळ यांनी स्पष्ट केले. दरम्यान, डिलिमिटेशन हा भाजपाचा कावा आहे, डीलिमिटेशन हे राष्ट्रविरोधी आहे, देशविरोधी आहे, संविधानविरोधी आहे. त्यामुळे, सर्वांनी मिळून विरोध केला पाहिजे.

### मनोज जरांगे पाटलांची

पंढरपुरातून जोरदार टीका केली.

दरम्यान, कुणबी प्रमाणपत्र आणि जात पडताळणी प्रकरणावरून मनोज जरांगे पाटील यांनी राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्यावर गंभीर आरोप केले होते. 'बावनकुळेंनी कुणबी प्रमाणपत्रे रद्द करण्यास सांगितले असून त्यांची नार्को टेस्ट करावी,' अशी मागणी जरांगेंनी केली होती. या आरोपांवर आता चंद्रशेखर बावनकुळे यांनीही सविस्तर प्रतिक्रिया देत आरोपांमध्ये कोणतेही तथ्य नसल्याचा दावा केला. तसेच, मी नार्को चाचणीसाठीही तयार असल्याचं त्यांनी म्हटलं होतं.

मनोज जरांगे पाटलांना उत्तर देणार - हाके

मनोज जरांगे मुर्खासारखा धिंगाणा घालत महाराष्ट्रात फिरतोय मंत्र्यांची मुख्यमंत्र्यांची आई माई काढतोय ओबीसीच्या मंत्र्यांच्या व्यंगावर टिंगल करतोय त्याच्या विरोधात ओबीसीची वजन मोठ बांधण्यासाठी उद्या मी सोलापुरात येत आहे अशा पद्धतीचा व्हिडिओ लक्ष्मण हाके यांनी सोशल मीडियात पोस्ट केला असून आज हाके सोलापुर जिल्ह्यातून बाहेर पडत असताना उद्या आता ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी सोलापूर मध्ये सर्व बांधवांना एकत्र येण्याचे आवाहन केले आहे.

### कामचुकार अधिकारी-कंत्राटदारांवर

या बैठकीला महसूलमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, महापौर नीता ठाकरे, उपमहापौर लीला हाथीबेड, आ. कृष्णा खोपडे, आ. मोहन मते, आ. संजय भेंडे, सत्तापक्षनेते बाल्या बोरकर, स्थायी समिती अध्यक्ष शिवानी दाणी, मनपा आयुक्त डॉ. विपीन इटनकर, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, नासुप्र सभापती संजय मीणा, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी उपस्थित होते.

अमृत योजनेतील कामे करताना शहरातील रस्ते खोदले गेले आणि अनेक ठिकाणी पूर्ववत न केल्यामुळे नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. आता नागनदी प्रकल्पांतर्गत सांडपाणी प्रक्रिया तसेच मलवाहिन्यांचेही काम होणार आहे. एकूण पाच टप्प्यांमध्ये हे काम होणार असून यामध्ये ३ नव्या एसटीपींची उभारणी, दोन जुन्या एसटीपींची पुनर्बांधणी, तसेच पश्चिम, दक्षिण-पश्चिम, दक्षिण, मध्य व पूर्व अशा पाच मतदारसंघांमध्ये प्रकल्पाच्या विविध कामांसाठी रस्त्यांचे खोदकाम होणार आहे. मात्र, पूर्वानुभव लक्षात घेता रस्त्यांचे खोदकाम आणि रस्ते पूर्ववत करणे या दोन्ही गोष्टींसाठी अद्ययावत यंत्रांचा वापर करण्याच्या सूचना गडकरी यांनी दिल्या.

### विवाह जुळवणाऱ्या ॲपवरील

चालू ठेवले. आपण लंडन येथे वास्तव्याला असून आई-वडील लखनऊ येथे असल्याने त्याठिकाणी काही मालमत्ताही खरेदी करायची असल्याची त्याने बतावणी केली. भारतातील दिल्ली विमानतळावर २७ जुलै २०२६ रोजी सकाळी ९ वाजेच्या सुमारास आल्याचे सांगत त्याने तिला फोन केला. आपण ३० हजार पाउंड्स आणले असून सुरक्षेच्या कारणास्तव बाहेर पडता येत नसल्याचेही तो म्हणाला.

हीच रक्कम परत मिळविण्यासाठी सुरक्षा यंत्रणांना देण्यासाठी त्याने तिच्याकडे ६७ हजारांची मागणी केली. त्याच्या बोलण्यावर विश्वास ठेवत तिने त्याने ही रक्कम ऑनलाइन वळती केली. त्यानंतर पुन्हा परदेशी चलन भारतीय चलनात रूपांतरित करण्यासाठी एक लाख ८९ हजारांची रक्कम दोन वेळा मिळून तीन लाख ७८ हजार रुपये त्याने घेतले.

अशाच प्रकारे वेगवेगळी कारणे दाखवून त्याने तिच्याकडून आठ लाख २७ हजारांची रक्कम त्याने घेतली. भारतात आल्यावर त्याच्याकडून ही सर्व रक्कम परत मिळेल, या आशेपोटी तिने त्याला हे पैसे दिले. परंतु, मैत्रीच्या नावाखाली आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर या तरुणीने अखेर या प्रकरणी ४ ऑगस्ट २०२६ रोजी कोपरी पोलिस ठाण्यात त्याच्याविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल केला.

### आता, २५ हजारांच्या नोकरीसाठी

आता या विद्यार्थ्यांनी केला आहे.

विशेष म्हणजे महिन्याभरापासून ऑनलाईन अर्ज भरून, अभ्यासाची तयारी करून परीक्षेसाठी आलेल्या विद्यार्थ्यांना खरी परिस्थिती लक्षात येताच त्यांच्या पायाखालची वाळूच सरकली. तसेच कंपनीने सर्व विद्यार्थ्यांना ऑनलाईन संगणकीय परीक्षा होणार असल्याचे ठोकून सांगितले होते. मात्र, प्रत्यक्ष केंद्रावर एकही संगणक उपलब्ध नव्हता.

अधिक विचारणा केली असता, परीक्षा घेण्यासाठी आलेली कथित 'थर्ड पार्टी' कंपनीही हात वर करत 'आम्हाला काहीच माहिती नाही, असं सांगत असल्याचा आरोप विद्यार्थ्यांनी केला आहे. याबाबत माहिती मिळताच घटनास्थळी पोलीस देखील दाखल झाले असून विद्यार्थ्यांनी संताप व्यक्त केला आहे. दरम्यान, देशात मोठ्या प्रमाणात बेरोजगारी असून युवकांच्या हाताला काम नाही, म्हणावी तशी नोकरी नाही, असे सांगत अभिजीत दीपके जेन झी तरुणाईचा संताप सर्वत्र दिसत असल्याचे सांगतात. संभाजीनगरमधील घटनाही त्याचीच पुनरावृत्ती असल्याचं दिसून येत आहे.

### भाजपा आमदाराचा व्याही

सोहळ्यात सुमारे १५ हजार लोक सहभागी झाले होते.

दरम्यान, ज्ञान तिवारी यांनी तक्रारीत पुढे म्हटले आहे की, माझ्या मुलीला मंगळ असल्याने आमच्या कुटुंबाने वर आणि त्याच्या कुटुंबाबाबत पडताळणी केली होती. त्यावेळी अनुज त्रिवेदी याने आपण मुंबईत रियल इस्टेट व्यावसायिक असल्याची बतावणी केली होती. तर आपला मुलगा प्रखर हा गावात शाळा चालवतो तसेच शेती आणि बागायती सांभाळतो, असे सांगितले.

दरम्यान, लग्न झाल्यानंतर दोन वर्षांनी अनुज त्रिवेदी याच्या कथित बोगसगिरीची माहिती आमदार ज्ञान तिवारी यांना मिळाली. अनुज याने ओळख लपवून लपवून वेगवेगळ्या महिलांसोबत मिळून एकूण २५ लग्नं केली आहेत. तसेच त्यांना कोट्यवधीचा गंडा घातला आहे. दरम्यान, एका प्रकरणात पोलिसांनी अनुज त्रिवेदी याला अटक केली आहे. तसेच डोंबिवलीतील एका प्रकरणात न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आल्याने तो सध्या तुरुंगात आहे.

आमदार ज्ञान तिवारी यांनी सोशल मीडियावर पोस्ट लिहून अनुज त्रिवेदी यांच्याशी असलेले आपले नातेसंबंध संपवण्याची घोषणा केली आहे. तसेच आपल्यासोबत झालेल्या फसवणुकीची माहितीही त्यांनी जाहीर केली आहे. तसेच आता ज्ञान तिवारी यांनी सीतापूर येथील रेउसा पोलीस ठाण्यात एफआयआरही दाखल केली आहे.

### कौटुंबिक वाद विकोपाला

करण्याची प्रक्रिया सुरू आहे. दरम्यान अजय नामक व्यक्तीने अमोलच्या कानात आणि इतर ठिकाणी गोळ्या झाडून त्याला कायमचं संपवलं आहे.

या घटनेनं अकोला जिल्ह्यात मोठी खळबळ उडाली

अजय मालोकार (ऱ्रैंब ईर्त्दै) हा दिवंगत मनसे कार्यकर्ता जय मालोकार यांचा मोठा भाऊ आहे. दोन वर्षांपूर्वी जय मालोकारचा अमोल मिटकरी यांच्या गाडीवर हल्ला झाल्यानंतर हृदयविकाराने मृत्यू झाला होता. कौटुंबिक वादातून हत्या झाल्याची माहिती पोलीस सूत्रांनी दिली आहे. दरम्यान, या घटनेमुळं अकोला जिल्ह्यात मोठी खळबळ उडाली आहे.

### परवानगी न घेता शाळेच्या आवारातच

थेट जिल्हा परिषद शाळेच्या संरक्षण भिंतीला खोदून शाळेच्या आवारातून नाली टाकण्यात आली. त्यामुळे शाळेच्या जागेचा वापर कोणत्या अधिकाराने करण्यात आला? असा प्रश्न उपस्थित होत आहे. नगर परिषद प्रशासन अतिक्रमणधारकांवर कारवाई करताना कोणतीही तडजोड करत नाही. मग केवळ एक झाड तोडले जाऊ नये म्हणून शासकीय शाळेच्या आवारातून नाली टाकण्याचा निर्णय का घेण्यात आला? असा प्रश्न स्थानिक नागरिकांनी उपस्थित केला आहे.

शासकीय मालमत्तेवर कोणतेही बांधकाम करण्यासाठी संबंधित विभागाची पूर्वलेखी परवानगी आवश्यक असताना ती न घेता काम करण्यात आल्याचा आरोप होत आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधित अधिकारी व कंत्राटदारांची जबाबदारी निश्चित करावी, तसेच या कामाची प्रशासकीय मंजुरी, आराखडा, निधी, परवानगी आणि इतर सर्व कागदपत्रे सार्वजनिक करावीत, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. आता या प्रकरणावर नगर परिषद प्रशासन काय स्पष्टीकरण देते आणि जिल्हा परिषद शिक्षण विभाग कोणती भूमिका घेतो, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

झाड वाचविणे महत्त्वाचे,पण शाळेची जागा वापरण्याचा अधिकार कुणी दिला.स्थानिक नागरिकांच्या मते नालीचा सरळ मार्ग पिंपळाच्या झाडामुळे बदलण्यात आला. आणि शाळेच्या आवारातून नाली टाकण्यात आली. पर्यावरण संवर्धन आवश्यक असले तरी त्यासाठी शासकीय शाळेची जागा संबंधित विभागाची परवानगी न घेता वापरणे कितपत योग्य आहे? अतिक्रमणधारकांवर कठोर कारवाई करणाऱ्या नगर परिषद प्रशासनाने या प्रकरणात कोणत्या कायदेशीर तरतुदींच्या आधारे निर्णय घेतला, याचे उत्तर द्यावे, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

अद्यापपर्यंत आमच्या कार्यालयाकडून नालीच्या बांधकामासाठी कोणत्याही प्रकारची परवानगी देण्यात आलेली नाही.

-नंदकुमार जाधव, गटशिक्षण अधिकारी, पंचायत समिती दर्यापूर

### एसी कॉम्प्रेसरचे काम करताना

उडाली आहे. जखमी प्रवीण डवले यांना तातडीने उपचारासाठी रुग्णालयात हलवण्यात आले आहे.यावेळी परिसरात नागरिकांची प्रचंड गर्दी जमा झाली होती.

### अमरावती ते धामक बससेवा

त्यामुळे अमरावती–नांदगाव खंडेश्वर–शिवनी–शिंगणापूर–पिंपरी कलगा–येवती–धामक या मार्गावर नियमित बसफेऱ्या सुरू करण्याची मागणी करण्यात आली.

निवेदनाद्वारे सकाळी ८ वाजता, दुपारी ४ वाजता आणि रात्री ७ वाजता, अशा तीन बसफेऱ्या अमरावतीहून सुरू करण्याची मागणी करण्यात आली आहे. या बससेवेमुळे परिसरातील नागरिकांसह विद्यार्थी, शेतकरी आणि प्रवाशांना मोठा दिलासा मिळणार आहे.

यावेळी भाजप तालुकाध्यक्ष निकेत ठाकरे, तालुकाध्यक्ष पंकज मेटे, किसान मोर्चा आघाडीचे तालुकाध्यक्ष दिनेश सोनकुसरे, अल्पसंख्यांक सेलचे तालुकाध्यक्ष अजगर भाई, युवा मोर्चा जिल्हा उपाध्यक्ष अमोल इंगोले, संजय गांधी निराधार समिती सदस्य अक्षय मस्के तसेच युवा मोर्चा तालुका उपाध्यक्ष रुपेश उघडे उपस्थित होते.

धामक ते अमरावती बससेवा लवकरात लवकर सुरू होऊन परिसरातील नागरिकांची वाहतुकीची समस्या दूर व्हावी, अशी अपेक्षा ग्रामस्थांकडून व्यक्त होत आहे.

### अचलपूर तालुक्यात स्कूल बसमधील

वाहतूक नियंत्रण शाखा , आरटीओ विभाग ठोस उपाययोजना राबविण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.यामुळे पालकांमध्ये चिंतेचे वातावरण पाहायला मिळत आहे.

अमरावती जिल्ह्यातील अनेक ठिकाणी गेल्या काही वर्षांत स्कूल बस अपघातात अनेक विद्यार्थ्यांना जीव गमवावा लागला आहे. याची गंभीर दखल घेत शासनाने राज्यातील स्कूल अपघाताच्या अनुषंगाने शालेय स्कूल बस धोरण मार्गदर्शक तत्त्वे जाहीर केली आहेत.

मात्र याची अचलपूर तालुक्यातील खाजगी शाळांकडून अंमलबजावणी होत नसल्याचे चित्र आहे.यात स्कूल बसमधील आसन क्षमता, कंत्राटी स्कूल बससाठी वाहनांचा रंग, शाळेचे नाव, प्रवास करणाऱ्या मुलांची यादी, घरापासून शाळेपर्यंतचा प्रवास आदी मार्गदर्शक सूचनांचा यात समावेश आहे. सर्व शाळांना या मार्गदर्शक सूचना व तत्त्वांचे पालन करण्याचे निर्देश आहेत. मात्र याची नेहमी पायमल्ली होत असल्याचे चित्र आहे . रिद्धपूर येथे घडलेल्या त्या घटनेनंतर पालक आणि विद्यार्थी वर्गात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.विद्यार्थी वाहतुकीबाबत वारंवार घडणाऱ्या घटनांमुळे पालक, शाळा व्यवस्थापनाच्या अडचणीत वाढ होत आहे.

आरटीओ, वाहतूक पोलिस, शाळा प्रशासन, शिक्षक, पालक, बसचालक-मालक यांनी विद्यार्थी सुरक्षेचा विषय समन्वयाने हाताळण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

### सोलर प्लांटची केबल कापून चोरी

३० हजार रुपये असल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. चोरीची माहिती मिळाल्यानंतर कंपनीचे इलेक्ट्रिकल इंजिनिअर सहदेवराम चौधरी यांनी चांदूर रेल्वे पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यावरून पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध बीएनएस कलम ३०३(२) अन्वये गुन्हा नोंदविला आहे.

# अखंड सेवाकार्याची दीपज्योत मालवलीः ॲड.यशोमती ठाकूर
## गाडगेबाबा मिशनचे आधारवड बापूसाहेब देशमुख यांचे निधन

**अमरावती/प्रतिनिधीः-** निष्काम कर्मयोगी श्री संत गाडगेबाबांच्या सेवा, त्याग आणि मानवतेचा विचार आयुष्याच्या शेवटच्या श्वासापर्यंत जपणारे, श्री गाडगे महाराज मिशनचे उपाध्यक्ष तथा प्रमुख विश्वस्त सेवाव्रती बापूसाहेब देशमुख यांच्या निधनाने गाडगेबाबांच्या सेवाकार्याचा भक्कम आधारवड कोसळला आहे, अशी अत्यंत दुःखद आणि भावूक प्रतिक्रिया श्री गाडगे महाराज मिशन, मुंबईच्या अध्यक्षा ॲड. यशोमती ठाकूर यांनी व्यक्त केली.



आपल्या शोकसंदेशात ॲड. यशोमती ठाकूर म्हणाल्या, 'बापूसाहेबांचे संपूर्ण जीवन हे सेवा, समर्पण आणि मूल्यांसाठी समर्पित होते. संत गाडगेबाबांच्या संकल्पनेतील नागरवाडी येथील 'इंद्रभुवन'चे निर्माण करून त्यांनी वंचित, दुःखी आणि निराधारांच्या सेवेचे एक जिवंत तीर्थक्षेत्र उभे केले. गाडगेबाबांनी दाखवलेल्या मार्गावर अढळ निष्ठेने चालणारे ते खरे कर्मयोगी होते. श्री गाडगे महाराज मिशनच्या माध्यमातून त्यांनी जनसेवेचा वसा प्रामाणिकपणे पुढे नेला.'

पुढे बोलताना त्या म्हणाल्या, 'त्यांच्या जाण्याने गाडगेबाबांच्या विचारांवर श्रद्धा ठेवणाऱ्या लाखो अनुयायांचे आणि संत गाडगेबाबा मिशनचे कधीही भरून न निघणारे नुकसान झाले आहे. माझ्यासाठी ही वैयक्तिक आणि न भरून निघणारी हानी आहे. बापूसाहेबांची सेवावृत्ती, त्यांची दूरदृष्टी आणि निष्ठा ही पुढील पिढ्यांसाठी कायम प्रेरणादायी राहील. या महान सेवाव्रतीच्या पवित्र स्मृतीस मी आणि श्री गाडगे महाराज मिशनतर्फे विनम्र अभिवादन करते.'

# महानगरपालिका उच्च प्राथमिक मराठी शाळा क्र. १३ येथे 'प्रज्ञासुर्य वार्षिकांकाचे प्रकाशन



**अमरावती/प्रतिनिधीः-** महानगरपालिका उच्च प्राथमिक मराठी शाळा क्रमांक १३, चपराशीपुरा येथे शाळेच्या 'प्रज्ञासुर्य' या वार्षिकांकाचे प्रकाशन अमरावती महानगरपालिकेचे शिक्षणाधिकारी डॉ. प्रकाश मेश्राम तथा नगरसेवक बबलू शेखावत यांच्या हस्ते उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले. यावेळी योगेश राणे यांच्यासह शिक्षक, विद्यार्थी, पालक आणि शिक्षणप्रेमी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमात बोलताना शिक्षणाधिकारी डॉ. प्रकाश मेश्राम यांनी 'प्रज्ञासुर्य' वार्षिकांकाच्या उत्कृष्ट निर्मिती, आकर्षक मांडणी, संपादकीय दर्जा आणि विद्यार्थ्यांच्या सर्जनशील साहित्यनिर्मितीचे विशेष कौतुक केले. विद्यार्थ्यांच्या लेखनकौशल्याला प्रोत्साहन देणारा हा वार्षिकांक वाचनसंस्कृती जोपासण्यास महत्त्वपूर्ण ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. नगरसेवक बबलू शेखावत यांनीही विद्यार्थ्यांच्या कलागुणांना व्यासपीठ उपलब्ध करून दिल्याबद्दल शाळेचे अभिनंदन केले.

या वार्षिकांकाचे संपादन मुख्याध्यापक चित्रा खोब्रागडे यांच्या मार्गदर्शनात सुषमा रामदास वानखेडे-पायस यांनी केले. या अंकामध्ये विद्यार्थ्यांनी विविध विषयांवर लिहिलेले लेख, कविता, कथा, चारोळ्या, निसर्गलेखन, वैचारिक लेख, चित्रे आणि रेखाटने यांचा समावेश करण्यात आला आहे. विद्यार्थ्यांच्या कल्पनाशक्ती, सामाजिक जाणीव आणि साहित्यिक अभिव्यक्तीचे प्रभावी दर्शन या अंकातून घडते.

संपादक मंडळात वनमाला भास्कर, वैशाली विहिरे, प्रणाली केवटे, संजीवनी देशमुख, अवंतिका मेटे आणि मंजुषा सातपुते यांनी परिश्रमपूर्वक कार्य केले. अतुल जोशी आणि ऋषभ आठवले यांनी संकलक म्हणून उल्लेखनीय योगदान दिले.

वार्षिकांकासाठी तुट्टी इंगळे, काजल मेहरे आणि काजल मोहोकर यांनी मार्गदर्शक म्हणून सहकार्य केले. विद्यार्थी संपादक मंडळात अथर्व जितेंद्र तायडे आणि सुमन मुन्नालाल यादव यांनी मुख्य विद्यार्थी संपादक म्हणून काम पाहिले, तर रोशनी गणेश कनोजिया आणि सम्यक विनोद तायडे यांनी विशेष सहकार्य केले.

कार्यक्रमाच्या शेवटी सर्व मान्यवरांनी संपादक मंडळ, शिक्षक आणि विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून 'प्रज्ञासुर्य' हा वार्षिकांक विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेचा आणि शैक्षणिक गुणवत्तेचा उत्कृष्ट दस्तऐवज असल्याचे गौरवोद्गार काढले. या नाविन्यपूर्ण उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# जनमाध्यम

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ सोमवार, १० ऑगस्ट २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठ ४

एक प्रतिष्ठित सवय

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


# बाकलीवाल कॉलनीत दोन डॉक्टरांवर नगरपालिकेची 'मेहेर नजर'?

## रस्ता अडवून शेड, पार्किंगला ठेंगा; व्यापारी संकुलाला मोकळीक? नागरिकांच्या तक्रारींकडे प्रशासनाचे दुर्लक्ष



■ प्रतिनिधी | वाशिम ■

शहरातील बाकलीवाल कॉलनी परिसरात गृहनिर्माण संस्थेच्या जागेवर उभारण्यात येत असलेल्या दोन बहुमजली व्यापारी संकुलांवरून नगरपालिकेच्या कारभारावरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. बांधकामाच्या अनुषंगाने रस्ता अडविणे, पार्किंगसाठी आवश्यक जागा न सोडणे, तसेच बांधकामाच्या नियमांचे पालन झाले आहे का, याबाबत गंभीर प्रश्न उपस्थित होत असतानाही नगरपालिका प्रशासनाकडून अद्याप ठोस कारवाई झालेली नसल्याने नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे. विशेष म्हणजे, या बांधकामांमध्ये दोन नामांकित डॉक्टरांचा सहभाग असल्यानेच प्रशासनाकडून 'मेहेर नजर' दाखविली जात आहे का, असा सवाल आता उपस्थित केला जात आहे.

बाकलीवाल कॉलनी ही गृहनिर्माण संस्थेच्या माध्यमातून विकसित झालेली वस्ती आहे. या परिसरात रहिवाशांनी आपल्या घरांच्या बांधकामासाठी संबंधित नियमांचे पालन केल्याचा दावा आहे. मात्र, याच परिसरात आता व्यावसायिक वापरासाठी बहुमजली संकुले उभारली जात असल्याने गृहनिर्माण संस्थेच्या जागेचा वापर नेमका कोणत्या परवानगीच्या आधारे केला जात आहे, हा कळीचा मुद्दा ठरला आहे.

### पालिकेची चुप्पी? कागदपत्रे जाहीर करण्याची मागणी

या संपूर्ण प्रकरणात नगरपालिकेने पारदर्शक भूमिका घेण्याची गरज आहे. संबंधित दोन्ही बांधकामांना दिलेल्या परवानग्या, मंजूर आराखडे, पार्किंगची तरतूद, अग्निशमन विभागाची मंजुरी, जमीन वापरासंदर्भातील परवानग्या आणि प्रत्यक्ष बांधकामाची स्थिती यांची स्वतंत्र तपासणी करावी, अशी मागणी होत आहे. तसेच नगरपालिका प्रशासनाने प्रत्यक्ष स्थळ पाहणी करून नियमभंग आढळल्यास संबंधितांवर कोणताही दबाव न ठेवता कारवाई करावी, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे. नियम सर्वांसाठी समान असतील तर त्यांची अंमलबजावणीही समानच झाली पाहिजे. अन्यथा एका बाजूला सामान्य नागरिकांसाठी नियमांचा बडगा आणि दुसऱ्या बाजूला प्रभावशाली व्यक्तींसाठी 'मेहेर नजर', असा संदेश शहरात जाऊ शकतो. त्यामुळे बाकलीवाल कॉलनीतील या दोन्ही बांधकामांची निष्पक्ष चौकशी करून नगरपालिका प्रशासन नेमकी कोणाच्या बाजूने उभी आहे, हे स्पष्ट करण्याची वेळ आली आहे.

### परवानग्यांची तपासणी होणार का?

गृहनिर्माण संस्थेच्या परिसरात व्यावसायिक स्वरूपाचे बांधकाम उभारले जात असल्यास संबंधित जमीन वापर, बांधकाम परवानगी, मंजूर विकास आराखडा, पार्किंग, अग्निसुरक्षा आणि इतर आवश्यक परवानग्यांचा प्रश्न निर्माण होतो. त्यामुळे या संकुलांना नेमक्या कोणत्या मंजुरी देण्यात आल्या आहेत, याची संपूर्ण कागदपत्रांसह तपासणी करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे. नगरपालिकेने मंजूर केलेला आराखडा आणि प्रत्यक्ष सुरू असलेले बांधकाम यामध्ये तफावत आहे का? बांधकाम परवानगीमध्ये पार्किंगची तरतूद आहे का? अग्निशमन विभागाची आवश्यक मंजुरी घेण्यात आली आहे का? रस्त्याच्या वापराबाबत परवानगी देण्यात आली आहे का? गृहनिर्माण संस्थेच्या जागेचा व्यावसायिक वापर करण्यास संबंधित सक्षम प्राधिकरणाची मान्यता आहे का? या सर्व प्रश्नांची उत्तरे आता प्रशासनाला द्यावी लागणार आहेत.

### पार्किंगची तरतूद कुठे? वाहने रस्त्यावरच राहणार?

बहुमजली व्यापारी संकुल उभारल्यानंतर तेथे येणारे ग्राहक, कर्मचारी तसेच संबंधित व्यावसायिकांची वाहने कुठे उभी राहणार, याचे नियोजन झाले आहे का, हा आणखी एक गंभीर प्रश्न आहे. नागरिकांच्या म्हणण्यानुसार, संकुलाच्या जागेत पुरेशा पार्किंगची तरतूद करण्यात आलेली दिसत नाही. जर पार्किंगची जागाच उपलब्ध नसेल तर भविष्यात या संकुलात येणारी वाहने कॉलनीतील अंतर्गत रस्त्यांवर उभी राहण्याची शक्यता आहे. त्यातून आधीच अरुंद असलेल्या रस्त्यांवरील वाहतूक कोंडी आणि नागरिकांची गैरसोय वाढू शकते. नगरपालिकेने बांधकाम परवानगी देताना पार्किंगची व्यवस्था, मंजूर बांधकाम आराखडा आणि प्रत्यक्ष बांधकाम यांची पडताळणी केली आहे का, याचे उत्तर प्रशासनाने देणे आवश्यक आहे.

### तक्रारी करूनही कारवाई नाही

या प्रकरणाबाबत स्थानिक रहिवाशांनी नगरपालिकेकडे लेखी तक्रारी केल्याचे सांगितले जाते. मात्र तक्रारी प्राप्त होऊनही प्रत्यक्ष कारवाई का झाली नाही, हा प्रश्न अनुत्तरित आहे. एखाद्या सामान्य नागरिकाने बांधकाम नियमांचे उल्लंघन केले तर नगरपालिका तत्परतेने नोटीस बजावते, बांधकाम थांबविण्याचे आदेश देते किंवा कारवाईचा बडगा उगारते. मग याच निकषांचा वापर बाकलीवाल कॉलनीतील या बांधकामांवर का केला जात नाही? संबंधित बांधकामांबाबत प्रशासनाने पाहणी केली असल्यास त्याचा अहवाल काय आहे? नोटीस दिली असल्यास त्यावर पुढील कारवाई का झाली नाही? आणि कारवाई केली नसेल तर त्यामागचे कारण काय? असे सवाल आता नागरिक उपस्थित करीत आहेत.

### 'डॉक्टर आहेत म्हणून नियम वेगळे?'

बाकलीवाल कॉलनीतील रहिवाशांमध्ये या प्रकारामुळे नाराजी वाढत आहे. 'आम्ही नियम पाळून घरे बांधायची आणि काही प्रभावशाली व्यक्तींना मात्र नियमांची पायमल्ली करण्याची मुभा द्यायची, हा कोणता न्याय?' असा संतप्त सवाल रहिवाशांकडून उपस्थित होत आहे. 'कॉलनीतील नागरिकांनी आपल्या घरांच्या बांधकामात नियमांचे पालन केले. मात्र दोन डॉक्टरांची व्यापारी संकुले उभी राहत असताना रस्ता अडविला जात असेल, पार्किंगची जागा नसेल आणि तरीही प्रशासन गप्प बसत असेल तर नगरपालिका नेमकी कोणासाठी काम करते?' असा सवाल नागरिकांनी केला आहे.

### अंतर्गत रस्त्यावरच शेड; वाहतुकीचा प्रश्न गंभीर

या संकुलाच्या बांधकामासाठी कॉलनीतील अंतर्गत रस्त्याचा काही भाग पत्र्याचे शेड उभारून अडविण्यात आल्याचा आरोप आहे. रस्ता हा सार्वजनिक वापरासाठी असताना त्यावर अशाप्रकारे अडथळा निर्माण करण्यास कोणत्या विभागाने परवानगी दिली, असा प्रश्न नागरिक उपस्थित करीत आहेत. रस्ता अरुंद असताना त्यावरच बांधकाम साहित्य, शेड अथवा अन्य अतिक्रमण झाले तर भविष्यात वाहनांची ये-जा, आपत्कालीन परिस्थितीत रुग्णवाहिका किंवा अग्निशमन वाहनांना प्रवेश करताना अडचणी निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे केवळ बांधकामाचा प्रश्न न राहता हा नागरिकांच्या सुरक्षिततेशी संबंधित मुद्दा असल्याचे रहिवाशांचे म्हणणे आहे.

# ११ महिन्यांपासून शिवभोजन केंद्र चालकांची उपासमार!

## गरिबांच्या ताटाला आधार देणारेच आर्थिक संकटात; तेल्हारा तालुक्यात तीन केंद्रे बंद

■ राजेश खारोडे पाटील ■

**तेल्हारा :** गरिबांच्या ताटात स्वस्तात जेवण देणाऱ्या शिवभोजन केंद्र चालकांच्या ताटात मात्र गेल्या ११ महिन्यांपासून आर्थिक संकट वाढत आहे. शासनाच्या शिवभोजन योजनेअंतर्गत केंद्र चालकांना मिळणारे अनुदान तब्बल ११ महिन्यांपासून रखडल्याने जिल्ह्यातील केंद्र चालक आर्थिक विवंचनेत सापडले आहेत. विशेष म्हणजे, अनुदान आणि वाढत्या खर्चाचा ताळमेळ बसत नसल्याने तेल्हारा तालुक्यात मागील वर्षभरात तब्बल तीन शिवभोजन केंद्रे बंद पडल्याची माहिती समोर आली आहे.

गरीब, गरजू आणि कष्टकरी नागरिकांना अल्पदरात पोटभर जेवण मिळावे, या उद्देशाने शिवभोजन योजना सुरू करण्यात आली. मात्र, योजना राबविणाऱ्या केंद्र चालकांनाच त्यांच्या हक्काच्या अनुदानासाठी महिनोन्?महिने प्रतीक्षा करावी लागत असल्याने शासनाच्या योजनेच्या अंमलबजावणीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. गरिबांच्या ताटाला सरकारचा आधार असल्याचे सांगितले जाते; मात्र त्या ताटात अन्न वाढणाऱ्या चालकांच्या हातात थकीत बिलांचा भार देण्यात आला आहे.

ग्रामीण भागातील एका थाळीसाठी केंद्र चालकांना २५ रुपये अनुदान मिळते. मात्र, अन्नधान्य, डाळी, तेल, भाजीपाला, मसाले, गॅस, वीज, पाणी, कर्मचारी आणि इतर खर्च सातत्याने वाढत आहेत. महागाईचा वाढता आलेख आणि दुसरीकडे थकीत अनुदान यामुळे केंद्र चालकांसमोर केंद्र सुरू ठेवण्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. विशेषतः गॅस सिलिंडरच्या वाढलेल्या किमतीचा मोठा आर्थिक फटका केंद्र चालकांना बसत आहे. एका सिलिंडरसाठी जवळपास तीन हजार रुपयांपर्यंत खर्च होत असल्याचे चालकांचे म्हणणे आहे. त्यातच रोजच्या भोजनासाठी लागणाऱ्या साहित्याच्या किमती वाढल्याने खर्चाचा भार वाढतच आहे. शासनाकडून अनुदान वेळेवर मिळत नसल्याने अनेक चालकांना उधारीवर साहित्य घेऊन केंद्र सुरू ठेवावे लागत आहे.एकीकडे गरिबांना स्वस्तात भोजन उपलब्ध करून देणारी योजना म्हणून शिवभोजन योजनेचा गाजावाजा केला जातो. दुसरीकडे हीच योजना प्रत्यक्षात राबविणाऱ्या केंद्र चालकांना त्यांच्या थकीत अनुदानासाठी कार्यालयांचे उंबरठे झिजवावे लागत आहेत. ११ महिने अनुदान रखडणे ही केवळ प्रशासकीय दिरंगाई नसून केंद्र चालकांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न बनला आहे.

### केंद्रे बंद पडण्याची मालिका सुरू

तेल्हारा तालुक्यातील तीन शिवभोजन केंद्रे आर्थिक परिस्थिती खालावल्यामुळे बंद पडल्याचे समोर आले आहे. अनुदानाची रक्कम वेळेवर मिळाली नाही आणि वाढत्या खर्चाचा भार केंद्र चालकांच्या खिशातूनच भागवावा लागला, तर भविष्यात आणखी केंद्रे बंद होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे शासनाची योजना कागदावर सुरू असली तरी प्रत्यक्षात ती राबविणाऱ्या केंद्र चालकांची आर्थिक कोंडी होत असल्याचे चित्र आहे.शिवभोजन केंद्र चालकांनी शासनाच्या योजनेवर विश्वास ठेवून केंद्रे सुरू केली. गरिबांना भोजन देण्याचे सामाजिक दायित्वही त्यांनी स्वीकारले. मात्र, त्याच केंद्र चालकांना ११ महिन्यांचे अनुदान मिळत नसेल, तर केंद्रे चालवायची कशी, असा सवाल आता उपस्थित होत आहे. महागाईच्या काळात भाडे, वीज, पाणी, कर्मचारी आणि खाद्यपदार्थांचा खर्च भागवून केंद्र सुरू ठेवणे दिवसेंदिवस कठीण होत असल्याचे चालकांचे म्हणणे आहे.

### 'गरिबांच्या ताटाला आधार' म्हणत चालकांचीच उपासमार का?

शिवभोजन योजनेचा मूळ उद्देश गरिबांच्या पोटाला आधार देणे हा आहे. मात्र, या योजनेची जबाबदारी खांद्यावर घेणाऱ्या केंद्र चालकांनाच आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत असेल, तर योजनेच्या नियोजनावर आणि निधी वितरणाच्या यंत्रणेवर प्रश्न उपस्थित होणे स्वाभाविक आहे. मंत्रालयीन यंत्रणेपासून स्थानिक प्रशासनापर्यंत योजना राबविण्याची जबाबदारी निश्चित असताना, केंद्र चालकांना त्यांच्या हक्काच्या पैशांसाठी महिनोन्?महिने प्रतीक्षा का करावी लागत आहे? अनुदानाचा निधी नेमका कुठे अडकला आहे? ११ महिन्यांची थकबाकी कधी मिळणार? आणि तोपर्यंत केंद्र चालकांनी खर्चाचा भार कसा उचलायचा, याचे उत्तर शासनाने देणे गरजेचे आहे. गरिबांना दोन वेळचे जेवण मिळावे म्हणून सुरू करण्यात आलेल्या योजनेत गरिबांच्या ताटात अन्न पोहोचविणारेच केंद्र चालक आर्थिक संकटात सापडत असतील, तर ही परिस्थिती गांभीर्याने घेण्याची गरज आहे. शासनाने केवळ घोषणा न करता ११ महिन्यांपासून रखडलेले अनुदान तातडीने वितरित करून केंद्र चालकांना आर्थिक दिलासा द्यावा, अशी मागणी होत आहे. अन्यथा उर्वरित शिवभोजन केंद्रांवरही टाळे लागण्याची वेळ येण्याची शक्यता आहे.

# आयफोन कंपनीला ग्राहकाला दुसरा आयफोन देण्याचे आदेश!

## आश्वासन देऊनही पूर्तता न केल्याने ग्राहक आयोगाचा दणका

## मानसिक त्रासापोटी २४ हजारांची नुकसानभरपाई

■ प्रतिनिधी | अकोला ■

ग्राहकाला दुसरा आयफोन देण्याचे आश्वासन देऊनही त्याची पूर्तता न करणाऱ्या आयफोन कंपनीला ग्राहक आयोगाने चांगलाच दणका दिला आहे. ग्राहकाला दुसरा आयफोन देण्याचे आदेश देतानाच त्याला झालेल्या मानसिक त्रास व गैरसोयीपोटी २४ हजार रुपयांची नुकसानभरपाई देण्याचे निर्देश आयोगाने दिले आहेत. ग्राहकाच्या हक्कांसाठी ॲड. संजय कमल अशोक देशमुख यांनी केलेल्या प्रभावी युक्तिवादानंतर हा निकाल ग्राहकाच्या बाजूने लागला.

संबंधित ग्राहकाने आयफोन कंपनीकडून खरेदी केलेल्या उत्पादनासंदर्भात तक्रार केली होती. त्यानंतर कंपनीकडून ग्राहकाला दुसरा आयफोन देण्याचे आश्वासन देण्यात आले. मात्र, आश्वासनाची पूर्तता न करता ग्राहकाला प्रत्यक्षात दुसरा आयफोन देण्यात आला नाही. त्यामुळे ग्राहकाला कंपनीकडे वारंवार पाठपुरावा करावा लागला. समस्या सोडविण्यासाठी वेळ आणि पैसा खर्च करूनही अपेक्षित तोडगा निघाला नाही.

अखेर ग्राहकाने आपल्या हक्कांसाठी ग्राहक आयोगाकडे धाव घेतली. या प्रकरणात ग्राहकाच्या वतीने ॲड. संजय कमल अशोक देशमुख यांनी बाजू मांडली. कंपनीने ग्राहकाला दुसरा आयफोन देण्याचे स्पष्ट आश्वासन दिले असताना त्याची अंमलबजावणी केली नसल्याचा मुद्दा त्यांनी आयोगासमोर ठामपणे मांडला. तसेच कंपनीच्या भूमिकेमुळे ग्राहकाला सहन करावा लागलेला मानसिक त्रास, गैरसोय आणि वारंवार केलेला पाठपुरावा याकडेही आयोगाचे लक्ष वेधले.

प्रकरणातील कागदपत्रे, उपलब्ध पुरावे आणि दोन्ही बाजूंचे म्हणणे विचारात घेतल्यानंतर ग्राहक आयोगाने ग्राहकाच्या बाजूने निर्णय दिला. कंपनीने ग्राहकाला दुसरा आयफोन द्यावा, असे आदेश आयोगाने दिले. याशिवाय ग्राहकाला झालेल्या मानसिक त्रासापोटी २४ हजार रुपयांची नुकसानभरपाई देण्याचेही निर्देश देण्यात आले.

### 'ग्राहकाच्या हक्कांकडे दुर्लक्ष झाल्यास न्याय मिळवून देता येतो'

याबाबत ॲड. संजय देशमुख यांनी सांगितले की, ग्राहकाने एखाद्या कंपनीकडून वस्तू किंवा सेवा घेतल्यानंतर त्याला दिलेले आश्वासन आणि सेवा यांची पूर्तता करणे ही संबंधित कंपनीची जबाबदारी आहे. ग्राहकाच्या हक्कांकडे दुर्लक्ष झाल्यास कायदेशीर मार्गाने त्याला न्याय मिळवून देता येतो.

........................

### कंपन्यांच्या आश्वासनांवर ग्राहकांचे हक्कही महत्त्वाचे

या निकालामुळे मोठ्या आणि नामांकित कंपन्यांकडून ग्राहकांच्या तक्रारींकडे दुर्लक्ष झाल्यास ग्राहकांना ग्राहक आयोगाच्या माध्यमातून कायदेशीर मार्गाने न्याय मिळवून घेता येतो, हे पुन्हा स्पष्ट झाले आहे. कंपनीने ग्राहकाला दिलेले आश्वासन तोंडी आश्वासन न राहता त्याची पूर्तता करणे आवश्यक असल्याचा या निकालातून मिळाला आहे.

# क्रांती दिनानिमित्त शूर स्वातंत्र्य सैनिकांना विनम्र अभिवादन!

**मालेगांव :** येथील तहसील कार्यालया जवळ बोरगाव रोड वरील श्री व्यंकटेश सेवा समिती वाशिम द्वारा संचालित बालविकास मंदिर प्राथ शाळा मालेगाव येथे क्रांतीदिन उत्साहात साजरा करण्यात आला. सदर कार्यक्रमाच्या अध्यक्षा वंदना गवई,प्रमुख अतिथी वंदना वाठोरे व शालिनी ठाकरे, कार्यक्रमाला उपस्थित होते. सदर कार्यक्रमाची सुरुवात क्रांतिवीर भगतसिंग यांच्या प्रतिमेची पूजन करून व हार अर्पण करून करण्यात आले. यानंतर मान्यवरांचे शाळेच्या वतीने रोपटे पुष्पगुच्छ व पुस्तक भेट देऊन स्वागत करण्यात आले. क्रांती दिनानिमित्त शाळेमध्ये गीत गायन स्पर्धा व वेशभूषा स्पर्धा आयोजन करण्यात आले. गीत गायन स्पर्धेत अनुक्रमे सिद्धार्थ गिरी, ईश्वरी सुरजुसे, प्राची कांबळे यांचे क्रमांक आले.तसेच वेशभूषा स्पर्धेत अपूर्वा पखाले,जानवी बोरचाटे,प्रणव शिंदे, ईश्वरी सुरजुसे,सोहम शिंदे यांचे अनुक्रमे क्रमांक आले. या स्पर्धांमध्ये शाळेतील ख्व १ ते सातवी पर्यंतचे विद्यार्थ्यांनी उत्साहात सहभाग घेतला.

# गुरूंना आदराची मानवंदना; गुरुपौर्णिमा उत्साहात साजरी

**मंगरुळपीर :** येथील यशवंतराव चव्हाण इंग्लिश हायस्कूलमध्ये गुरुपौर्णिमा उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. 'गुरु म्हणे आहे काशी, साती तीर्थ तथा पाशी...' या संत तुकाराम महाराजांच्या अभंगातील भावनेनुसार विद्यार्थ्यांनी गुरुजनांप्रती आदर व्यक्त करून त्यांना मानवंदना दिली. कार्यक्रमाची सुरुवात विद्यालयाच्या प्राचार्या शारा राजन यांनी सरस्वती पूजन करून केली. यावेळी शिक्षिका निधी बजाज व सपना बुधे यांनी विद्यार्थ्यांना गुरूंचे महत्त्व व गुरुपौर्णिमेचे आध्यात्मिक महत्त्व समजावून सांगितले.

# राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचा संघटन विस्तारावर भर

## महिला आघाडीच्या जिल्हा व तालुका कार्यकारिणीची घोषणा; नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना नियुक्तिपत्रांचे वाटप

■ प्रतिनिधी | अकोला ■

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या अकोला जिल्हा ग्रामीण संघटनात्मक बांधणीला वेग देण्यात येत असून, महिला आघाडीच्या जिल्हा व तालुका कार्यकारिणीची घोषणा करण्यात आली. नवनियुक्त महिला पदाधिकाऱ्यांना मान्यवरांच्या हस्ते नियुक्तिपत्रे प्रदान करण्यात आली.



अकोला येथील फार्मसी कॉलेजमध्ये जिल्हाध्यक्ष संग्रामभैय्या गावंडे यांच्या पुढाकाराने पक्षाची जिल्हा ग्रामीण आढावा व नियुक्ती बैठक पार पडली. यावेळी प्रदेश उपाध्यक्ष तथा जिल्हा निरीक्षक भीमराव हत्तीआंबेरे, प्रदेश उपाध्यक्ष डॉ. आशाताई मिरगे, जिल्हाध्यक्ष संग्रामभैय्या गावंडे आणि जिल्हा महासचिव आनंद वानखडे यांच्या प्रमुख उपस्थितीत नवनियुक्त महिला पदाधिकाऱ्यांना नियुक्तिपत्रे देण्यात आली.

महिला प्रदेशाध्यक्ष रोहिणीताई खडसे यांच्या मार्गदर्शनाखाली महिला जिल्हाध्यक्ष मनिषा महल्ले यांनी महिला आघाडीची जिल्हा व तालुका कार्यकारिणी जाहीर केली. यामध्ये जिल्हा महासचिवपदी छाया अब्रूक, जिल्हा सरचिटणीसपदी संगीताताई दाळु व योगिताताई सातपुते, जिल्हा सचिवपदी सरोज इंगळे, जिल्हा उपाध्यक्षपदी आशाताई गावंडे व चारुलता थिटे यांची नियुक्ती करण्यात आली. याशिवाय मंगलाताई गवारगुरू यांची तेल्हारा तालुका अध्यक्षपदी, नेहाताई भटकर यांची हिवरखेड शहर अध्यक्षपदी, वैशालीताई डिक्कर यांची अकोट तालुका अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली. अर्चनाताई ढोरे, स्वाती अरबट आणि राधाताई राऊत यांची जिल्हा कार्यकारिणी सदस्य म्हणून निवड करण्यात आली. यावेळी उपस्थित मान्यवरांनी नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करून पक्षाची संघटनात्मक बांधणी मजबूत करण्याचे आवाहन केले. जिल्ह्यात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे विचार तळागाळापर्यंत पोहोचविण्यासोबतच पक्षाच्या विस्तारासाठी सक्रियपणे कार्य करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

# 'मला आता चष्म्याशिवाय दिसतेय!'; कृष्णाच्या डोळ्यांत परतला प्रकाश

## नॅब आणि डॉ. श्रीराम लाहोळे यांच्या प्रयत्नांना यश ; ९५ टक्क्यांपर्यंत दृष्टी परत




■ प्रतिनिधी | अकोला ■

गेल्या २२ वर्षांपासून अंधुक दृष्टीच्या समस्येशी झुंज देणाऱ्या नांदेड जिल्ह्यातील ३२ वर्षीय कृष्णा वाकोरे यांच्या आयुष्यात अखेर प्रकाशाची पहाट झाली. नॅशनल असोसिएशन फॉर द ब्लाइंड (नॅब)च्या पुढाकाराने महाराष्ट्र राज्य नेत्र संघटनेचे पदाधिकारी तथा विदर्भ नेत्र संघटनेचे मानद सचिव नेत्रतज्ज्ञ डॉ. श्रीराम लाहोळे यांनी कृष्णाच्या डोळ्यावर आव्हानात्मक शस्त्रक्रिया केली. शस्त्रक्रियेनंतर अवघ्या तिसऱ्या दिवसापासून त्याची ९० ते ९५ टक्क्यांपर्यंत दृष्टी परत आली असून आता चष्म्याशिवायही त्याला स्पष्ट दिसू लागले आहे.

कृष्णाला वयाच्या दहाव्या वर्षापासून 'हाय मायोपिया' या गंभीर दृष्टीदोषाचा त्रास होता. त्याच्या डाव्या डोळ्याचा नंबर मायनस १२, तर उजव्या डोळ्याचा नंबर मायनस १८ इतका होता. त्यामुळे त्याला अतिशय जाड भिंगाचा चष्मा वापरावा लागत होता. या दृष्टीदोषामुळे त्याची दृष्टी केवळ पाच टक्क्यांपर्यंतच मर्यादित झाली होती. विशेष म्हणजे, प्रतिकूल परिस्थितीतही कृष्णाने शिक्षण पूर्ण करून बंगळुरू येथे सॉफ्टवेअर इंजिनिअर म्हणून आपली कारकीर्द सुरू ठेवली.

दृष्टी सुधारावी, या आशेने कृष्णाने नांदेडसह हैदराबाद, मुंबई आणि औरंगाबाद येथील नामांकित नेत्रतज्ज्ञांकडे उपचारासाठी धाव घेतली. मात्र, डोळ्यांची बुबुळे कमजोर असून नंबर अत्यंत जास्त असल्याने शस्त्रक्रिया धोकादायक असल्याचे



डॉक्टरांनी सांगितले. त्यासाठी चार ते पाच लाख रुपयांचा खर्च येऊ शकतो आणि शस्त्रक्रियेनंतर दृष्टी परत येण्याची हमी देता येणार नाही, असेही त्याला सांगण्यात आले. त्यामुळे निराश झालेल्या कृष्णाने दृष्टी सुधारण्याची आशा जवळपास सोडून दिली होती.

दरम्यान, कृष्णाच्या आजोबांची नॅबचे अकोला जिल्हाध्यक्ष प्रदीप खाडे आणि विकास अधिकारी विनोद शेगोकार यांच्याशी भेट झाली. आजोबांनी कृष्णाच्या डोळ्यांची संपूर्ण माहिती त्यांना दिली. त्यानंतर नॅबच्या पदाधिकाऱ्यांनी कृष्णाची वैद्यकीय कागदपत्रे मागवून ती डॉ. श्रीराम लाहोळे यांच्याकडे दाखविली. कृष्णाची वैद्यकीय स्थिती पाहिल्यानंतर डॉ. लाहोळे यांनी त्याच्यावर शस्त्रक्रिया करण्याचा निर्णय घेतला. 'कृष्णाचे ऑपरेशन यशस्वी करून दाखवू आणि त्याची दृष्टीही परत येईल,' असा विश्वास त्यांनी नॅबच्या पदाधिकाऱ्यांना दिला. त्यानंतर कृष्णाला अकोल्यात बोलावून त्याच्या डोळ्यांची सविस्तर तपासणी करण्यात आली. त्यानंतर त्याच्यावर अत्यंत कठीण आणि आव्हानात्मक नेत्रशस्त्रक्रिया करण्यात आली. शस्त्रक्रियेनंतर कृष्णाच्या दृष्टीत लक्षणीय सुधारणा झाली. तिसऱ्या दिवसापासूनच त्याला ९० ते ९५ टक्क्यांपर्यंत स्पष्ट दिसू लागले. विशेष म्हणजे, आता चष्म्याशिवायही त्याला व्यवस्थित पाहता येत आहे. तब्बल २२ वर्षांनंतर दृष्टी परत मिळाल्याने कृष्णाचा आनंद गगनात मावेनासा झाला आहे. कृष्णाच्या अंधकारमय जीवनात नव्या आशेचा प्रकाश निर्माण करणारी ही शस्त्रक्रिया ठरली असून, नॅबच्या सामाजिक उपक्रमातून एका युवकाला नवजीवन मिळाले आहे. शेतकरी नेते प्रकाश पोहरे आणि आमदार रणधीर सावरकर यांच्या पुढाकारातून स्थापन झालेली नॅशनल असोसिएशन फॉर द ब्लाइंड ही संस्था अंध व्यक्तींसाठी विविध उपक्रम राबवत आहे. कृष्णाच्या उपचारासाठी संस्थेचे उपाध्यक्ष श्रीराम शेगोकार, नेत्रतज्ज्ञ डॉ. नितीन उपाध्ये, मानद सचिव ॲड. नितीन गवळी, कोषाध्यक्ष अरुण सौदागर, सदस्य जयंत मसने, विजय सारभुकन, अविनाश पाटील, ॲड. मंजुषा ढवळे, चंदीवाले आदींचे सहकार्य लाभले.

# विदर्भ चेंबरच्या वतीने व्यापारी संवादची तयारी सुरू

■ प्रतिनिधी | अकोला ■

शतकोत्तर वर्षाकडे वाटचाल करणाऱ्या विदर्भ चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्री, अकोलाच्या वतीने व्यापारी संवाद सभा कार्यक्रम लवकर होत असून या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून जिल्ह्याचे पालकमंत्री ना आकाश फुंडकर यांना निमंत्रित करण्यात आले असून यात उपस्थित रहाण्याचे औपचारिक आमंत्रण देण्यात आले आहे.चेंबरचे अध्यक्ष नीरव वोरा यांनी पालकमंत्री ना. फुंडकर यांना पत्र प्रेषित केले आहे.

यात विदर्भ चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्री गेल्या ९३ वर्षांपासून पश्चिम विदर्भातील व्यापार, उद्योग व व्यवसाय क्षेत्राचे प्रतिनिधित्व करणारी प्रतिष्ठित संस्था असल्याचे नुमद करण्यात आले.

# ममता बॅनर्जींच्या ताफ्यावर हल्ला

## गाडीवर चिखल, चप्पल, बूट फेकले

**कोलकाता-** पश्चिम बंगालच्या माजी मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांना आज (ता. ९) उत्तर २४ परगणा जिल्ह्यात तीव्र विरोधाचा सामना करावा लागला. एका मृत तृणमूल कार्यकर्त्याच्या कुटुंबीयांचे सांत्वन करण्यासाठी जात असताना आंदोलकांनी त्यांच्या ताफ्याला घेरले. या वेळी आंदोलकांनी 'चोर-चोर'च्या घोषणा देत त्यांच्या गाडीवर चिखल फेकल्याचा आरोप आहे. ही घटना बीजपूर येथे घडली. मृत पक्ष कार्यकर्त्याच्या घरी जात असताना आंदोलकांच्या एका गटाने ममता बॅनर्जी यांच्या वाहनाला घेराव घातला.

माझ्या गाडीवर दगड, शूज आणि चिखल फेकून हल्ला करण्यात आला. माध्यमांशी बोलताना बॅनर्जी म्हणाल्या, 'माझ्या गाडीवर दगड, शूज आणि चिखल फेकून हल्ला करण्यात आला आहे. हा पूर्णपणे एक कट आहे. मी येथे येत असल्याची पूर्वकल्पना पोलिसांना दिली होती; तरीही पोलिसांनी सुरक्षेच्या आवश्यक त्या कोणत्याच उपाययोजना केल्या नाहीत. सध्या संपूर्ण पश्चिम बंगालवर गुंडांचे राज्य सुरू आहे.'

बॅनर्जी या शांतताप्रिय भागात 'शांतताभंग करण्यासाठी' आल्याचा आरोप आंदोलकांनी केला असून, निदर्शनादरम्यान त्यांच्याविरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. हलीसहर पोलिसांच्या



कोठडीत असताना प्रकृती बिघडल्याने या तृणमूल कार्यकर्त्याचा मृत्यू झाल्याचा आरोप आहे.

या प्रकरणी भाजपचे प्रदेशाध्यक्ष सुवेंदू अधिकारी म्हणाले, 'राज्यात कोणी माजी मुख्यमंत्र्यांच्या वाहनावर दगड, चिखल किंवा चप्पल फेकली, तर भाजप त्याचे समर्थन करत नाही. यात भाजपचा कोणताही कार्यकर्ता सामील नाही. राज्याच्या माजी महिला मुख्यमंत्र्यांसोबत असे वर्तन व्हावे, अशी आमची इच्छा नाही. असे घडल्यास भविष्यात पश्चिम बंगालचीच प्रतिमा मलीन होईल. आम्ही या घटनेचा निषेध करतो आणि जर अशी घटना घडली असेल, तर पोलीस त्यावर त्वरित कारवाई करतील.'

# दिल्लीत उद्या खासदार मोदींना भेटणार

## फडणवीस आणि जयंत पाटलांचा एकत्र प्रवास

**नवीदिल्ली-** मागील काही दिवसांपासून दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष एकत्र येणार असल्याच्या चर्चा सुरू आहेत. आमदार जयंत पाटील राज्यात मंत्रिपदाची शपथ घेणार असल्याचे बोलले जात होते. दरम्यान आता एका बाजूला दिल्लीत राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे आठ खासदार पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेणार आहेत. तर, दुसऱ्या बाजूला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे आमदार जयंत पाटील यांनी मुंबई ते कोल्हापूर असा एकत्र विमान प्रवास केला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे आज कोल्हापूर जिल्ह्याच्या दौऱ्यावर आहेत. या दौऱ्यादरम्यान त्यांच्यासोबत विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर आणि आमदार जयंत पाटील यांनी एकाच विमानाने प्रवास केला. आमदार जयंत पाटील हे आपल्या मतदारसंघाकडे जात असताना हा प्रवास घडल्याचे सांगण्यात येत असले, तरी या प्रवासामुळे राजकीय वर्तुळात चर्चा सुरू आहेत.गेल्या काही महिन्यांपासून राज्याच्या राजकारणात जयंत पाटील यांच्याबाबत वेगवेगळ्या चर्चा सुरू आहेत. त्यातच मुख्यमंत्र्यांसोबतच्या या प्रवासाने त्या चर्चांना पुन्हा एकदा बळ मिळाले आहे. जंतरमंतरवरील आंदोलनादरम्यान पक्षाध्यक्ष शरद पवार यांनी अभिजित दिपके यांची भेट घेतली होती आणि त्यानंतर काही वेळातच पंतप्रधान मोदी यांचीही भेट घेतली होती. आता शरद पवार गटाचे खासदार पुन्हा एकदा पंतप्रधानांच्या भेटीला जात असल्याने या भेटीमागे नक्की कोणते राजकीय संकेत आहेत, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. गेल्या काही दिवसांपासून दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस एकत्र येण्याबाबत, तसेच केंद्रामध्ये खासदार सुप्रिया सुळे यांच्या संभाव्य मंत्रिपदाबाबत विविध तर्क-वितर्क लावले जात आहेत.

# पंतप्रधान व सुप्रिया सुळेंच्या भेटीवर संजय राऊतांचे वक्तव्य

**मुंबइ/प्रतिनिधी**

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे खासदार आणि प्रवक्ते संजय राऊत यांनी पत्रकारांशी बोलताना केंद्र सरकार, भाजप आणि राज्य सरकारवर प्रश्नांची सरबत्ती केली. सुप्रिया सुळे-पंतप्रधान भेट, सर्वोच्च न्यायालयातील सत्तासंघर्ष, संसदेतील विरोधी पक्षांची गळचेपी आणि नाशिकमधील खड्ड्यांचा प्रश्न अशा विविध मुद्द्यांवर त्यांनी आपली रोखठोक भूमिका मांडली.

उद्धव ठाकरे यांनी घेतलेल्या पत्रकार परिषदेचा संदर्भ देत संजय राऊत म्हणाले, उद्धव ठाकरे यांनी मांडलेली भूमिका अत्यंत योग्य आहे. 'गेल्या १६ दिवसांपासून संसदेत विरोधी पक्ष पंतप्रधान येण्याची मागणी करत आहेत, तिथे ते येत नाहीत. पण अपात्रतेचा खटला सुरू असलेल्या ६ फुटीर खासदारांना पंतप्रधानांच्या निवासस्थानी ढोकळा, फाफडा आणि जिलेबी खायला घातली जाते. त्यांच्या निवासाने जणू केटरिंग सेवा सुरू केली आहे.'

मूळ पक्ष उद्धव ठाकरेंचाच विधिमंडळातील आमदार किंवा खासदार फुटले म्हणजे पक्षाची मालकी चोरट्यांकडे जात नाही. बाळासाहेब ठाकरेंनी पक्षाची सूत्रे उद्धव ठाकरेंकडे दिली होती आणि आम्ही सर्व मूळ पक्षासोबत आहोत. संविधान आणि सर्वोच्च न्यायालयाकडून आम्हाला निष्पक्ष न्यायाची अपेक्षा आहे, मेहेरबानीची नाही, असे राऊत म्हणाले.

सुप्रिया सुळे आणि शरद पवार यांच्या पंतप्रधान भेटीवर स्पष्टीकरण खासदार सुप्रिया सुळे आणि शरद पवार यांच्या राष्ट्रवादीच्या खासदारांनी पंतप्रधानांची घेतलेल्या भेटीबाबत होणाऱ्या चर्चांवर राऊतांनी स्पष्ट पडदा टाकला. 'माझे सुप्रियांशी बोलणे झाले आहे. महाविकास आघाडी किंवा 'इंडिया' आघाडीत कोणताही संभ्रम नाही. कोणीही कुठे जात नाही आणि महाविकास आघाडी सोडत नाही.'

पंतप्रधान आणि गृहमंत्री संसदेत येत नसल्यामुळे महाराष्ट्रातील अनेक खासदारांचे प्रश्न प्रलंबित आहेत. राष्ट्रवादीच्या दोन खासदारांच्या प्रश्नांसाठी सुप्रियाताईंनी सर्वांचे प्रश्न एकत्र केले आणि ८ खासदारांच्या शिष्टमंडळासह पंतप्रधानांची भेट घेतली. शरद पवार आमचे मार्गदर्शक असून त्यांची राष्ट्रवादी महाविकास आघाडीचा महत्त्वाचा घटक आहे, असे राऊत म्हणाले.

'शिंदे गट भाजपमध्ये विलीन होणार' सर्वोच्च न्यायालयात सुरू असलेल्या अपात्रतेच्या खटल्यामुळे आणि संविधानाच्या नियमांनुसार लवकरच शिंदे गटाला भारतीय जनता पक्षात विलीन व्हावे लागेल किंवा त्यांचे अस्तित्वच संपेल.

# एसआयआरच्या कामात हलगर्जीपणा

## उल्हासनगर महापालिकेच्या दोन कर्मचाऱ्यांवर गुन्हा दाखल

**उल्हासनगर/प्रतिनिधी**

मतदार यादीच्या विशेष सघन पुनरीक्षणाच्या (SIR) कामात हलगर्जीपणा केल्याचा ठपका ठेवत उल्हासनगर महानगरपालिकेच्या दोन कर्मचाऱ्यांविरोधात मध्यवर्ती पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सुंदर लांडगे आणि दिनेश मरोठिया अशी गुन्हा दाखल झालेल्या कर्मचाऱ्यांची नावे असून, दोघांचीही बूथ लेव्हल ऑफिसर (BLO) म्हणून नियुक्ती करण्यात आली होती.उल्हासनगर महापालिकेचे सहायक आयुक्त विशाल वसंत कदम यांनी याप्रकरणी पोलिसांत तक्रार दाखल केली आहे.

मतदार यादीच्या विशेष सघन पुनरीक्षण मोहिमेअंतर्गत दोन्ही कर्मचाऱ्यांवर मतदारांकडून ईएफ (EF) फॉर्मचे वाटप करून त्याचे डिजिटायझेशन करण्याची जबाबदारी सोपविण्यात आली होती.महापालिका आयुक्त मनीषा आव्हाळे आणि एसडीओ विजयआनंद शर्मा यांच्या उपस्थितीत ४ ऑगस्ट रोजी एसआयआरच्या कामाचा आढावा घेण्यासाठी बैठक घेण्यात आली. या बैठकीत दोन्ही BLO ची कामगिरी अपेक्षेप्रमाणे नसल्याचे निदर्शनास आले.

सुंदर लांडगे यांनी आतापर्यंत केवळ ८३.१७ टक्के ईएफ फॉर्मचे वाटप पूर्ण केले असून, त्यापैकी २२.६७ टक्के कामाचे डिजिटायझेशन झाले आहे. तर दिनेश मरोठिया यांनी ९४.०४ टक्के फॉर्मचे वाटप पूर्ण केले असून, केवळ २८.४८ टक्के कामाचे डिजिटायझेशन केले आहे.

दोन्ही कर्मचाऱ्यांना एसआयआरचे काम १०० टक्के पूर्ण करण्यासाठी महापालिका प्रशासनाकडून वारंवार तोंडी आणि लेखी सूचना देण्यात आल्या होत्या. तसेच व्हॉट्सॲप संदेशाद्वारेही काम पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले होते. याशिवाय संबंधित कर्मचाऱ्यांना २८ जुलै रोजी कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली होती.मात्र, वारंवार सूचना देऊनही दोन्ही कर्मचाऱ्यांच्या कामात अपेक्षित सुधारणा झाली नसल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. आढावा बैठकीत देण्यात आलेल्या सूचनांनंतरही त्यांनी कामाची गती वाढविली नसल्याचा आरोप आहे.

दरम्यान, एसआयआरचे काम निर्धारित वेळेत पूर्ण करण्यासाठी महापालिका प्रशासनाकडून BLO च्या कामावर बारकाईने लक्ष ठेवले जात असतानाच दोन कर्मचाऱ्यांवर थेट गुन्हा दाखल झाल्याने महापालिका वर्तुळात खळबळ उडाली आहे. या प्रकरणी लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५० मधील कलम ३२ अंतर्गत मध्यवर्ती पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस करीत आहेत.

# मी काँग्रेसचे आभार मानते...!

## सुनेत्रा पवारांच्या 'गुंगी गुडिया'च्या टीकेवर सुप्रिया सुळेंची प्रतिक्रिया

**मुंबई-** काही दिवसांपूर्वी महाराष्ट्र काँग्रेसच्या अधिकृत सोशल मीडिया खात्यावरून उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवारांवर टीका करणारी एक पोस्ट करण्यात आली होती. त्यामध्ये सुनेत्रा पवारांचा गुंगी गुडिया असा उल्लेख करण्यात आला होता. यावरून राज्यभर संतापाची लाट उसळली. काँग्रेसने आपलं विधान मागे घ्यावं, अशीही मागणी करण्यात आली. मात्र, महाराष्ट्र काँग्रेस आपल्या वक्तव्यावर ठाम होता. दरम्यान, आता यावर सुनेत्रा पवारांच्या वहिनी आणि खासदार सुप्रिया सुळे यांनी प्रतिक्रिया दिली आहे.

माध्यमांशी बोलताना त्यांना याबाबत विचारण्यात आलं होतं. तेव्हा सुप्रिया सुळे म्हणाल्या, सुनेत्रा वहिनींनीबद्दल काँग्रेसने केलेलं वक्तव्य अयोग्यच होतं. मी स्वतः काँग्रेसच्या नेत्यांशी बोलले आहे. मी काँग्रेसच्या नेतृत्त्वाचे आभार मानते. कारण, मी काँग्रेसशी बोलल्यानंतर अर्ध्या तासात



काँग्रेसने त्यांची भूमिका स्पष्ट केली.'

'काँग्रेसची जी महाराष्ट्रातील स्थानिक सोशल मिडिया टीम आहे, त्यांच्याकडून हे वक्तव्य झालेलं आहे. हे राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचं मत नाही. त्यामुळे मला असं वाटतं की महाराष्ट्र आणि देशातील काँग्रेस यांच्यात वेगळी मतं आहे. केंद्रातील काँग्रेस पक्षाने स्पष्ट भूमिका केली आहे की, कोणत्याही महिलेबद्दल किंवा कोणाही व्यक्तीबद्दल अशी टीका का करावी. टीका करायला मराठी भाषेत खूप ताकद आहे', असंही त्या म्हणाल्या.'टीका करायची असेल तर अनेक शब्दांनी टीका केली जाते, पण कोणाचाही अपमान होईल, अशी टीका करू नये, असं आमचं मत आहे. कोणत्याही व्यक्तीबद्दल टोकाची भूमिका घेणं हे मराठी संस्कृतीला न शोभणारं आहे. माझी काँग्रेसला विनंती आहे की जे झालं ते सोडून देऊया. केंद्रातील काँग्रेसने मनाचा मोठेपणा दाखवून निर्णय घेतला आहे', असंही त्या पुढे म्हणाल्या. सुनेत्रा पवारांना बीडमधील कायदा-सुव्यवस्थेबाबत माध्यमांनी प्रश्न विचारला होता. मात्र, या प्रश्नावर धनंजय मुंडे यांनी पत्रकाराला रोखलं. सुनेत्रा पवारांना बोलू दिलं नाही. हाच व्हिडिओ महाराष्ट्र काँग्रेसने शेअर केला. व्हिडिओ शेअर करताना 'सुनेत्रा पवार, अजून किती दिवस 'गुंगी गुडिया' बनून राहतील?' असा प्रश्नही महाराष्ट्र काँग्रेसने विचारला.

# जेवणात ताटात टोकदार वस्तू आढळल्याने खळबळ

**नागपूर-** रेस्टॉरंटमध्ये जेवण करत असताना कुटुंबातील महिलेच्या तोंडात टोकदार वस्तू आढळल्याने खळबळ उडाली. जेवणातून बाहेर काढल्यानंतर ती वस्तू ब्लेड असल्याचे लक्षात आले, असा संबंधित कुटुंबाचा आरोप आहे. या घटनेनंतर अन्नपदार्थांच्या स्वच्छतेचा आणि सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. याप्रकरणी बजाजनगर पोलीस ठाण्यात तक्रार करण्यात आली आहे.

प्रतापनगर परिसरातील एका रेस्टॉरंटमध्ये कुटुंब जेवणासाठी गेले होते. भोजन करताना कुटुंबातील एका महिलेच्या तोंडात अचानक टोकदार वस्तू आल्याचे जाणवले. तिने ती वस्तू तोंडातून बाहेर काढल्यानंतर ती ब्लेड असल्याचे दिसून आले, अशी माहिती कुटुंबीयांनी दिली. या प्रकारामुळे कुटुंबीयांना धक्का बसला. घटनेनंतर संबंधित कुटुंबाने याबाबत बजाजनगर पोलीस ठाण्यात तक्रार केली. मात्र, या घटनेबाबत अन्न व औषध प्रशासनाकडे अद्याप अधिकृत तक्रार प्राप्त झालेली नसल्याचे विभागाकडून स्पष्ट करण्यात आले आहे. संबंधित रेस्टॉरंटचे नाव उत्तर-दक्षिण नैवेद्यम रेस्टॉरंट असल्याचे समोर आले आहे. दरम्यान, नागपूर शहरातील हॉटेल, रेस्टॉरंट, खाद्य आस्थापना तसेच वसतिगृहांच्या मेसमधील अस्वच्छतेबाबत गेल्या २४ दिवसांत अन्न व औषध प्रशासनाकडे १२१ तक्रारी दाखल झाल्या आहेत.

# वाचकांपर्यंत पुस्तके घेऊन जाणारा पुस्तकपेटी उपक्रमच प्रेरणादायी -प्रा. लीला शिंदे

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी**

आजच्या काळात वाचकांपर्यंत पुस्तके घेऊन जाणारा पुस्तकपेटी सारखा उपक्रम महत्वाचा आहे असे मत सुप्रसिद्ध बालसाहित्यिक प्रा.लीला शिंदे यांनी व्यक्त केले.

येथील संडे क्लब आणि देशपांडे परिवाराच्या वतीने दिला जाणारा श्याम देशपांडे स्मृती ग्रंथसखा पुरस्कार परभणी येथील डॉ.पवन चांडक यांना आज प्रदान करण्यात आला.अकरा हजार रुपये आणि स्मृतिचिन्ह असे या पुरस्काराचे रूप आहे.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा.शिंदे होत्या .यावेळी व्यासपीठावर सतीश चिमणपुरे , डॉ.चांडक आणि श्रीमती शुभांगी देशपांडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

जिल्हा परिषद आणि महानगरपालिकांच्या शाळांमधून शिकणाऱ्या मुलांमुलींपाशी चांगली सृजनशीलता आहे. त्यांच्यापर्यंत प्रेरणादायी साहित्य पोहचणे आवश्यक आहे. चांडक यांच्या पुस्तकपेटीचा उपक्रम ही जबाबदारी पार पाडत असल्याबद्दल त्यांचे कौतुक करताना प्रा.शिंदे यांनी लोकसहभागातून हा उपक्रम विस्तारत जाईल अशी अपेक्षा व्यक्त केली.

विद्यार्थ्यांची मोबाईल तसेच टेलिव्हिजन पाहण्याची सवय प्रयत्नपूर्वक कमी करता



येते.पुस्तकपेटीच्या माध्यमातून आपण असा प्रयत्न करीत आहोत.या प्रयत्नात पालक - शिक्षकांसह समाजातील विविध घटकांचे सहकार्य लाभत आहे .या कामासाठी आपण जिल्हा परिषद शाळांमधील विद्यार्थीवर्ग हे लक्ष्य जाणीवपूर्वक निवडले आहे असे नमूद करीत डॉ.चांडक यांनी पुस्तकपेटीच्या माध्यमातून केवळ वाचनच नव्हे तर एकूणच अभिव्यक्तीची सवय रुजविण्यासाठी प्रयत्न केले जात असल्याचे सांगितले.

एकीकडे वाचनालयांत येणाऱ्या वाचकांची संख्या रोडावत असली तरी पुस्तक प्रदर्शनात उदंड गर्दी होत असल्याचे आपण पाहतो.वाचकांपर्यंत पोहचण्यासाठी विविध मार्गांनी सातत्याने प्रयत्न करावे लागतील आणि त्यात समाजाचा सहभाग मिळवत राहावे लागेल असे श्री.चिमणपुरे यांनी सांगितले.सखोल वाचन हाच ज्ञान मिळवण्याचा विश्वसनीय मार्ग आहे असे ते म्हणाले. सर्वच वक्त्यांनी वाचक-लेखकांशी भावबंध निर्माण करण्याच्या श्याम देशपांडे यांच्या वृत्तीचे स्मरण करून देत त्यांना आदरांजली अर्पण केली. डॉ.चांडक यांच्या पुस्तकपेटीसाठी दिवंगत डॉ. सविता पानट यांच्या संग्रहातील पुस्तके यावेळी देण्यात आली. त्यांच्या कन्या सोनाली धोपटे आणि स्नुषा डॉ. वीणा पानट यांनी ही पुस्तके सोपविली. यावेळी सोनाली धोपटे यांनी त्यांच्या भावना व्यक्त केल्या..प्रा.शिंदे यांनीही त्यांची काही पुस्तके डॉ.चांडक यांच्याकडे सोपविली. प्रारंभी नीरा देवकते, पृथा वीर, माधुरी देशपांडे यांनी स्वागत केले. अप्रूप देशपांडे यांनी आभार मानले.

# बारामती विमानतळावर पुन्हा एकदा विमान अपघात!

## लँडिंग दरम्यान प्रशिक्षण विमान धावपट्टीवरून घसरले

**बारामती-** बारामती विमानतळावर ९ ऑगस्टला पुन्हा एकदा विमानाचा अपघात झाल्याची धक्कादायक घटना घडली. लँडिंग करत असताना एका खासगी विमान प्रशिक्षण संस्थेचे विमान धावपट्टीवरून खाली घसरून अपघातग्रस्त झाले. सुदैवाने या दुर्घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नसून दोन्ही वैमानिक बालंबाल बचावले आहेत.

आज दुपारी बारामती विमानतळावर 'कार्व्हर एव्हिएशन' (Carver Aviation) या खासगी कंपनीचे 'सेस्ना १७२' (Cessna १७२) हे प्रशिक्षण विमान लँड करत असताना धावपट्टीवरून खाली घसरले.प्रत्यक्षदर्शींच्या प्राथमिक माहितीनुसार, विमान लँडिंगच्या वेळी अत्यंत कमी उंचीवर उडत असताना त्यात तांत्रिक बिघाड झाला. लँडिंग दरम्यान विमानाचा एक भाग शेजारील लाईटच्या खांबाला धडकला आणि विमान धावपट्टीच्या हद्दीबाहेर जाऊन कोसळले.

या घटनेच्या वेळी विमानात प्रशिक्षक आणि प्रशिक्षणार्थी असे दोन जण सवार होते. अपघातात विमानाचे काही प्रमाणात नुकसान झाले असले, तरी दोन्ही वैमानिकांना कोणतीही गंभीर दुखापत झालेली नाही. घटनेची माहिती मिळताच स्थानिक पोलीस आणि विमानतळ प्रशासनाने तातडीने घटनास्थळी धाव घेतली. 'कार्व्हर एव्हिएशनच्या सेस्ना १७२ विमानाचे लँडिंग करत असताना अपघात झाला असून ते धावपट्टीवरून घसरले. विमानात दोन व्यक्ती होत्या आणि त्या दोघेही सुरक्षित आहेत.



विमानामध्ये नेमका तांत्रिक बिघाड झाला होता की अन्य काही कारणांमुळे हा अपघात घडला, याचा सखोल तपास पोलीस आणि संबंधित यंत्रणा करत आहेत.' अशी माहिती पुण्याचे पोलीस अधीक्षक संदीप सिंह गिल यांनी दिली. बारामती विमानतळावरील या अपघातामुळे सात महिन्यांपूर्वी घडलेल्या भीषण दुर्घटनेच्या कटू आठवणी पुन्हा ताज्या झाल्या आहेत. २८ जानेवारी २०२६ रोजी याच बारामती विमानतळावर महाराष्ट्राचे तत्कालीन उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमानाला भीषण अपघात झाला होता. 'व्हीएसआर व्हेंचर्स' कंपनीच्या 'लियरजेट ४५' या चार्टर्ड विमानाचे दुसऱ्यांदा लँडिंग करण्याचा प्रयत्न सुरू असताना झालेल्या या अपघातात अजित पवार यांच्यासह ५ जणांचा मृत्यू झाला होता. या दुर्दैवी घटनेत अजित पवार, त्यांचे सुरक्षा रक्षक, अटेंडंट आणि दोन वैमानिक (कॅप्टन सुमित कपूर व सह-वैमानिक शांभवी पाठक) यांना प्राण गमवावे लागले होते.

'कार्व्हर एव्हिएशन' आणि 'रेडबर्ड फ्लाईट ट्रेनिंग अकॅडमी' या दोन प्रमुख वैमानिक प्रशिक्षण संस्था कार्यरत असून तिथे शेकडो विद्यार्थी विमान चालवण्याचे धडे घेतात. मात्र, या प्रशिक्षण केंद्रांच्या विमानांचे वारंवार होणारे अपघात आता गंभीर चिंतेचा विषय बनले आहेत. यापूर्वी १३ मे रोजी 'रेडबर्ड' अकॅडमीच्या एका प्रशिक्षण विमानाचा बारामती विमानतळाजवळील गोजुबावी गावाजवळ सकाळी ८:५० वाजेच्या सुमारास अपघात झाला होता. त्यावेळी सुदैवाने प्रशिक्षणार्थी वैमानिक सुरक्षित बचावला होता. रेडबर्डच्या विमानांचे यापूर्वीही २ ते ३ वेळा अपघात घडले आहेत. आता कार्व्हर एव्हिएशनच्या विमानाचा अपघात झाल्याने बारामतीमधील प्रशिक्षण विमानांची देखभाल, तांत्रिक दुरुस्ती आणि सुरक्षेच्या मानकांवर पुन्हा एकदा गंभीर प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

# सिंदूर महारक्तदान यात्रेतून जवानांना सलाम

**नवी दिल्ली/प्रतिनिधी**

देशाच्या सीमेवर कर्तव्य बजावणाऱ्या जवानांच्या त्यागाला सलाम करण्यासाठी दिल्लीमध्ये 'सिंदूर महारक्तदान व यात्रा शिबिरा'चे आयोजन करण्यात आले. शिवसेनेच्या वतीने क्रांतिदिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमात महाराष्ट्रातील विविध भागांतून आलेले कार्यकर्ते, शिवसैनिक, पैलवान आणि रक्तदाते सहभागी झाले. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी रक्तदात्यांचे कौतुक करत जवानांच्या सन्मानासाठी रक्तदान करण्याचे आवाहन केले.

केंद्रीय संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम पार पडला. यावेळी बोलताना एकनाथ शिंदे यांनी सीमेवर देशाचे रक्षण करणाऱ्या जवानांमुळे नागरिक सुरक्षितपणे जीवन जगत असल्याचे सांगितले. जवानांच्या त्यागाची जाणीव समाजाला करून देणे आणि त्यांच्या सन्मानासाठी रक्तदानाच्या



एकनाथ शिंदेंचा रक्तदानाचा संदेश

माध्यमातून योगदान देणे हा या उपक्रमामागचा उद्देश असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.रक्तदानामुळे गरजू रुग्णाचा जीव वाचू शकतो. त्यामुळे रक्तदान ही केवळ सामाजिक सेवा नसून देशसेवेचाही एक मार्ग आहे, असे शिंदे यांनी सांगितले. महाराष्ट्रातील रक्तदात्यांनी जवानांच्या सन्मानासाठी घेतलेला पुढाकार कौतुकास्पद असल्याचेही त्यांनी नमूद केले. देशहित आणि राष्ट्रसेवा ही राजकीय चौकटीपेक्षा मोठी असल्याचे सांगताना शिंदे यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या शौर्य आणि स्वाभिमानाच्या परंपरेचा उल्लेख केला. देशांतर्गत संरक्षण उत्पादन, आधुनिक तंत्रज्ञान आणि लष्करी सामर्थ्यामुळे भारत अधिक सक्षम होत असल्याचे शिंदे यांनी सांगितले.महाराष्ट्राच्या कुस्ती क्षेत्रानेही या रक्तदान मोहिमेला साथ दिली. महाराष्ट्र डबल केसरी चंद्रहार पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक पैलवान आणि कार्यकर्त्यांनी रक्तदान केले. जवानांच्या सन्मानासाठी पैलवानांनी घेतलेला हा सहभाग सामाजिक बांधिलकीचे उदाहरण असल्याचे शिंदे यांनी म्हटले. कार्यक्रमाला केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव, खा.डॉ. श्रीकांत शिंदे, मंत्री उदय सामंत, लष्करी अधिकारी, शिवसेना पदाधिकारी आणि मोठ्या संख्येने रक्तदाते उपस्थित होते. जवानांचा सन्मान आणि देशसेवा या भावनांना एकत्र आणत 'सिंदूर महारक्तदान' उपक्रमातून जवानांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यात आली.

# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक २५४ ■ सोमवार, १० ऑगस्ट २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.


## कागदपत्रांवरून वाद पेटला; संतप्त चालकाने समृद्धी महामार्ग रोखला

### समृद्धीवर कंटेनर राजःचालक पसार, येळाकेळीपर्यंत वाहनांच्या रांगा



**वर्धा जनमाध्यम :** आरटीओच्या कारवाईने संतप्त झालेल्या कंटेनर चालकाने थेट समृद्धी महामार्गालाच वेठीस धरल्याचा प्रकार रविवारी दुपारी घडला. नागपूरहून मुंबईकडे जाणाऱ्या लेनवर चालकाने कंटेनर आडवा लावल्याने सुमारे तासभर वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली. परिणामी, येळाकेळी इंटरचेंजपर्यंत वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या.

एच.आर. ५५ बी.ए. ८५४४ क्रमांकाचा कंटेनर नागपूरहून मुंबईकडे जात होता. गणेशपूर परिसरातील पेट्रोल पंपाजवळ एआरटीओ पथकाने वाहन अडवून कागदपत्रांची तपासणी केली. कागदपत्रांमध्ये त्रुटी आढळल्याने चालकावर दंडात्मक कारवाई करण्यात आली. वाहनाची कागदपत्रे पथकाने ताब्यात घेतल्याचे सांगण्यात येते.

कारवाईनंतर चालक बराच वेळ वाहनासह थांबूनही कागदपत्रे परत न मिळाल्याने त्याचा संताप अनावर झाला. दुपारी साडेचारच्या सुमारास त्याने मुंबई लेनवर कंटेनर आडवा लावत 'रस्ता बंद' आंदोलनच उभारले. कंटेनर आडवा होताच वाहनांची कोंडी झाली.

काही चालकांनीही त्याला पाठिंबा दिल्याने परिस्थिती अधिकच गंभीर बनली. माहिती मिळताच महामार्ग पोलिस व सावंगी (मेघे) पोलिस घटनास्थळी दाखल झाले. मात्र, तोपर्यंत चालक पसार झाला होता. पोलिसांनी कंटेनर बाजूला करून वाहतूक सुरळीत केली. चालकाविरुद्ध कायदेशीर कारवाईची प्रक्रिया सुरू आहे.

कंटेनर आडवा लावल्याची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत वाहतूक सुरळीत केली. चालक फरार असून त्याच्याविरुद्ध नियमानुसार कारवाई करण्यात येईल.

विनोद गिरी, ठाणेदार, सावंगी (मेघे)

## ३० कोटींच्या बसस्थानकाची पोलखोल; जनमाध्यमच्या दणक्यानंतर खासदार अमर काळे मैदानात

### सेलू बस स्थानकात दाखल : निकृष्ट कामावर संताप, चौकशीची मागणी

**सेलू जनमाध्यम :** कोट्यवधींचा निधी, भव्य इमारत, अत्याधुनिक सुविधांच्या घोषणा आणि उद्घाटनानंतर अवघ्या दीड-दोन वर्षांत छताचा भाग कोसळतो मग हा विकास नेमका कुणासाठी जनतेच्या सोयीसाठी उभारलेल्या सेलू बसस्थानकाच्या निकृष्ट कामाचा हा धक्कादायक नमुना समोर आल्यानंतर आता ३० कोटींच्या खर्चाचा हिशेब मागितला जात आहे. तीस कोटी रुपये खर्च करून नेमके काय उभारले ताजमहाल बांधला का असा प्रश्न खासदार अमर काळे यांनी उपस्थित केला.

गुरुवारी रात्री सेलू बसस्थानकाच्या छताचा मोठा भाग अचानक कोसळला. सुदैवाने त्या वेळी प्रवासी अथवा कर्मचारी त्या भागात नसल्याने मोठी जीवितहानी टळली. मात्र, या घटनेने बसस्थानकाच्या बांधकामाच्या गुणवत्तेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

**जनमाध्यमच्या बातमीचा दणका; खासदार थेट बसस्थानकात**

बसस्थानकाच्या निकृष्ट कामाबाबत यापूर्वीही स्थानिक पातळीवर तक्रारी आणि वृत्तांकन झाले होते. छताला गळती, पावसाचे पाणी आत येणे, जोरदार वाऱ्यात मुख्य नामफलक उडून जाणे, अशा प्रकारांमुळे या इमारतीच्या गुणवत्तेचा प्रश्न आधीपासूनच चर्चेत होता. मात्र, संबंधित यंत्रणेकडून त्याची गांभीर्याने दखल घेण्यात आली नसल्याचा आरोप नागरिकांकडून होत आहे.



अखेर छताचा भाग कोसळल्यानंतर हा प्रश्न ऐरणीवर आला. 'जनमाध्यम'च्या सातत्यपूर्ण वृत्तांकनानंतर खासदार अमर काळे यांनी रविवारी दुपारी सेलू बसस्थानकाला भेट देत प्रत्यक्ष पाहणी केली. त्यांच्या भेटीने प्रशासनाचीही धावपळ उडाली.

**३० कोटी गेले कुठे?**

पाहणीदरम्यान खासदार काळे यांनी बसस्थानकाच्या कामाच्या दर्जाबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली. ३० कोटी रुपयांचा खर्च झालेल्या वास्तूची अशी अवस्था होत असेल तर या खर्चाचा तपशील जनतेसमोर आला पाहिजे, अशी भूमिका त्यांनी मांडली.

इतका मोठा खर्च नेमका कुठे झाला, या इमारतीत असे काय आहे की ३० कोटी रुपये खर्च झाले, असा प्रश्न उपस्थित करत त्यांनी संपूर्ण बांधकामाची तांत्रिक तपासणी करण्याची मागणी केली.

निधी जनतेचा आणि धोका जनतेच्याच जीवाला, हे चालणार नाही, दोष आढळल्यास संबंधित कंत्राटदार, अभियंते आणि जबाबदार अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करून कठोर कारवाई झाली पाहिजे, अशी मागणीही त्यांनी यावेळी केली.

**उद्घाटनानंतरच गुणवत्तेचे पितळ उघडे**

स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, बसस्थानक सुरू झाल्यानंतर काही महिन्यांतच त्याच्या कामाच्या गुणवत्तेबाबत प्रश्न उपस्थित होऊ लागले होते. जोरदार वाऱ्यामुळे मुख्य नामफलक उडून जाणे, पावसाळ्यात छताला गळती लागणे आणि प्रवाशांना इमारतीत असूनही पावसापासून बचावासाठी छत्रीचा आधार घ्यावा लागणे, अशा तक्रारी होत्या.

मग या तक्रारींकडे वेळेत लक्ष का दिले गेले नाही, छताची नियमित तपासणी झाली होती का, बांधकामाच्या गुणवत्तेची तांत्रिक पाहणी झाली होती का, ३० कोटींच्या कामाचे गुणवत्ता नियंत्रण नेमके कुणाच्या देखरेखीखाली झाले, हे प्रश्न आता सेलूकरांच्या तोंडावर आहेत.

**चौकशीच्या अहवालाकडे सेलूकरांचे लक्ष**

या संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष तांत्रिक चौकशी करून बांधकामात दोष आढळल्यास जबाबदार व्यक्तींवर कारवाई करावी, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे. सार्वजनिक निधीचा अपव्यय झाला आहे का, बांधकामाच्या गुणवत्तेत त्रुटी आहेत का आणि देखरेखीत हलगर्जीपणा झाला का, याचा खुलासा चौकशीतून होणे आवश्यक आहे. खासदार अमर काळे यांच्या पाहणीमुळे या प्रकरणाला राजकीय धार मिळाली असून ३० कोटींच्या बसस्थानकाच्या 'विकासाचा' हिशेब आता जनतेसमोर येणार का हा प्रश्न उपस्थित झाला आहे.

पाहणीवेळी शेखर शेंडे, अभ्युदय मेघे, अमर गुंधी, माजी उपनगराध्यक्ष चुडामन हांडे, रामू पवार, शुभम झाडे, योगेश गुजरकर यांच्यासह विविध मान्यवर, पदाधिकारी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## हिंगणघाटच्या मुख्य रस्त्यावर चेनस्नॅचिंगचा थरार! ७४ वर्षीय महिलेच्या गळ्यातील सोन्याची चेन लंपास

### तोंडाला रुमाल, डोक्यावर टोपी अन् दुचाकीवरून चोरट्याचे पलायन

**हिंगणघाट जनमाध्यम :** शहरातील मुख्य मार्गावर रविवारी सकाळी चेनस्नॅचिंगची घटना घडल्याने शहरात खळबळ उडाली आहे. गांधी वॉर्ड परिसरात एका ७४ वर्षीय महिलेच्या गळ्यातील तब्बल १७ ग्रॅम वजनाची सोन्याची चेन चोरट्याने हिसकावून नेली. चेन ओढताना झालेल्या झटापटीत महिला रस्त्यावर कोसळल्याने त्यांच्या डोक्याला दुखापत झाली.



इंदुमती रमेशचंद्र सिंघवी (७४) या रेल्वे उड्डाणपुलालगत गांधी वॉर्ड परिसरात राहतात. रोज सकाळी रेल्वे उड्डाणपुलापासून कारंजा चौकापर्यंत पायी फिरणे हा त्यांचा नित्यक्रम आहे. रविवारीही त्या नेहमीप्रमाणे सकाळी फिरण्यासाठी घराबाहेर पडल्या होत्या.

सकाळी साडेसहाच्या सुमारास कारंजा चौकाच्या अलीकडे त्या पायी जात असताना तोंडाला रुमाल बांधलेला आणि डोक्यावर टोपी घातलेला एक इसम वाहन रस्त्याच्या कडेला उभे करून त्यांच्या मागून आला. क्षणात त्याने सिंघवी यांच्या गळ्यातील सोन्याची चेन हिसकावली. अचानक झालेल्या या हल्ल्यामुळे झालेल्या झटापटीत त्या रस्त्यावर पडल्या.

दरम्यान, जवळून जाणाऱ्या एका व्यक्तीने धाव घेत महिलेची विचारपूस केली. याच गोंधळाचा फायदा घेत चोरटा दुचाकीवरून घटनास्थळावरून पसार झाला. संबंधित व्यक्तीने चोरट्याचा पाठलाग करण्याचा प्रयत्न केला मात्र तो हाती लागला नाही.

विशेष म्हणजे, कामकाजाच्या दिवशी सकाळी या मार्गावर विद्यार्थी आणि नागरिकांची मोठी वर्दळ असते. मात्र रविवारी सकाळी रस्त्यावर तुलनेने सामसूम असल्याची संधी साधून चोरट्याने डाव साधल्याची चर्चा आहे.

घटनेची माहिती मिळताच हिंगणघाट पोलिसांनी तपासाला वेग दिला. तक्रारीवरून गुन्हा दाखल करण्यात आला असून चोरट्याचा माग काढण्यासाठी चार पोलिस पथके तयार करण्यात आली आहेत. घटनास्थळासह शहरातील विविध मार्गांवरील सीसीटीव्ही फुटेज तपासले जात असून चोरट्याची ओळख पटविण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

दिवसाढवळ्या मुख्य मार्गावर वृद्ध महिलेच्या गळ्यातील सोन्याची चेन हिसकावून नेल्याने नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

## आरोग्य राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर आज वर्ध्यात

**वर्धा जनमाध्यम :** राज्याच्या सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण, पाणी पुरवठा व स्वच्छता, ऊर्जा, महिला व बाल विकास, सार्वजनिक बांधकाम राज्यमंत्री मेघना दिपक साकोरे-बोर्डीकर आज जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत असून सकाळी ८ वाजता वर्धा येथे आगमण व राखीव.

सकाळी ९ वाजता उपजिल्हा रुग्णालय हिंगणघाट येथे ४०० खाटांच्या रुग्णालयाच्या मुख्य इमारत बांधकामाच्या पायाभरणी कार्यक्रमास उपस्थिती. सकाळी १० वाजता अनुसया पॅलेस, शहालंगडी रोड, हिंगणघाट येथे आयोजित महाआरोग्य शिबिराच्या उद्घाटन कार्यक्रमास उपस्थित राहतील. दुपारी ३.३० वाजता नियोजन सभागृह, जिल्हाधिकारी कार्यालय, वर्धा येथे महिला बचतगटाच्या स्वप्नांना भरारी कृतज्ञता सोहळा कार्यक्रमास उपस्थित राहतील. त्यानंतर सोईनुसार परभणीकडे प्रयाण करतील.

## दैनंदिन आहारात रानभाज्यांचा समावेश आवश्यक-पालकमंत्री

### पालकमंत्र्यांच्याहस्ते रानभाजी महोत्सवाचे उद्घाटन

**वर्धा जनमाध्यम :** सकस आहार प्रत्येकाच्या शरीराची गरज आहे. अलिकडे आपण सेवन करत असलेला आहार किती आरोग्यदायी आहे, याबाबत प्रत्येकाच्याच मनात शंका असते. आरोग्य सुदृढ राहण्यासाठी सकस, शुद्ध आणि चांगले खाद्य शरीरात जाणे आवश्यक आहे. त्यामुळे विशिष्ट कालावधीत उपलब्ध होणाऱ्या आणि नैसर्गिकरित्या तयार होणाऱ्या रानभाज्या प्रत्येकानेच आपल्या आहारातला एक भाग बनविले पाहिजे, असे प्रतिपादन पालकमंत्री डॉ.पंकज भोयर यांनी केले.

जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी कार्यालयाच्या प्रांगणात कृषि विभाग व आत्माच्यावतीने आयोजित करण्यात आलेल्या रानभाजी महोत्सवाच्या उद्घाटनप्रसंगी पालकमंत्री बोलत होते. यावेळी आत्माच्या प्रकल्प संचालक राणी गायकवाड, उपविभागीय कृषी अधिकारी वैष्णवी शिंदे, स्मार्ट प्रकल्पाचे नोडल अधिकारी रोहन झांजरे, तालुका कृषि अधिकारी चंद्रशेखर चवणे आदी उपस्थित होते.



सुरुवातीस पालकमंत्र्यांनी फित कापून महोत्सवाचे उद्घाटन केले. तसेच प्रत्येक स्टॉलला भेट देऊन महोत्सवात ठेवण्यात आलेल्या रानभाज्यांचे महत्व आणि त्यांची गुणवैशिष्टे शेतकऱ्यांकडून समजून घेतले व त्यांच्याशी संवाद साधला. यावेळी पालकमंत्री डॉ.पंकज भोयर यांच्याहस्ते प्रगतीशील शेतकऱ्यांचा सत्कार देखील करण्यात आला. त्यामध्ये पवणी येथील महिला शेतकरी प्रतिभा प्रमोद महाजन, समुद्रपुर येथील महिला शेतकरी शोभा जुगल गायधने तसेच दिपक नानाजी बर्डे, नंदकिशोर गावंडे यांचा समावेश आहे.

महोत्सवात जिल्ह्यातील शेतकरी, शेतकरी उत्पादक गटातील शेतकरी, सदस्यांनी सहभागी होऊन राजभाज्या विक्री व प्रदर्शनासाठी ठेवल्या होत्या. सोबत नैसर्गिक उत्पादने देखील याठिकाणी उपलब्ध करून देण्यात आली होती. रानभाज्यांमध्ये कुंजर, अंबाडी, पाथरी, कारडू, कपाळफोडी, गवती चहा, शेवगा, करवंद, अळू, चिवर, गोडनिम, तरोटा, राजगिरा, आघाडा, केना, सुरण, फास बरबटी, कुकडा, घोगली, ताजे मशरुम, भूईनीम, आंबटचुका, मायाळु/पोई, माठ, गुळवेल, करवंदाचे लोणचे, अंबाडीचे सरबत, पावडर, भाकर, लोणचे, बेलाचे लोणचे, सरबत प्रदर्शनात उपलब्ध होत्या. महिला बचत गटांकडून तयार करण्यात आलेले अंबाडी व मिक्स भाकरी ईत्यादी स्टॉल देखील मांडण्यात आले होते. पालकमंत्री डॉ.पंकज भोयर यांनी स्वत: अंबाडीच्या भाकरीचा आस्वाद घेतला. वर्धा शहरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने प्रदर्शनाला भेट देऊन रानभाज्यांचे महत्व समजून घेतले व खरेदी केली.

## प्रहारच्या बेलखडेंचा राजीनामा; दुसऱ्याच दिवशी पक्षाकडून निष्कासन

### बच्चू कडूंची भेट ठरली निर्णायक, आर्वीच्या राजकारणात चर्चेला उधाण

**आर्वी जनमाध्यम :** आर्वी विधानसभा मतदारसंघातील प्रहार संघटनेचे प्रमुख नेते जय बेलखडे यांनी संघटनेतील सर्व पदांचा राजीनामा दिल्याची माहिती समोर आली असून, त्यानंतर अवघ्या दुसऱ्याच दिवशी वर्धा जिल्हा प्रहार संघटनेने त्यांना संघटनेतून निष्कासित केल्याचे जाहीर केले आहे. या घडामोडीमुळे आर्वीच्या राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले आहे.

८ ऑगस्टच्या रात्री कारंजा येथे प्रहारचे संस्थापक अध्यक्ष तथा माजी राज्यमंत्री बच्चू कडू यांची जय बेलखडे यांनी भेट घेतली. कारंजा नगरपंचायतीच्या माध्यमातून आयोजित कार्यक्रमासाठी कडू प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. याच कार्यक्रमादरम्यान एका रेस्टॉरंटमध्ये झालेल्या भेटीत बेलखडे यांनी संघटनेतील सर्व पदांचा राजीनामा दिल्याचे सांगण्यात येते.



बेलखडे यांनी आर्वी विधानसभा मतदारसंघात प्रहार संघटनेच्या विस्तारासाठी सक्रिय भूमिका बजावली होती. त्यांनी विधानसभा निवडणूकही लढवली असून, त्यांना १४ हजारांहून अधिक मते मिळाली होती.

दरम्यान, कारंजा नगरपंचायतीतील शिंदे गटाच्या पदाधिकाऱ्यांसोबतच्या राजकीय मताभेदांमुळे कार्यक्रमाच्या निमंत्रणावरून बेलखडे नाराज असल्याची चर्चा आहे. मात्र, याबाबत अधिकृत कारण स्पष्ट झालेले नाही.

९ ऑगस्ट रोजी प्रहारच्या जिल्हा संघटनेने पत्र जारी करून बेलखडे यांचे निष्कासन केल्याचे जाहीर केले. यापुढे त्यांचा प्रहारशी कोणताही संबंध नसल्याचेही पत्रात स्पष्ट करण्यात आले आहे.

### बेलखडेंची ठाकरे गटाच्या पदाधिकाऱ्यांकडून सदिच्छा भेट; आर्वीत नव्या राजकीय समीकरणांची चर्चा

प्रहार जनशक्ती पक्षाचे विधानसभा अध्यक्ष जयकुमार बेलखडे यांची शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी नुकतीच सदिच्छा भेट घेतली. यावेळी आर्वी विधानसभा क्षेत्रातील राजकीय, सामाजिक तसेच जनहिताच्या विविध प्रश्नांवर चर्चा झाल्याची माहिती आहे.

या भेटीमुळे आर्वीच्या राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले असून आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर नव्या राजकीय समीकरणांची शक्यता व्यक्त केली जात आहे. जनतेच्या प्रश्नांवर एकत्रितपणे काम करण्याबाबत सकारात्मक चर्चा झाल्याचे समजते.

मात्र, या भेटीनंतर कोणतीही अधिकृत राजकीय घोषणा झालेली नाही. त्यामुळे बेलखडे यांच्या पुढील राजकीय भूमिकेकडे आर्वी मतदारसंघाचे लक्ष लागले आहे.

## आरोग्य अमृत महोत्सवांतर्गत आज हिंगणघाट येथे महाआरोग्य शिबिर

### ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांच्याहस्ते उद्घाटन

**वर्धा जनमाध्यम :** पालकमंत्री डॉ.पंकज भोयर यांच्या संकल्पनेतून राबविण्यात येत असलेल्या आरोग्य अमृत महोत्सवांतर्गत जिल्ह्यातील तिसरे महाआरोग्य शिबिर दिनांक १० व ११ ऑगस्ट रोजी अनुसया पॅलेस, हिंगणघाट येथे आयोजित करण्यात आले आहे. या शिबिराचे उद्घाटन दि.१० ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता ग्रामविकास व पंचायतराज मंत्री जयकुमार गोरे यांच्याहस्ते होणार आहे.

**आरोग्य अमृत महोत्सव महाआरोग्य शिबीर**

उद्घाटनप्रसंगी पालकमंत्री डॉ.पंकज भोयर, आरोग्य राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर, खासदार अमर काळे, आ.अभिजीत वंजारी, आ.सुधाकर अडबाले, आ.अरुण लखानी, आ.समीर कुणावार, आ.राजेश बकाने, आ.सुमित वानखेडे, जिल्हाधिकारी वान्मथी सी, मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण, आरोग्य उपसंचालक डॉ.शशिकांत शंभरकर उपस्थित राहणार आहेत. दोन दिवस चालणाऱ्या या शिबिरात हिंगणघाट विधानसभा मतदारसंघातील नागरिकांना विविध आजारांचे मोफत निदान, तज्ज्ञ डॉक्टरांचा सल्ला, औषधोपचार तसेच विविध शासकीय आरोग्य योजनांचा लाभ एकाच छताखाली उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

शिबिरामध्ये ज्येष्ठ नागरिकांची तपासणी, हृदयरोग तपासणी, मेंदूरोग तपासणी, ईसीजी, स्त्रीरोग, दंतरोग, अस्थिरोग, कर्करोग, त्वचारोग, कान-नाक-घसा, नेत्ररोग, बालरोग, पोटाचे विकार तसेच संसर्गजन्य रोगांची तपासणी करण्यात येणार आहे. याशिवाय रक्त तपासणी, मानसिक आरोग्य सल्ला, औषध वितरण, मोफत चष्म्यांचे वाटप करण्यात येणार आहे. शिबिरात आयुष्मान भारत योजनेंतर्गत कार्ड नोंदणी व लाभार्थी सहाय्य केंद्रही कार्यरत राहणार आहे.

महिला आणि पुरुषांसाठी स्वतंत्र तपासणी कक्षांची व्यवस्था करण्यात आली असून नोंदणीपासून उपचार व औषध वितरणापर्यंत सर्व सुविधा नियोजनबद्ध पद्धतीने उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. शिबिराच्या ठिकाणी वेगवेगळ्या प्रकारच्या तपासणीसाठी वेगवेगळी दालने राहणार आहे. शिबिरास येतांना नागरिकांनी आयुष्मान भारत कार्ड किंवा आधारकार्ड, रेशन व मोबाईल नंबर सोबत आणावा व शिबिराचा लाभ घेण्याचे आवाहन जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.सुमंत वाघ व जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.स्वप्नील बेले यांनी केले आहे.

## २२ वर्षांचा वनवास संपला

## क्रांतीभूमीच्या लाल एसटीला अखेर हिरवा झेंडा

**आष्टी (शहीद) जनमाध्यम :** १९४२ च्या स्वातंत्र्य आंदोलनात आष्टी आणि चिमूरच्या शूरवीरांनी दिलेल्या बलिदानाची आठवण जपणारी आष्टी–चिमूर शहीद स्मृती जलद बससेवा तब्बल २२ वर्षांनंतर पुन्हा सुरू झाली. क्रांती दिनाच्या पूर्वसंध्येला शनिवारी (८ ऑगस्ट) सकाळी बससेवेला हिरवी झेंडी दाखवून शुभारंभ करण्यात आला. त्यामुळे या ऐतिहासिक मार्गावरील प्रवाशांना मोठा दिलासा मिळाला आहे.

२००२ मध्ये बंद झालेली ही बससेवा पूर्ववत सुरू करण्यासाठी तालुका भाजपचे महामंत्री ॲड. मनीष ठोंबरे, भाजप अनुसूचित जाती मोर्चाचे जिल्हाध्यक्ष अशोक विजयकर व त्यांच्या सहकाऱ्यांनी सातत्याने पाठपुरावा केला. तळेगाव आगार प्रशासनाची भेट घेऊन बससेवा सुरू करण्याबाबत लेखी निवेदन देण्यात आले होते. आष्टी-चिमूरच्या स्वातंत्र्यलढ्यातील ऐतिहासिक योगदान लक्षात घेऊन आगार प्रशासनाने मागणीला सकारात्मक प्रतिसाद दिला.



शनिवारी सकाळी ८ वाजता वर्धा जिल्हा भाजपचे महामंत्री कमलाकर निंभोरकर आणि ह.भ.प. कृष्णा ऊर्फ दयानंद महाराज हिरुडकर यांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून बस रवाना करण्यात आली. यावेळी तळेगावच्या सहायक आगारप्रमुख विद्या ठाकरे तसेच चालक-वाहकांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.

आष्टीहून दररोज सकाळी ६ वाजता चिमूरसाठी बस रवाना होणार आहे. ही सेवा अखंडित सुरू ठेवण्याचा निर्धार आगार प्रशासनाने व्यक्त केला. बससेवा सुरू झाल्याने विद्यार्थी, नोकरदार, व्यापारी आणि ग्रामीण भागातील प्रवाशांची मोठी सोय झाली आहे.

शुभारंभप्रसंगी ॲड. मनीष ठोंबरे, अशोक विजयकर, कमलाकर निंभोरकर यांच्यासह सोनू भार्गव, प्रमोद गुप्ता, आवेज खान, सुधाकर गांजुडे, श्याम नवलाखे, भरत वनझारा, मारोतराव काकडे, संजय हिरुडकर, रामराव राऊत, दिनेश इंगळे आदी उपस्थित होते.

## गावच्या अंगणातच 'डिजिटल शाळा'; ४०० अंगणवाड्यांचा चेहरामोहरा बदलला

**वर्धा जनमाध्यम :** ग्रामीण भागातील चिमुकल्यांना आधुनिक शिक्षणाच्या प्रवाहाशी जोडण्यासाठी जिल्ह्यातील अंगणवाड्यांना 'स्मार्ट' करण्यावर भर दिला जात आहे. जिल्ह्यातील एकूण १ हजार ६२७ अंगणवाड्यांपैकी मागील चार वर्षांत ४०० अंगणवाड्या स्मार्ट करण्यात आल्या आहेत. आता आणखी ११० अंगणवाड्यांचे रूपडे पालटण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे.



स्मार्ट अंगणवाड्यांमध्ये एलईडी टीव्ही, डिजिटल शैक्षणिक साहित्य, खेळणी तसेच बालकांच्या शैक्षणिक व बौद्धिक विकासाला पूरक विविध उपकरणे उपलब्ध करून देण्यात आली आहेत. यासोबतच दैनंदिन कामकाजासाठी आवश्यक भांडी, गॅस शेगडी आदी साहित्यही पुरविण्यात आले आहे. त्यामुळे अंगणवाडींचा केवळ चेहरामोहरा बदलला नसून, चिमुकल्यांना मिळणाऱ्या शैक्षणिक सुविधांमध्येही वाढ झाली आहे.

# संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## दबावगटाची नांदी

अभिजीत दिपके आणि त्याच्याबरोबरचे अन्य 'कॉक्रोच' दिल्लीचे माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्यापेक्षा जास्त परिपक्व आहेत का? या प्रश्नाचे स्पष्ट उत्तर मिळायला अजून थोडा वेळ जाऊ द्यावा लागेल. पण, तसा संशय यावा, अशी उत्तरे त्यांनी काल छत्रपती संभाजी नगरला झालेल्या पत्रकार परिषदेत दिली, एवढे नक्की.' जंतर-मंतर'वर महिनाभर ठिय्या देणे, आंदोलन 'पळवून नेऊ पाहणाऱ्यां'ना निग्रहाने दोन हात दूर लोटत राहणे, केंद्र सरकारच्या उच्चाधिकारी शिष्टमंडळासमोर जराही नवखेपण न दाखवता चर्चेच्या तीनही फेऱ्यांत मागणीपासून अजिबात न ढळणे या गोष्टी वाटतात तेवढ्या सोप्या नाहीत. विशेषतः संपूर्ण देशातून अनोळखी कोवळ्या मुलां-मुलींचे लोंढे येत असताना त्यांना संयमाने रोखून धरण्यास वेगळीच धिटाई लागते. ती त्यांनी दाखवली. आंदोलन संपले. कुणाच्या ध्यानीमनी नसताना एक ठिणगी फुलत गेली, त्यातून आंदोलन उभे राहिले आणि यशस्वीही झाले. 'पुढे काय?' हा प्रश्न त्यानंतर महत्त्वाचा होता. हा नुसता प्रश्न नाही, 'कॉक्रोच'साठी बेमालूम सापळा होता. पहिल्याच पावलात अकल्पित यश मिळाल्यानंतर पुढच्या पावलाची जबाबदारी अनंत पटीने वाढते. ते पाऊल चुकले, तर पुढचा सगळा प्रवास भलत्या मार्गाला लागण्याची शक्यता असते. संपूर्ण देश आज 'कॉक्रोच'च्या दुसऱ्या पावलाकडे म्हणूनच मोठ्या उत्सुकताने पाहत होते. ते पाऊल कुठे पडते, ते स्पष्ट होण्यासाठी दिपके यांच्या घरी छत्रपती संभाजीनगरला झालेली 'कॉक्रोच'ची दोन दिवसाची बैठक महत्त्वाची होती. या बैठकीत काय विचारमंथन झाले आणि हे तरुण पुढे कोणती दिशा ठरवतात, याविषयीची उत्सुकता त्यांच्या पत्रकार परिषदेने बरीचशी पूर्ण केली. पहिल्याच आंदोलनात केंद्रीय मंत्र्याचा राजीनामा मिळवणारे आता आणखी मोठ्या उडीची घोषणा करतात का, याविषयी खरे कुतूहल होते. पण, आत्ताच राजकीय पक्ष म्हणून कामाला सुरुवात न करता दबाव गट म्हणून काम करण्याचा निर्णय त्यांनी जाहीर केला. आपल्यासाठी शिक्षण क्षेत्राची लक्ष्मणरेषाही त्यांनी आखून घेतली. सर्वसामान्य पालकांच्या आवाक्याबाहेर जाणारे शिक्षण आणि शिक्षण व्यवस्थेतले गैरप्रकार या दोनच मुद्द्यांवर सप्टेंबरपासून 'क्या बोलती पब्लिक' ही मोहीमही त्यांनी जाहीर केली.आवाक्यातले पसंतीचे उच्च शिक्षण आणि त्यानंतर रोजगार हेच तरुणांना आज असुरक्षिततेची भावना देणारे दोन विषय आहेत. पत्रकार परिषदेत बोलताना दिपके आणि त्याच्या साथीदारांनी पहिलीतल्या प्रवेशासाठी लागणाऱ्या लाख-दोन लाख रुपयांचा उल्लेख केला. म्हणजे, आजच्या विद्यार्थ्यांबरोबर नुकतेच आईबाप झालेले तरुण आणि आजोबाही या 'कॉक्रोच'नी खास चतुराईने आपल्या मोहिमेत सामील करून घेतले आहेत. या वर्गानेही आपल्याला पाठिंबा द्यावा, अशी त्यांच्या अपेक्षा दिसते आहे. पण, केवळ एवढ्यापुरती मोहीम मर्यादित केली असती, तर त्याला अर्ज विनंत्यांचे स्वरूप आले असते. 'कॉक्रोच' ना शिक्षण सुधारासाठी सरकारवर दबाव आणणारी मागणी करायचीच आहे; पण त्यादरम्यान नवतरुणांमधला असंतोषही पेटवायचा आहे. 'शिक्षण व्यवस्थेतली गैरव्यवहार' अशी एक सैल, व्यापक चौकट त्यासाठी उपयोगी ठरू शकते. दिल्लीतील आंदोलनानंतर विविध राज्यांतील अशा गैरप्रकारांच्या बातम्या सतत सुरूच आहेत. त्यातलच एखादे प्रकरण गंभीरपणे घेऊन 'कॉक्रोच' आपले अस्तित्व आणि सरकारसाठी उपद्रवमूल्य जिवंत ठेवतील, असे त्यांच्या मोहिमेच्या आखणीवरून दिसते. आपला हितचिंतक आणि अनुयायी पारंपरिक भाषा बोलणारा नाही. देशभर तळापर्यंत पोहोचायचे असेल,तर हिंदी हीच भाषा वाहक म्हणून उत्तम काम करेल, हे लक्षात घेऊन त्यांनी आपल्या मोहिमेसाठी 'क्या बोलती पब्लिक' हे 'टायटल' निवडले आहे. जनमनाची चांगली जाण असल्याचे हे लक्षण आहे. 'कॉक्रोच'च्या स्थापनेकडे नंतरच्या त्यांच्या देशभरातील दौऱ्यांकडे आणि 'जंतर-मंतर 'वरील आंदोलनाकडे सुरुवातीला ज्या सहजतेने पाहिले गेले, ते बेसावधपण यापुढे चालणार नाही. 'कॉक्रोच'च्या हालचालींकडे गंभीर, सावधपणेच बघावे लागेल, हा याचा अर्थ आहे. 'क्या बोलती पब्लिक' या शब्दयोजनेतून त्यांनी आपल्या समर्थकांना आणि शिक्षण व्यवस्थेतील अव्यवस्थेने पोळलेल्यांना आपला असंतोष व्यक्त करण्याची खुली संधीच दिली आहे !'कॉक्रोच'नी आज दबाव गट म्हणून काम करण्याचे जाहीर केले असले, तरी ते अखेरपर्यंत तसेच राहतील, असे समजायचे कारण नाही. केजरीवालही सुरुवातीला हीच भाषा बोलत होते. नंतर ते एकदम १० वर्षं दिल्लीचे मुख्यमंत्री झाले! 'कॉक्रोच'बाबतही हे घडणारच नाही, असे नाही. महाराष्ट्रात एकेकाळी अशीच झंझावात ठरलेली युवक क्रांती दल ही संघटना 'संसदीय राजकारण, की संसदबाह्य दबावगट?' या पेचातच फसली, फुटली होती, याची आठवण आज साठी -सत्तरीत असलेल्यांना असेल. 'कॉक्रोच'ना अद्याप आपला पाया रचायचा आहे, संघटना बांधणी करायची आहे, संधीच्या जागा शोधायच्या आहेत, आपल्या समर्थकांचं राजकीयीकरण करायचं आहे, आपला 'मतदार' नक्की करायचा आहे, देशभर पसरायचे आहे... याच्या अधेमधे खूप टप्पे, खाचखळगे आहेत. त्यामुळे त्यांच्या बाबतीत 'पुढे काय?' हा प्रश्न आणखी बराच काळ विचारता येणार आहे.

**भारताच्या उच्च शिक्षण व्यवस्थेसमोर आज दोन मोठी आव्हाने उभी आहेत, परीक्षांची विश्वासार्हता आणि जागतिक दर्जाच्या विद्यापीठांची उभारणी. नीट प्रश्नपत्रिका फुटीच्या घटनेने परीक्षा व्यवस्थेतील त्रुटी अधोरेखित केल्या असल्या, तरी त्यापलीकडे भारताच्या उच्च शिक्षण धोरणाचा व्यापक विचार करण्याची गरज निर्माण झाली आहे. गेल्या तीन दशकांत चीनने नियोजनबद्ध धोरणे, लक्ष्यकेंद्रित गुंतवणूक, संशोधनाला चालना आणि उद्योगांशी सुसंगत शिक्षण यांमुळे आपल्या विद्यापीठांना जागतिक स्तरावर पोहोचवले.**

# उच्च शिक्षणाचे 'चायना मॉडेल'

'नीट' परीक्षेची प्रश्नपत्रिका फुटल्याच्या घटनांविरुद्ध झालेल्या निदर्शनांनंतर देशाच्या शिक्षणमंत्र्यांनी दिलेल्या राजीनाम्यामुळे शैक्षणिक सुधारणांबाबत राष्ट्रीय स्तरावर चर्चा सुरू झाली आहे. परीक्षेची विश्वासार्हता हा यातला तात्कालिक मुद्दा आहे; परंतु त्याहून मोठा प्रश्न असा आहे की, भारताच्या राष्ट्रीय महत्त्वाकांक्षेला साजेशी उच्च शिक्षण प्रणाली उभारण्यासाठी आवश्यक असलेली संस्थात्मक क्षमता भारताकडे आहे का? लेखिका आणि पत्रकार पल्लवी अय्यर यांनी एका अलीकडील लेखात भारत आणि चीनचे वर्णन 'परीक्षाप्रधान देश' असे केले आहे. मोठ्या आणि विषमता असलेल्या समाजांमध्ये स्पर्धात्मक सार्वजनिक परीक्षा हे चांगल्या आयुष्याकडे नेणारे एक प्रवेशद्वार असते. जन्म, संपत्ती, जात, प्रदेश आणि वशिलेबाजी यांसारख्या गोष्टींचा प्रभाव कष्टाच्या जोरावर काही प्रमाणात निष्प्रभ करता येऊ शकतो, अशी हमी या परीक्षा देतात. म्हणूनच प्रश्नपत्रिका फुटणे हा विश्वासाचा अत्यंत गंभीर भंग मानला जातो.

चीनमधील 'गाओकाओ' ही परीक्षा, जी यावर्षी १.३३ कोटी (१३.३५ दशलक्ष) विद्यार्थ्यांनी दिली. तिचे नियोजन केंद्रीय स्तरावर केले जाते आणि अंमलबजावणी प्रांतीय स्तरावर होते. अय्यर यांनी या परीक्षेच्या सुरक्षिततेसाठी राबवल्या जाणाऱ्या उपाययोजनांचे वर्णन केले आहे. जसे की, जीपीएस ट्रॅकिंग आणि पोलीस संरक्षणाखाली प्रश्नपत्रिकांची ने-आण करणे, प्रश्नपत्रिका तयार करणाऱ्यांना सुरक्षित ठिकाणी इतरांपासून अलिप्त ठेवणे, परीक्षा केंद्रांवर 'फेशियल रेकग्निशन' (चेहरा ओळखण्याचे तंत्रज्ञान) आणि 'सिग्नल जॅमर्स'चा वापर करणे आणि अगदी परीक्षेच्या कालावधीत काही एआय कंपन्यांनी त्यांच्या साधनांचा वापर मर्यादित करणे. ही संपूर्ण यंत्रणा लोकांचा हा विश्वास दृढ करते की, प्रगती ही वशिलेबाजी किंवा प्रभावावर नव्हे, तर नियमांवर आधारित असते

भारतातील 'नीट' परीक्षेच्या संकटामुळे दोन प्रश्न उपस्थित होतात. पहिला प्रश्न प्रक्रियात्मक आहे. अत्यंत महत्त्वाच्या आणि मोठ्या प्रमाणावर घेतल्या जाणाऱ्या या परीक्षा भारत सुरक्षितता, पारदर्शकता आणि उत्तरदायित्वाच्या निकषांवर यशस्वीपणे पार पाडू शकतो का? पंतप्रधान नरेंद्र मोदी यानी परीक्षा पद्धतीत आमूलाग्र बदल घडवून आणण्यासाठी एका उच्च-स्तरीय कार्यगटाची (टास्क फोर्स) घोषणा केली आहे. तथापि, परीक्षेची सचोटी किंवा पारदर्शकता आवश्यक असली, तरी ती पुरेशी नाही. याचे कारण म्हणजे, एक



दुसरा महत्त्वाचा धोरणात्मक प्रश्न म्हणजे, परीक्षा कितीही निष्पक्ष आणि पारदर्शक असली, तरी त्याद्वारे विद्यार्थी ज्या उच्च शिक्षण प्रणालीमध्ये प्रवेश करतात, ती प्रणाली नेमकी कशी आहे?

चीनच्या उच्च शिक्षण क्षेत्रातील आमूलाग्र बदलांचा अनुभव आपल्याला काही महत्त्वाचे धडे देतो. 'इंडियन पब्लिक पॉलिसी रिव्ह्यू'मध्ये प्रकाशित होणाऱ्या एका शोधनिबंधात (लेखिका : कोंथौजम सारडा आणि प्रस्तुत लेखक) असा युक्तिवाद करण्यात आला आहे की, चीनमधील विद्यापीठांची प्रगती ही तीन दशके राबवलेल्या सरकारी धोरणांचा परिणाम होती. २००४ मध्ये, 'ॲकॅडमिक रँकिंग ऑफ वर्ल्ड युनिव्हर्सिटीज'च्या जागतिक स्तरावरील पहिल्या १०० विद्यापीठांच्या यादीत चीनच्या मुख्य भूभागातील एकाही विद्यापीठाचा समावेश नव्हता; मात्र २०२५ पर्यंत सिंगहुआ आणि पेकिंग या विद्यापीठांनी जागतिक स्तरावरील अव्वल श्रेणीत स्थान मिळवले आणि चीनमधील किमान सहा विद्यापीठे पहिल्या १०० विद्यापीठांच्या यादीत समाविष्ट झाली. भारतासाठी पहिला धडा म्हणजे, क्रमवारी किंवा योग्य टप्प्यांचा अवलंब. आपल्या उच्च शिक्षण व्यवस्थेला शालेय स्तरावर साक्षरता, अंकज्ञान आणि शिक्षकांची गुणवत्ता यांवर आधारित भक्कम पायाची गरज आहे. चीनमध्ये २०१० पर्यंत ९ वर्षांचे अनिवार्य शिक्षण सर्वत्र लागू झाले, ज्यामुळे उच्च शिक्षणासाठी पात्र विद्यार्थ्यांचा मोठा गट तयार झाला.

दुसरा धडा म्हणजे, संसाधनांचे केंद्रित विनियोजन. चीनने प्रोजेक्ट २११, प्रोजेक्ट ९८५ आणि नंतरच्या डबल फर्स्ट क्लास कार्यक्रमाद्वारे आपली संसाधने निवडक विद्यापीठे आणि अभ्यास शाखांवर केंद्रित केली. प्रोजेक्ट ९८५ ची सुरुवात केवळ नऊ विद्यापीठांपासून झाली आणि नंतर ती ३९ विद्यापीठांपर्यंत विस्तारली. याचा स्पष्ट उद्देश हार्वर्ड, एमआयटी, ऑक्सफर्ड आणि टोकियो यांसारख्या जागतिक दर्जाच्या विद्यापीठांशी स्पर्धा करणे हा होता. २००९ ते २०१३ या काळात प्रोजेक्ट ९८५ मधील विद्यापीठांना राष्ट्रीय संशोधन निधीपैकी सुमारे ७० टक्के निधी मिळाला. विशेष म्हणजे, चीनमधील एकूण विद्यापीठीय विद्यार्थ्यांपैकी ५ टक्क्यांपेक्षा कमी विद्यार्थी या विद्यापीठांमध्ये शिकत होते. ही बाब धोरणात्मकदृष्ट्या अत्यंत महत्त्वाची आहे. भारतासमोरील समस्या म्हणजे निधीची कमतरता आणि उपलब्ध निधीची विखुरलेली विभागणी. यामुळे व्याप्ती तर मोठी असते; पण खोली (खोलवर अभ्यास किंवा संशोधन) नसते अशी स्थिती निर्माण होते. एएसपीआयद्वारे मागोवा घेतल्या जाणाऱ्या ७४ महत्त्वपूर्ण तंत्रज्ञानांपैकी सुमारे ५० तंत्रज्ञानांच्या बाबतीत भारत जागतिक स्तरावर पहिल्या पाच देशांमध्ये येतो; परंतु एकाही क्षेत्रात तो आघाडीवर नाही. आपल्याला व्यापक शिक्षण प्रणालीची गरज असली, तरी त्याचबरोबर कृत्रिम बुद्धिमत्ता, सेमीकंडक्टर्स, जैवतंत्रज्ञान, पदार्थ विज्ञान, ऊर्जा साठवणूक, कृषी आणि हवामानविषयक तंत्रज्ञान या क्षेत्रांत जागतिक स्तरावर स्पर्धा करू शकणाऱ्या काही संस्थांचीही आवश्यकता आहे

तिसरा धडा म्हणजे, कामगिरीवर आधारित स्वायत्तता. येथे निधी हा प्रत्यक्ष निष्पत्ती, नियतकालिक आढावा आणि दर्जा घसरल्यास दर्जा कमी होण्याची शक्यता या गोष्टींशी जोडलेला असतो. डबल फर्स्ट क्लास कार्यक्रमामुळे अशा प्रणालीमध्ये स्पर्धा निर्माण झाली, जिथे उच्च दर्जाची ओळख हा एक कायमस्वरूपी हक्क बनला होता. भारतीय विद्यापीठांनाही दैनंदिन नोकरशाहीच्या नियंत्रणातून मुक्त अशा स्वायत्ततेची गरज आहे; मात्र ही स्वायत्तता मिळतानाच अध्ययन-निष्पत्ती, संशोधनाचा दर्जा, प्रशासन आणि रोजगारक्षमता यांबाबतची जबाबदारीही स्वीकारणे आवश्यक आहे. चौथा धडा म्हणजे, राष्ट्रीय प्राधान्यक्रमांशी सुसंगतता साधणे. चीनमधील उच्च दर्जाची विद्यापीठे ही औद्योगिक समूह आणि तंत्रज्ञान मोहिमांशी जोडलेली होती. यामुळे महत्त्वपूर्ण तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातील त्यांची क्षमता अधिक बळकट झाली.

पाचवा धडा म्हणजे, अभ्यासक्रमातील लवचिकता. २०२५ मध्ये चीनच्या शिक्षण मंत्रालयाने २०२५-२७ या कालावधीसाठी शैक्षणिक शाखा आणि मुख्य अभ्यास विषयांमध्ये बदल करण्यासाठी एक कृती आराखडा सुरू केला. यात अत्याधुनिक तंत्रज्ञानाशी संबंधित नवीन शाखा सुरू करणे, कमी मागणी किंवा खालावलेली गुणवत्ता असलेल्या अभ्यासक्रमांमध्ये सुधारणा करणे, आंतरशाखीय समन्वय अधिक दृढ करणे, शैक्षणिक साहित्यात 'एआय' साधनांचा समावेश करणे, शिक्षकांची क्षमता वाढवणे आणि उद्योग व विद्यापीठे यांच्यात अधिक जवळचे सहकार्य प्रस्थापित करणे या गोष्टींचा समावेश आहे. मंत्रालयाच्या एका स्वतंत्र बैठकीत 'एआय' साक्षरता, 'एआय'मधील विशेष अभ्यासक्रम आणि अभ्यासक्रम निर्मिती व अध्यापनात 'एआय'चा वापर यांवर भर देण्यात आला. याउलट, भारतीय विद्यापीठे समित्या, मंजुरीची प्रक्रिया आणि कालबाह्य अभ्यासक्रम यांच्या संथ गतीने चालत आहेत. 'एआय', जैवतंत्रज्ञान, रोबोटिक्स, हवामान बदलाचे धोके आणि भूराजकीय कारणांमुळे बदलणारी पुरवठा साखळी यांच्या युगात अभ्यासक्रमांमध्ये सतत बदल होणे आवश्यक आहे.


पहिले म्हणजे, परीक्षांची सचोटी सुनिश्चित करणे. कारण, विश्वास नसेल तर संपूर्ण शैक्षणिक रचना कोलमडून पडते. दुसरे म्हणजे, परीक्षा पद्धतीत तातडीने सुधारणा करणे. तिसरे म्हणजे, दीर्घकालीन आणि सखोल गुंतवणुकीसाठी ५० ते १०० विद्यापीठे व शैक्षणिक शाखांची निवड करणे. चौथे म्हणजे, त्यांना शिक्षक-कर्मचारी भरती, अभ्यासक्रम, सहकार्य आणि संशोधन भागीदारी यांबाबत स्वायत्तता देणे. पाचवे, विद्यापीठांना स्थानिक अर्थव्यवस्थेशी जोडून विकेंद्रीकरणाला बळकटी देणे. सहावे, कृत्रिम बुद्धिमत्ता, डेटा आणि आंतरविद्याशाखीय समस्या निवारण यांचा समावेश प्रत्येक महत्त्वपूर्ण पदवी अभ्यासक्रमात करा. धोरण जेव्हा धोरणात्मक, संयमी आणि गांभीर्याने राबवले जाते, तेव्हा परिवर्तन शक्य असते, हे चीनच्या उदाहरणावरून दिसून येते.

**-डॉ. अजित रानडे**

# चीनच्या AI क्रांतीचा खरा कणा - AI चे नॅशनल नेटवर्क

## चीन कसा बनतोय AI सुपरपॉवर?

**चीनबद्दलचे आपले सर्व पूर्वग्रह बाजूला ठेवून, एक देश तंत्रज्ञानातली सुपरपॉवर बनण्यासाठी काय करू शकतो हे समजून घेण्यासाठी ही लेखमाला..**



**भाग ४**

आपल्याकडे जसे वीज मंडळ असते, आणि आपण फक्त बटण दाबले की वीज मिळते मीटर बघून बिल भरायचे, बाकी कशाची काळजी नाही तसंच चीनने AI साठी लागणाऱ्या कॉम्प्युटिंग पॉवरचे केलंय. चीनमधल्या AI कंपन्यांना जी कॉम्प्युटिंग पॉवर लागते ती अक्षरशः मीटरनुसार पैसे देऊन भाड्याने घेता येते. म्हणजे प्रत्येक कंपनीला स्वतःचे 'डेटा सेंटर' टाकावं लागत नाही.

चीन सध्या एक अवाढव्य प्रकल्प उभारतोय 'National Integrated Computing Power Network' म्हणजे संपूर्ण देशभर पसरलेले एक कॉम्प्युटिंग पॉवरचे जाळे. म्हणजे, देशभरात अनेक ठिकाणी चीनचे सरकार स्वतः डेटा सेंटर्स उभारत आहे. जिथे स्वस्त जमीन आहे, जिथे सौर किंवा पवन ऊर्जेसारखी स्वस्त वीज सहज मिळते, तिथे मोठमोठाले डेटा सेंटर्स उभारले जात आहेत. आणि हे डेटा सेंटर्स हायस्पीड फायबर केबलने शहरांशी जोडले जात आहेत.

डेटा सेंटरच्या बाबतीत एक मोठा आक्षेप घेतला जातो आहे सध्या. त्यांना खूप मोठ्या प्रमाणावर ऊर्जा आणि पाणी हे दोन्ही लागते. चीन या दोन्ही बाबतीमध्ये अनेक नवोपक्रम (innovations) करत आहे.ऊर्जेच्या बाबतीत जिथे सौर ऊर्जा किंवा पवन ऊर्जा यासारखी renewable energy वापरता येते तिथेच डेटा सेंटर्स उभारत आहेत. म्हणजे, data महू उभारताना त्याला मुख्य grid मधली energy न देता, स्वतःचे solar energy किंवा wind energy चे फार्म उभे करूनच त्याच्या शेजारी data center उभे करणे.

पाण्याच्या बाबतीत विचार केला, तर डेटा सेंटरच्या कूलिंगसाठी खूप मोठ्या प्रमाणावर शुद्ध पाणी लागते. मात्र माणसांना लागणारे पाणी तोडून ते डेटा सेंटर्सना द्यायचे नाही, यासाठी चीनने अनेक ठोस पावले उचलली. पहिले म्हणजे, peer data centers अत्यंत कमी पाण्याच्या भागात आहेत, त्यांना पाणी वापराचे अत्यंत कडक कोटा किंवा 'रेशनिंग' ठरवून दिले. तुम्हाला इतकंच पाणी मिळेल, आणि त्यात तुमची गरज भागवा, असे त्यांना सांगितले. शिवाय शहरी भागांमधल्या डेटा सेंटर्सना, तुम्हाला रिसायकल केलेल्या पाण्यातच डेटा सेंटर चालवायला लागेल, असे सांगितले. म्हणजे, माणसांनी वापरून शुद्ध केलेले पाणीच तुम्हाला वापरता येईल, असे नियम त्यांच्यासाठी केले. आणि त्याही पुढे जाऊन, ज्यांना 'cooling' साठी शुद्ध पाणी लागणारच नाही, अशी समुद्राच्या पाण्याखाली चालतील अशी डेटा सेंटर्स त्यांनी उभारली — जगातले पहिले व्यावसायिक स्तरावर चालणारे असे पाण्याखालचे डेटा सेंटर.


याचा परिणाम म्हणून, माणसांच्या तोंडचे पाणी किंवा माणसांना लागणारी ऊर्जा न पळवता, renewable energy आणि recycled water वापरून चीन अत्यंत प्रगत आणि शाश्वत (sustainable) data महू चे network देशभर उभारत आहे. आणि हे network ते 'pay per use' पद्धतीने, म्हणजे नळाला पाणी येणे किंवा वापरलेल्या वीजेचे बिल द्यावे या पद्धतीने, देशभरातील कंपन्यांना देत आहेत.


याचा परिणाम काय? देशातल्या कुठल्याही छोट्या स्टार्टअपला, स्वतःचे महागडे चिप्स किंवा सर्व्हर विकत घ्यायची गरजच नाही. ते फक्त गरजेपुरती कॉम्प्युटिंग पॉवर 'भाड्याने' घेऊ शकतात, वापरू शकतात, त्यावर innovation करू शकतात. ह्यामुळे, चीनमध्ये AI वर आधारित apps तयार करणं किंवा AI वर संशोधन करून नवी मॉडेल्स तयार करणे हे फक्त मोठ्या कंपन्यांचे काम राहिले नाही कुणीही, कुठूनही, कमी खर्चात AI वर काम सुरू करू शकतो आहे. आणि त्याचे परिणाम आता दिसायला लागले आहेत.

चीनने हे ज्या वेगाने आणि ज्या देशव्यापी प्रमाणात उभे केलंय, तसे अजून अमेरिका-भारतासह इतर कुठल्याच देशाने केलेले नाही. चीन AI बाबत जे करत आहे त्यातून इतर सर्व देशांनी शिकण्यासारखे आणि अंमलात आणण्यासारखे खूप काही आहे. ते काय, कसे आणि का ह्याविषयी पुढच्या (आणि शेवटच्या) भागात.

**-प्रसाद शिरगावकर**

# राजकारणापलिकडचे चेहरे





अटलबिहारी वाजपेयी विरोधी पक्षनेता होते. राजीव गांधींना श्रद्धांजली वाहण्यासाठी एका टिव्ही कार्यक्रमाचे आयोजन केले होते. करण थापरच्या 'आयविटनेस' या दूरदर्शनच्या काळात गाजलेल्या कार्यक्रमात. करणने वाजपेयींना विचारले, बोलाल का? तर ते लगेचच तयार झाले.

काय बोलले ते? राजीव नुकतेच पंतप्रधान झाले होते. त्यांना वाजपेयींच्या किडनीच्या आजाराविषयी कळले होते. युनो परिषदेसाठी भारतीय शिष्टमंडळ पाठवायचे होते. राजीव यांनी वाजपेयींना विनंती केली की, त्यांनी या शिष्टमंडळाचे नेतृत्व करावे आणि परिषदेच्या निमित्ताने न्यूयॉर्कला जाऊन स्वतःवर उपचारही करून घ्यावेत. ही घटना सांगून वाजपेयी म्हणाले, राजीवने जणू मला वाचवले. त्याच्या अचानक,अनपेक्षित मृत्यूनंतर मला त्याचे असे जाहीर आभार मानायचे आहेत. रेकॉर्डिंग झाल्यावर वाजपेयी करणला म्हणाले, राजीवने मला जी मदत केली, ती कथन केल्यामुळे आता माझ्या मनावरचे ओझे उतरले आहे.

वाजपेयींच्याच धोरणावर टीका करणारा एक लेख करण यांनी लिहिला होता. तो लेख प्रसिद्ध झाल्यानंतर लगेचच एका कार्यक्रमात वाजपेयींनी भर गर्दीत, करणला जवळ बोलावून घेतले आणि लेख वाचल्याचे सांगितले. त्या गर्दीत तो लेख वाचलेले अनेक होते. सगळ्यांनाच वाजपेयींच्या या कृतीचे कौतुक वाटले.

करण थापरचे आत्मवृत्तपर पुस्तक, 'डेव्हिल्स ॲडव्होकेट' (त्याच्याच एका कार्यक्रमाचे हे शीर्षक) नुकतंच वाचले. त्यात अशा बऱ्याच कहाण्या आहेत. करणने लिहिलंय, अटलजी हा टिपिकल राजकारण्याच्या खूप पलिकडे पोचलेला माणूस होता, याची असंख्य उदाहरणे आहेत.अटलजींच्या जीवनसाथी मिसेस कौल यांच्याही आठवणी पुस्तकात आहेत.

नरसिंहरावांची विद्वत्ता,भाषाप्रभुत्व आणि नर्मविनोदी शैली याचेही करणने लिहिलेले अनुभव वाचण्याजोगे.एकदा अडवानींना अडचणीत आणणारा प्रश्न मुलाखतीत विचारल्यावर, ते रागावले. मुलाखत सोडायच्या बेतात होते. पण मग विचार बदलून उमदेपणे म्हणाले, ठीक आहे, देतो उत्तर. तू पत्रकार आहेस, तू तुझे काम कर. मी माझे, उत्तर देण्याचे करतो. पुढे अडवानींबरोबर करणची झालेली मैत्री,ते गृहमंत्री असताना, त्याने भारत-पाकिस्तान संबंध हाताळण्यात अडवानींना केलेली मदत याबद्दलही लिहिलंय.

बेनझिर भुत्तो ही करणची आणि त्याच्या पत्नीचीही मैत्रीण. करणने, एक जिवाभावाची मैत्रीण आणि कणखर राजकारणी म्हणून तिचे व्यक्तिमत्व चितारलंय. संजय गांधी शाळकरी वयात करणच्या बहिणीचा दोस्त. संजयचे करणच्या घरी सतत येणेजाणे, पुढे मनेकाशी लग्न झाल्यावरही सुरू राहिले.संजयची आई म्हणून,एक खाजगी व्यक्ती, स्त्री म्हणून हळव्या इंदिरा गांधीचे घडलेले दर्शन हे त्यांच्या राजकीय व्यक्तिमत्वाच्या विरोधी होते,असे करण म्हणतो. करणच्या घरी संध्याकाळी,जरा उशिरापर्यंत संजय रेंगाळला की लगेच इंदिराजी तो कधी परतणार आहे, याची चौकशी करायला फोन करत असत.

विविध सेलिब्रेटीज आपल्याला दिसतात,त्याहून जवळून,म्हणून वेगळ्या पत्रकारांना दिसतात. शेवटी ही सगळी बरीवाईट माणसंच असतात. करणने हे माणूसपण चांगले उलगडून दाखवलंय. पुस्तकात, त्याने पत्रकारितेचे घेतलेले धडेही आहेत. मुलाखत घेण्याची शैली, ॲंकरींग, कार्यक्रमाची रचना, स्क्रिप्ट वगैरेंविषयीही काही लिहिलंय. करण थापर, एक मुलाखतकार म्हणून कडक, कठोर वाटतो. पण त्याचाही खट्याळपणा पुस्तकात सतत डोकावतो. पुस्तक आवडले. पण अनेक ठिकाणी हात आखडता घेत लिहिल्यासारखे वाटले. देशातल्या,जगातल्या महत्वाच्या व्यक्तींबरोबरच्या मुलाखती घेताना ऑफ द कॅमेरा घडलेल्या घटनांचे असे डॉक्युमेंटेशन होणे गरजेचेच.

**- मेधा कुळकर्णी**

सोमवार, दि. १० ऑगस्ट २०२६
E-mail:-ytljanmadhyam@gmail.com

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

# पालकमंत्री संजय राठोड यांनी कोलाम पोडावर साजरा केला जागतिक आदिवासी दिन..!

## पारंपरिक नृत्य करत झुनका-भाकरीचाही घेतला आस्वाद

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**यवतमाळ, दि. ९ :** जल, जंगल आणि जमिनीशी नाळ जोडलेल्या कोलाम समाजाच्या बांधवांसोबत पालकमंत्री संजय राठोड यांनी जागतिक आदिवासी दिनाचा दिवस थेट कोलाम पोडावर साजरा केला. बाभुळगाव तालुक्यातील पिंपरी ईजारा येथील इंदिरानगर कोलाम पोडावर त्यांनी रविवारी संपूर्ण दिवस ग्रामस्थांसोबत घालवत त्यांच्या समस्या जाणून घेतल्या.

शासकीय प्रोटोकॉलची चौकट बाजूला ठेवत जमिनीवर बसून साधलेला संवाद आणि त्यानंतर प्रशासनाला दिलेले थेट कृतीचे आदेश यामुळे हा उपक्रम लक्षवेधी ठरला. पोड्यावर पोहोचताच पालकमंत्र्यांनी मोरपिसांचा पारंपरिक टोप परिधान केला आणि ढोलाच्या तालावर आदिवासी बांधवांसोबत नृत्य केले. चावडीवर आदिवासी दैवतांचे दर्शन घेत भगवान बिरसा मुंडा, क्रांतिवीर शामादादा कोलाम, राणी दुर्गावती आणि वीर बापुराव शेडमाके यांच्या प्रतिमांना अभिवादन केले. कोलामी भाषेचा अभिमान कायम ठेवत तरुणांनी मराठी व इंग्रजी भाषेवरही प्रभुत्व मिळवून आधुनिक जगाशी स्पर्धा करावी, असे आवाहन त्यांनी केले.

**स्वागत करणाऱ्या महिलांचे पालकमंत्र्यांनी धुतले पाय**

पोड्यावर घराघरांतून पालकमंत्र्यांचे पारंपरिक पद्धतीने स्वागत करण्यात आले. ज्येष्ठ महिलांनी पाय धुवून त्यांचे स्वागत केल्यानंतर राठोड यांनीही त्या महिलांचे पाय धुवून मातृवंदन केले. या भावनिक प्रसंगाने उपस्थित महिला भारावून गेल्या. वृद्ध महिला कौशल महादेव अंजिकर यांच्या आग्रहावरून पालकमंत्र्यांनी आदिवासी नृत्यातही सहभाग घेतला.

### चावडीवर जनता दरबार अधिकाऱ्यांना थेट आदेश

**ग्रामस्थांच्या अडचणी ऐकून घेताना कोलाम समाजाच्या सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक विकासासाठी जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून स्वतंत्र निधीची तरतूद करण्यात आल्याचे राठोड यांनी सांगितले. अभ्यासिका, वाचनालय, विद्यार्थ्यांसाठी थेट बससेवा, उच्च व परदेशी शिक्षणासाठी शिष्यवृत्ती, जलशुद्धीकरण यंत्रे, सामाजिक सभागृह, सांस्कृतिक भवन आणि स्मशानभूमी यांसाठीचे प्रस्ताव तातडीने पुढे नेण्याचे निर्देश प्रशासनाला दिले. महिला बचत गट व ग्रामसंघांना आर्थिक मदत देऊन स्थानिक रोजगारनिर्मितीला चालना देण्याची ग्वाहीही त्यांनी दिली. पोड्यावरील प्रश्नांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यासाठी विशेष स्वीय सहायक नियुक्त केल्याचे त्यांनी स्पष्ट केले.**

# नाला खोलीकरणाचा फटका बेचखेड्यात शेकडो एकर पिके पाण्याखाली!

**तक्रारी करूनही प्रशासनाचे दुर्लक्ष? जयश्री चौधरी, आशीष पाचोळेसह शेतकऱ्यांचे नुकसान**

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**यवतमाळ, दि. ९ :** यवतमाळ तालुक्यातील बेचखेडा शिवारात जलसंधारण विभागाच्या वतीने करण्यात येत असलेल्या नाला खोलीकरणाच्या कामावरून शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. नाला खोलीकरण करताना तांत्रिक निकषांचे पालन होत नसल्याची तक्रार शेतकरी जयश्री चौधरी यांनी जिल्हा जलसंधारण अधिकारी भूषण दमाहे, संबंधित अधिकारी तसेच स्थानिक आमदारांकडे यापूर्वीच केली होती.

मात्र तक्रारीनंतरही वेळीच उपाययोजना करण्यात आली नसल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. नाला खोलीकरणाच्या कामामुळे नाल्याचा नैसर्गिक पाण्याचा प्रवाह बदलल्याने मुसळधार पावसात पाणी थेट शेतांकडे वळल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. परिणामी जयश्री चौधरी, आशीष पाचोळे यांच्यासह परिसरातील अनेक शेतकऱ्यांच्या शेतात पाणी शिरून कापूस, सोयाबीनसह विविध पिकांचे मोठे नुकसान झाले. शेकडो एकर शेती बाधित झाल्याचा दावा शेतकऱ्यांनी केला आहे. दरम्यान, जिल्हा जलसंधारण अधिकारी भूषण दमाहे यांनी काम तांत्रिक निकषांनुसार झाल्याचा दावा केला असून, अतिवृष्टीमुळे नाल्यात मोठ्या प्रमाणात पाणी आल्याने ही परिस्थिती निर्माण झाल्याचे स्पष्ट केले आहे. मात्र शेतकरी या स्पष्टीकरणावर समाधानी नाहीत. नाला खोलीकरणाच्या कामाची स्वतंत्र तांत्रिक तपासणी, प्रत्यक्ष पाहणी आणि दोष निश्चित करून संबंधितांवर कारवाई करावी. तसेच नुकसानग्रस्त शेतकऱ्यांचे तातडीने पंचनामे करून योग्य नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. आता प्रशासन या तक्रारींची दखल घेऊन वस्तुस्थिती समोर आणते का, याकडे शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

# बाभूळगाव क्रांतीदिनी उमरी स्मारक येथे पालकमंत्र्यांच्या हस्ते स्वातंत्र्य संग्राम सैनिकांच्या पाल्यांचा गौरव

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**बाभूळगाव , दि. ९ :** क्रांती दिनी उमरी स्मारक येथे देशाच्या स्वातंत्र्यलढ्यात आपले सर्वस्व अर्पण करणाऱ्या स्वातंत्र्यसंग्राम सैनिकांच्या नातेवाईकांचा पालकमंत्री ना. संजय राठोड यांच्या हस्ते शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

देशाच्या स्वातंत्र्यलढ्यात भाग घेऊन स्वतंत्र संग्राम सैनिकांनी आपल्या प्राणाची आहुती दिली इंग्रजांना पिटाळून लावले यामुळेच आपल्याला स्वतंत्र प्राप्त झाले त्यांच्या प्रती कृतज्ञता व्यक्त करण्याकरिता आपण इथे आल्याचे सांगून त्यांच्या हस्ते स्वातंत्र्यसंग्राम सैनिकांच्या नातेवाईकांचा शाल श्रीफळ पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला नामदार संजय राठोड यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले यावेळी झेंडा उंचा रहे हमारा विश्वविजय तिरंगा प्यारा हे गीत गाईले गेले.

कैलास सुलभेवार, सुरेश माळवी, सत्यदेव पाळेकर, अतिश कोटमकर, शेख मन्नान शेख हसन, निरज राऊत, अतुल देशपांडे, कौशल्या रामटेके, सतीश कोशटवार, नंदू कुटे, विनोद चव्हाण, नंदू गांगेकर आदींचा ना. राठोड यांच्या हस्ते शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यानंतर त्यांच्या हस्ते परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. पोलीस बँड पथकाने मान वंदना दिली तर पीएमबी शाळेच्या विद्यार्थ्यांनी प्रथम संचालन केले.

बालगोपालांनी सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले.

कार्यक्रमाला मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष धोत्रे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी युवराज मेहेत्रे, कार्यकारी अभियंता माधव उघडे, हरिहर लिंगनवार, गजानन डोमाळे, शहीद पत्नी संगीता घोटेकर, सरपंच सोनाली शेळके, नगराध्यक्ष संगीता मालखूरे, उपअभियंता दीपक निचड, तहसीलदार मीरा पागोरे, पोलीस निरीक्षक दीपमाला भेंडे, गटविकास अधिकारी उज्वला ढोले, शाखा अभियंता कीर्ती रामेकर, राजूदास जाधव, बाळासाहेब शिंदे, बाळासाहेब धांदे, जिल्हा उपप्रमुख सचिन महल्ले, राजू पांडे, दिलीप वाघमारे, सुधीर कडुकार, युवराज महानूर, प्रवीण वाईकर, सचिन चव्हाण, प्रकाश भुमकाळे, राजेंद्र देशमुख, प्रज्ञाताई भूमकाळे, गौतम लांडगे, शशिकांत खडसे, प्रशांत वानखडे, नरेंद्र बोबडे, प्रतिष्ठित नागरिक, शिक्षक, शिक्षिका, विद्यार्थी मोठ्या संख्येने हजर होते.

# हमाली करणाऱ्या बापाचा मुलगा थेट ‘क्लास-१’ अधिकारी!

**१३ वर्षे पतीचे आजारपण अन् मजुरी करत आईने घडवले हेमंत चे UPSC ऐतिहासिक यश..!**

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**मारेगाव, दि. ९ :** परिस्थिती कितीही प्रतिकूल असली, तरी जिद्द, संघर्ष आणि आईच्या त्यागापुढे गरिबीही पराभूत होते, याची जिवंत कहाणी मारेगावातील हेमंत लता शंकर बुजाडे याने साकारली आहे.

हमाली करणारे वडील आजारपणामुळे तब्बल १३ वर्षे अंथरुणाला खिळलेले असताना, मजुरी करून संसाराचा गाडा ओढणाऱ्या आईच्या कष्टांचे चीज करत हेमंतने UPSC CAPF AC Exam २०२५ मध्ये उल्लेखनीय यश संपादन केले. त्याची Assistant Commandant (Class-I Gazetted Officer) पदावर निवड झाली आहे. हेमंतच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह वडिलांच्या हमालीवर चालत होता. मात्र, १३ वर्षांपूर्वी वडिलांना अर्धांगवायूचा झटका आला आणि कुटुंबाचा कमावता आधारच कोसळला. त्यानंतर लताताई बुजाडे यांनी आजारी पतीची शुश्रूषा करत मजुरी करून कुटुंबाचा भार उचलला. स्वतःच्या सुखाचा त्याग करून त्यांनी मुलाच्या शिक्षणाला कधीही गरिबीची झळ लागू दिली नाही. हेमंतने दहावीपर्यंतचे शिक्षण मारेगावात, बारावी वणीतील एसपीएम कॉलेजमधून, तर अभियांत्रिकीचे शिक्षण यवतमाळच्या जगदंबा पॉलिटेक्निकमधून पूर्ण केले. अधिकारी होण्याचे स्वप्न घेऊन पुण्यात दाखल झाल्यानंतर त्याने शिक्षणाचा खर्च भागवण्यासाठी जिममध्ये काम केले. UPSCच्या पुस्तकांसाठी पैसे अपुरे पडले तेव्हा त्याने मजुरीही केली. संघर्षाला शरण न जाता त्याने अखेर यशाला गवसणी घातली. आईचे कष्ट, आजोबा-मावशीचा आधार आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांची प्रेरणा यामुळेच हे यश मिळाले, अशी भावना हेमंतने व्यक्त केली. या प्रेरणादायी यशाची दखल घेत माजी केंद्रीय गृहराज्यमंत्री हंसराज अहिर यांनी बुजाडे यांच्या निवासस्थानी भेट देऊन हेमंतचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. यावेळी भाजप किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष दिनकर पावडे यांच्यासह पदाधिकारी, लोकप्रतिनिधी व नागरिक उपस्थित होते. आईच्या कष्टांचे सोनं करणाऱ्या हेमंतची ही झेप केवळ एका कुटुंबाचा विजय नसून, प्रतिकूल परिस्थितीशी झुंजणाऱ्या हजारो तरुणांसाठी संघर्षातून यशाचा दीपस्तंभ ठरली आहे.

## थोडक्यात



### जागतिक आदिवासी दिनानिमित्त घाटंजी येथे क्रांतिसूर्य भगवान बिरसा मुंडा यांना अभिवादन

**घाटंजी :** ९ ऑगस्ट जागतिक आदिवासी दिन घाटंजीत उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त तहसील चौक येथे भगवान बिरसा मुंडा यांच्या पुतळ्यास मान्यवरांच्या हस्ते हार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाच्या माध्यमातून आदिवासी समाजाच्या ऐतिहासिक संघर्ष, संस्कृती, परंपरा आणि हक्कांचे स्मरण करण्यात आले. भगवान बिरसा मुंडा यांच्या विचारांना अभिवादन करत आदिवासी समाजाच्या विकासासाठी एकजुटीने काम करण्याचा संदेश यावेळी देण्यात आला. या कार्यक्रमाला माननीय आमदार प्रा.राजूभाऊ तोडसाम, जिल्हा महामंत्री रेखाताई कोठेकर, विणकर मॅडम, महिला आघाडी तालुका अध्यक्षा सौ.वर्षा पेदोर, तालुका अध्यक्ष विजय बैस, माजी पंचायत समिती उपसभापती रमेश धुर्वे, तसेच बाळू जाधव, विनय जाधव,संदीप माटे,गोपाल काळे,पंकज ठाकरे, महेश जाधव, बंडू तोडसाम, अरविंद जाधव, राऊत काका, राम खांडरे, अंकुश ठाकरे, प्रदीप ठोबरे, अमित महल्ले, अनुप अप्पनवार, नरेश पेदोर यांच्यासह अनेक कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते. यावेळी उपस्थित मान्यवरांनी भगवान बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहिली. कार्यक्रमात आदिवासी समाजाची एकजूट, शिक्षण, सामाजिक विकास आणि हक्कांसाठी संघटितपणे कार्य करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

### हिवरा (सं) ग्रामपंचायत येथे जागतिक आदिवासी दिन साजरा

**महागाव:** ग्रामपंचायत हिवरा संगम येथे आज, ९ ऑगस्ट २०२६ रोजी 'जागतिक आदिवासी दिवस' अत्यंत उत्साहात व भावपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात क्रांतीसूर्य जननायक बिरसा मुंडा आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून व अभिवादन करून करण्यात आली. यावेळी महेश भोयर , कनिष्ठ अभियंता , जलसंपदा विभाग (महाराष्ट्र शासन) यांनी आदिवासी समाजाच्या हक्कांबद्दल आणि निसर्गरक्षणाच्या परंपरेबद्दल आपले विचार व्यक्त केले. जागतिक आदिवासी दिवस हा केवळ एक उत्सव नसून आदिवासी संस्कृती, जल-जंगल-जमीन यांचे संरक्षण आणि समाजाच्या संघर्षाचा सन्मान करण्याचा दिवस आहे, असा संदेश या वेळी देण्यात आला. तसेच, क्रांतीसूर्य जननायक बिरसा मुंडा यांनी इंग्रजी सत्तेविरुद्ध आणि शोषणाविरुद्ध दिलेल्या 'उलगुलान' (उठाव) या लढ्याचे स्मरण करून, त्यांनी अल्पवयात समाज आणि मातृभूमीसाठी दिलेल्या अभूतपूर्व बलिदानाला व विचारांना उजाळा दिला. उपस्थित मान्यवर: कार्यक्रमास ग्रामपंचायत हिवरा संगमचे प्रशासकीय समिती सदस्य तथा माजी उपसरपंच शरद पाटील कदम आणि गावातील प्रतिष्ठित नागरिक गजानन साहेबराव कदम यांची प्रमुख उपस्थित लाभली.

### सीसीएमपी डॉक्टरांच्या एमएमसी नोंदणीला विरोध का?

**ग्रामीण आरोग्यसेवेचा प्रश्न ऐरणीवर होमिओपॅथीला नियमांची गरज**

**उमरखेड :** महाराष्ट्र शासनमान्य सीसीएमपी (मॉडर्न फार्माकॉलॉजी) अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या होमिओपॅथी डॉक्टरांच्या महाराष्ट्र मेडिकल कौन्सिल (एमएमसी) नोंदणीवरून वैद्यकीय क्षेत्रात वाद निर्माण झाला आहे. या नोंदणीला विरोध का? असा सवाल उमरखेड येथील होमिओपॅथी डॉक्टर संघटनेने उपस्थित केला आहे. बीएचएमएस हा साडेपाच वर्षांचा पदवी अभ्यासक्रम असून, त्यानंतर सीसीएमपीच्या माध्यमातून आधुनिक औषधशास्त्राचे अतिरिक्त प्रशिक्षण दिले जाते. ग्रामीण, आदिवासी व अतिदुर्गम भागात एमबीबीएस डॉक्टरांची कमतरता असताना प्रशिक्षित डॉक्टरांना कायदेशीर चौकटीत प्राथमिक उपचाराची संधी मिळणे आवश्यक असल्याचा दावा संघटनेने केला. एमएमसी नोंदणीमुळे ॲलोपॅथी डॉक्टरांच्या समकक्ष दर्जा किंवा अमर्याद उपचार अधिकार मिळणार नसून, उलट उपचारांच्या मर्यादा व जबाबदारी निश्चित होईल, असे डॉक्टरांचे म्हणणे आहे. नोंदणीचा विषय न्यायप्रविष्ट असला तरी उच्च न्यायालयाने स्थगिती दिलेली नसल्याचा दावा करत, शासनाने विरोधाऐवजी स्पष्ट नियम व जबाबदारीची चौकट निश्चित करावी, अशी मागणी संघटनेने केली.

# शस्त्र घेऊन दहशत निर्माण करणाऱ्या इसमाला घेतले ताब्यात.!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी




**पुसद, दि. ९ :** धारदार शस्त्र घेऊन दहशत निर्माण करणाऱ्या इसमावर पोलीस स्टेशन पुसद शहर पथकाची शस्त्र अधिनियम कलम ४२५ प्रमाणे कारवाई आज दिनांक ९/ ८ /२०२६ रोजी दुपारी २/०० पोलीस निरीक्षक यांच्या आदेशान्वये पोलीस स्टेशन पुसद शहर परिसरात डीबी पथक पेट्रोलिंग करीत असतांना गोपनीय बातमीदार यांच्याकडून माहिती मिळाली एक इसम नामे रवी जनार्धन वांजाळ वय ३७ वर्ष राहणार सुभाष वार्ड पुसद हा कुस्ती आखाडा पार्किंग पॉईंट जवळ पुसद येथे हातात धारदार लोखंडी तलवार घेऊन दहशत निर्माण करीत आहे.

अशा मिळालेल्या गोपनीय माहितीवरून पंचासह जाऊन कारवाई केली असता एक इसम संस्थेत रित्या दिसला त्यास पंचा समक्ष नाव गाव विचारले असता त्याने त्याचे नाव रवी जनार्धन वांजाळ वय ३७ वर्ष राहणार सुभाष वार्ड पुसद असे सांगितले वरून त्याची पंचा समक्ष झडती घेतली असता त्याचे कमरेला पॅन्ट मध्ये खोसून एक लोखंडी टोकदार व धारदार पितळी मूठ असलेली तलवार याची लांबी २३ इंच मोठीची लांबी ५ इंच व पात्याची लांबी १८ इंच किंमत १०००/हजार रुपयाची मिळून आल्याने पंचायत समक्ष जप्त करून ताब्यात घेतली सदर इसमावर शस्त्र अधिनियम कलम ४, २५ अन्वये कारवाई करण्यात आली सदरची कारवाई पोलीस अधीक्षक कुमार चिंता सहायक पोलीस अधीक्षक थोरात,उपविभागीय पोलीस अधिकारी अमर मोहिते यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक पुरुषोत्तम आहेरकर यांचे मार्गदर्शनात पोलीस उपनिरीक्षक अक्षय सनगर सोबत पोलीस अंमलदार मनोज कदम आकाश बाभूळकर , शुद्धोधन भगत, सचिन राऊत यांनी पार पडले.

# अवैध रेती उत्खनन करून रात्रीच्या वेळी बेधडक विक्री

**शासनाचा करोडो रुपये महसूल माफियाच्या घशात; महसूल प्रशासनाच्या कार्याप्रनालीवर प्रश्नचिन्ह.!**

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**पुसद, दि. ९ :** तालुक्यात वाढत्या अवैध रेती उत्खनन करून बेभान किंमतीमध्ये बेधडक रात्रीच्या वेळी विक्री होत असून आणि अवैध वाहतुकीमुळे शासनाच्या महसुलला करोडो रुपयाचा फटका बसत आहे. यामध्ये सर्वसामान्य नागरिक व घरकुल योजनेचे लाभार्थी रेतीअभावी अडचणीत आले आहेत. या पार्श्वभूमीवर अवैध रेती व्यवसायावर तात्काळ कारवाई करून घरकुल लाभार्थ्यांना मागणीनुसार अधिकृत व मुबलक रेती उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी ग्रामीण भागातील नागरिकांकडून केल्या जात आहे,

सबब तत्कालीन पुसद तहसीलदार महादेव जोरवर यांनी अवैध गौणखनिज माफियावर धडाकेबाज कारवाई करून अनेक गाड्या जप्त करून लाखो रुपये दंड महसूल प्रशासनाला वसूल करून दिला. मात्र गेल्या सहा महिन्यापासून अशी कोणतीही मोठी ठोस कारवाई रेती माफिया यांच्यावर करण्यात आली नाही त्यामुळे महसूल प्रशासनावर प्रश्नचिन्ह ?उपस्थित केले जात आहे. या अवैध रेतीच्या वाहतुकीकडे विद्यमान असलेले तहसीलदार यांनी अवैध रेती वाहतूक रात्रीच्या वेळी चोरट्या मार्गाने विक्री होत असलेल्या वाहनांवर कारवाई करतील का असा सुद्धा प्रश्न नागरिकाकडून उपस्थित केला जात आहे. तालुक्यातील सर्वसामान्य नागरिक तसेच प्रधानमंत्री आवास योजना व इतर घरकुल योजनांतील लाभार्थ्यांना अधिकृत मार्गाने आवश्यक प्रमाणात रेती मिळत नाही. मात्र दुसरीकडे काही ठिकाणी अवैधरीत्या रेतीचे उत्खनन करून ती वाहतुकीद्वारे विविध ठिकाणी साठवनूक करून जादा दराने विक्री केली जात असल्याच्या तक्रारी नागरिकांकडून सातत्याने प्राप्त होत आहेत. या प्रकारामुळे शासनाचा महसूल करोडो रुपये बुडत असून पर्यावरणालाही हानी पोहोचत आहे. तसेच गरजू नागरिकांना बांधकामासाठी आवश्यक रेती उपलब्ध न झाल्याने त्यांची कामे रखडत असल्याचेही घरकुल लाभार्थ्याकडून उघडपणे बोलल्या जात आहे. एकीकडे महसूल प्रशासन व महाराष्ट्र शासन घरकुल लाभार्थ्यांना घरकुल मंजूर करत आहे परंतु त्यांचे रेती अभावी अर्धवट घरकुलाचे काम रखडलेले असून त्यांना मोठ्या अडचणीचा सामना करावा लागत आहे, त्यामुळे महसूल प्रशासनाने तालुक्यातील व शहरातील सर्व अवैध रेती साठ्यांची तपासणी करावी,अवैध उत्खनन व रात्रीच्या वेळी विक्री करणाऱ्यां रेती माफियावर कठोर कारवाई करावी, रेती वाहतूक करणाऱ्या वाहनांच्या रॉयल्टीची आणि आवश्यक कागदपत्रांची पडताळणी करून कायदेशीर कारवाई करावी तसेच गरजवंत घरकुल लाभार्थी आणि सर्वसामान्य नागरिकांना शासनाच्या नियमानुसार मागणीप्रमाणे मुबलक रेती उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्यात यावी अशी मागणी ग्रामीण भागातील नागरिकाकडून जोर धरत आहे.

# महागाव येथे जागतिक आदिवासी दिन साजरा

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

✦ किरण नरवाडे



**महागाव, दि. ९ :** येथे आज, ९ ऑगस्ट २०२६ रोजी `जागतिक आदिवासी दिवस` अत्यंत उत्साहात व भावपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात महागाव येथील जुने बसस्थानक परिसरातील क्रांतीसूर्य जननायक धरती अबा बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून व अभिवादन करून करण्यात आली. जागतिक आदिवासी दिवस हा केवळ एक उत्सव नसून आदिवासी संस्कृती, जल-जंगल-जमीन यांचे संरक्षण आणि समाजाच्या संघर्षाचा सन्मान करण्याचा दिवस आहे, असा संदेश या वेळी देण्यात आला. तसेच, क्रांतीसूर्य जननायक बिरसा मुंडा यांनी इंग्रजी सत्तेविरुद्ध आणि शोषणाविरुद्ध दिलेल्या `उलगुलान` (उठाव) या लढ्याचे स्मरण करून, त्यांनी अल्पवयात समाज आणि मातृभूमीसाठी दिलेल्या अभूतपूर्व बलिदानाला व विचारांना उजाळा दिला. या कार्यक्रमास उपस्थित मान्यवर महागाव शहरातील तसेच ग्रामीण भागातील मोठ्या संख्येने आदिवासी बांधव तसेच महिला भगिनी उपस्थित होते.

# रक्तदानातून स्वातंत्र्याचा खरा संकल्प!

**यवतमाळ, दि. ९ :** स्वातंत्र्याचा उत्सव केवळ ध्वजारोहण, देशभक्तीपर घोषणा आणि सांस्कृतिक कार्यक्रमांपुरता मर्यादित न ठेवता एखाद्याचे प्राण वाचविण्याचा संकल्प कृतीत उतरविण्याचा निर्धार यवतमाळातील विविध सामाजिक संस्थांनी केला आहे. ‘चला रक्तदान करूया, नातं नव घडवूया!’ या सामाजिक उपक्रमांतर्गत १५ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ९.३० ते दुपारी ३ वाजेपर्यंत शिवशक्ती लॉन, स्टेट बँक चौक, यवतमाळ येथे भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिराच्या नियोजनासाठी आयोजन समितीतील विविध सामाजिक संस्थांच्या पदाधिकाऱ्यांची बैठक रविवार, ९ ऑगस्ट रोजी बुंदेला अ‍ॅड्स, चापमानवाडी, जस्मित कॉम्प्लेक्स, तलाठी कार्यालयासमोर, यवतमाळ येथे पार पडली. दुपारी १२ ते २ वाजेपर्यंत झालेल्या या बैठकीला संयोजक शैलेश करिहार यांनी मार्गदर्शन केले.

# उमरसरा येथे ‘जिवंत काडतुस’ सह तरुण ताब्यात!

## अवधूतवाडी पोलिसांची धडक कारवाई..

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. ९ :** शहरातील उमरसरा परिसरात बेकायदेशीररीत्या जिवंत काडतुसे बाळगणाऱ्या २३ वर्षीय तरुणाला अवधूत वाडी पोलिसांच्या डी.बी. पथकाने ताब्यात घेत दोन जिवंत काडतुसे जप्त केली. या कारवाईमुळे परिसरात अवैध शस्त्रसाठ्याचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

पोलिसांना मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार, उमरसरा येथील तीन फोटो परिसरात एक इसम बेकायदेशीररीत्या जिवंत काडतुसे घेऊन फिरत असल्याची माहिती मिळाली होती. माहितीची गांभीर्याने दखल घेत पोलिसांनी वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली तातडीने सापळा रचून संशयिताचा शोध घेतला आणि त्याला ताब्यात घेतले. पंचांसमक्ष अंगझडती घेतली असता त्याच्या पर्समध्ये दोन नग जिवंत काडतुसे आढळून आली. प्राथमिक तपासणीत दोन्ही काडतुसे जिवंत असल्याचे निष्पन्न झाले. विशेष म्हणजे, ही काडतुसे बाळगण्यासाठी आरोपीकडे कोणताही वैध शस्त्र परवाना अथवा अधिकृत परवानगी नसल्याचे पोलिसांच्या तपासात समोर आले. या प्रकरणी शुभम देवेंद्र तिवारी (२३), रा. ग्रीन पार्क सोसायटी, उमरसरा, यवतमाळ याच्याविरुद्ध शस्त्र अधिनियम, १९५९ मधील कलम ३ सह २५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीकडे ही काडतुसे नेमकी कुठून आली, त्याचा वापर कोणत्या उद्देशाने केला जाणार होता आणि त्यामागे आणखी कोणाचा सहभाग आहे का, याचा तपास आता पोलिसांकडून सुरू आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक कुमार चिंथा, अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात, उपविभागीय पोलीस अधिकारी अमोल कोळी व पोलीस निरीक्षक अजित कदम यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. डी.बी. पथकाने केलेल्या या कारवाईत सहायक पोलीस निरीक्षक रविंद्र बारड, श्रीकांत जिंदमवार यांच्यासह पोलिस अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला.

**SANT GADGE BABA AMRAVATI UNIVERSITY, AMRAVATI.**

Ref. No. SGBAU/8/C-1821/2026. Date 05.08.2026.

**Parwa Education Society , Parwa,Tq - Ghatanji, Dist. Yavatmal.**

**WANTED**

**(For Session 2026-27)**

**Name of College : Babasaheb Deshmukh Parwekar Mahavidyala, Parwa, Tq-Ghatanji Dist. Yavatmal**

**Walk – in – Interview**

Application are invited for the appointments of candidates for the teaching in the college on contributory ( CHB ) basis as under :

Vacancies for Grant-in-Aid Courses / Programmes

( As per Regulation No.2/2020, and its para – 11,G.R. Dated 17.10.2022)

| Sr.No. | Subject/Course | Total No. of. Contributory Post |
|---|---|---|
| 1 | Marathi | 01 |

**Eligibility :** Academic qualifications shall be as per U.G.C. Regulation 2018 ( University Direction No. 08/2019, & 14/2019) for the post of Assistant Professor as directed in the Govt. resolution No. संकीर्ण–2018/( 185 / 18) / मशि &3, dt. 14 - 11-2018. The other conditions and Remuneration shall be as fixed by Govt.in the said G.R.

Qualified candidates may apply and appear for the interview with Xerox and original of all documents on **17.08.2026 at 12.30 pm** at Babasaheb Deshmukh Parwekar Mahavidyalaya , Parwa ,Dist. Yavatmal. No T.A.D.A. will be given to candidates.

**Mr. J.D. alias Annasaheb Deshmukh Parwekar.**
President
Parwa Education Society , Parwa.

**Dr. Dharmendra P. Telgote**
Principal
B. D. Parwekar Mahavidyala, Parwa.

### जुळ्या शहरात फक्त त्या ॲप ची चर्चा....

# विदेशातील तो ॲप अचानक बंद; अचलपूर-परतवाड्यात अनेकांची हजारो रुपयांची गुंतवणूक अडकली


**अचलपूर/वार्ताहर**

विदेशातील असल्याचे सांगितले जाणारे एक अर्निंग ॲप अचानक बंद झाल्याने अचलपूर-परतवाडा जुळ्या शहरातील अनेक नागरिकांची हजारो रुपयांची गुंतवणूक अडकल्याची चर्चा सध्या जोरात सुरू आहे. या प्रकरणात विद्यार्थी, शासकीय व खासगी क्षेत्रातील नोकरदार तसेच व्यापारी वर्गातील अनेकांनी पैसे गुंतविल्याची माहिती समोर येत असून, संबंधित व्यक्तींकडे जाब विचारण्यासाठी आर्थिक नुकसान झालेल्या नागरिकांच्या चकरा सुरू असल्याचे सांगितले जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, सुरुवातीला मोबाईलवर सोपे टास्क देऊन त्याबदल्यात पैसे मिळण्याचे आमिष दाखवण्यात आले. यामध्ये युट्यूब व्हिडिओला लाईक करणे, रेटिंग देणे यासारखी कामे दिली जात होती. सुरुवातीला १०० ते ५०० रुपयांपर्यंत रक्कम मिळत असल्याने संबंधित ॲपवर नागरिकांचा विश्वास निर्माण झाला. त्यानंतर अधिक कमिशन मिळविण्यासाठी VIP मेंबरशिप किंवा 'प्रीपेड टास्क'च्या नावाखाली ५ हजारांपासून ५० हजार रुपये किंवा त्याहून अधिक रक्कम गुंतविण्यास सांगितले जात असल्याची माहिती आहे.

अनेकांनी सुरुवातीला कमी रक्कम गुंतविल्यानंतर ॲपवर वाढलेली कमाई आणि बॅलन्स पाहून मोठ्या प्रमाणात पैसे गुंतविल्याची चर्चा आहे.मात्र,त्यानंतर अचानक ॲपवरील विथड्रॉलची प्रक्रिया बंद झाल्याचे सांगण्यात येत आहे. पैसे काढण्याचा प्रयत्न केल्यावर 'टॅक्स भरा', 'सिस्टम एरर', 'आयडी फ्रीझ झाली आहे' आदी कारणे सांगून आणखी पैसे भरण्यास सांगितले जात असल्याची माहिती काही नागरिकांकडून मिळत आहे.

विशेष म्हणजे, या ॲपशी संबंधित टेलिग्राम किंवा व्हॉट्सॲप ग्रुपच्या माध्यमातून नागरिकांना




जोडले जात असल्याची चर्चा आहे. मोठ्या प्रमाणात रक्कम जमा झाल्यानंतर संबंधित ॲप तसेच काही टेलिग्राम अकाउंट्स अचानक बंद झाल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे जुळ्या शहरातील विविध भागात या प्रकरणाची चर्चा सुरू असून, नेमकी किती नागरिकांनी या ॲपमध्ये गुंतवणूक केली आणि किती रक्कम अडकली, याबाबत अद्याप अधिकृत माहिती उपलब्ध झालेली नाही.

या व्यवहारांपैकी अनेकांनी UPI किंवा नेट बँकिंगच्या माध्यमातून पैसे पाठविल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.त्यामुळे संबंधित नागरिकांनी आपल्या बँकांना व्यवहाराची माहिती दिली आहे का, संशयास्पद व्यवहारांवर तत्काळ काही कारवाई होऊ शकते का, तसेच या प्रकरणी पोलिसांत तक्रार दाखल होणार का, असे अनेक प्रश्न उपस्थित झाले आहेत.

दरम्यान, घरबसल्या सोपे काम करून दररोज मोठी कमाई मिळवून देण्याच्या जाहिराती तसेच अनोळखी टेलिग्राम किंवा व्हॉट्सॲप लिंकच्या माध्यमातून अशा प्रकारच्या टास्क अर्निंग ॲप्समध्ये नागरिकांना सहभागी करून घेतले जात असल्याची चर्चा आहे. त्यामुळे अशा ॲप्समध्ये पैसे गुंतविण्यापूर्वी त्यांची विश्वासार्हता तपासण्याचे आवाहन केले जात आहे.

## मिलिंद विद्यालयात शिक्षक-पालक सभा

**खल्लार/वार्ताहर**

नजिकच्या गौरखेडा (चांदई )येथिल मिलिंद विद्यालयात शैक्षणिक सत्र २६-२७ मधली पहिली शिक्षक-पालक सभा नुकतीच उत्साहात व आनंदमय वातावरणात पार पडली.अध्यक्षस्थानी विद्यालयाचे मुख्याध्यापक ए. बी.वानखडे हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून वर्ग पाच ते दहा चे पालक उपस्थित होते.



यावेळी सभेमध्ये विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसह त्यांच्या सर्वांगीण विकासाशी संबंधित विविध विषयावर सविस्तर चर्चा करण्यात आली. शाळेतील उपलब्ध सोयी-सुविधा तसेच विविध शिष्यवृत्ती योजनांची माहिती पालकांना देण्यात आली. विद्यार्थ्यांमध्ये शिस्त व संस्कार देण्याचे काम कुटुंब व शाळा यांचे असून पालकांनी व शिक्षकांनी मिळून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास कसा साध्य करता येईल याविषयी सभेमध्ये सांगोपांग चर्चा करण्यात आली. या चर्चेमध्ये बहुतांश पालकांनी सहभाग घेतला.

वर्षभर विद्यालयांमध्ये विविध उपक्रमांमधून विद्यार्थ्यांमध्ये अभ्यासाची आवड अधिकाअधिक कशी निर्माण करता येईल यासाठी कोणकोणते उपक्रम घेता येतील पालक सभेचे संचालन अमोल बोबडे यांनी केले. यावेळी शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व माता पालक वर्ग आणि बहुतांश पालक उपस्थित होते. सभेची सांगता विद्यालयाच्या माझे विद्यालय या गीताने करण्यात आली.

## शाळेजवळच चिखलाचे तळे; विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर

### ग्रामपंचायतीच्या कारभारावर प्रश्नचिन्ह; नागरिकांना फटका

**अंजनगाव बारी/वार्ताहर**

पावसाळा सुरू होताच अंजनगाव बारीतील रस्त्यांच्या दुरवस्थेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. गावातील रस्त्यावर मोठ्या प्रमाणात पावसाचे पाणी व चिखल साचल्याने नागरिकांसह विद्यार्थ्यांना ये-जा करताना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

विशेषतः जिल्हा परिषद मुलांच्या शाळेजवळच मोठा खड्डा निर्माण होऊन त्यात पाणी साचले आहे. याच मार्गाने दररोज लहान मुले ये-जा करीत असल्याने घसरून पडण्याची किंवा अपघात होण्याची शक्यता आहे. त्यामुळे पालकांमध्ये चिंता व्यक्त होत आहे.

दरवर्षी पावसाळ्यात अशीच परिस्थिती निर्माण होत असताना नाल्यांची साफसफाई, पाण्याचा निचरा आणि रस्त्यांची दुरुस्ती याबाबत ग्रामपंचायतीकडून ठोस उपाययोजना का केल्या जात नाहीत, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित होत आहे. दुर्घटना घडण्यापूर्वी प्रशासनाने शाळेजवळील खड्डा बुजवून पाण्याचा निचरा करावा, अशी मागणी होत आहे.




## श्री क्षेत्र सावंगा (विठोबा) नगरीत श्रावण मास मांड शुभारंभ व चंदनउटी उत्सव

**चांदूर रेल्वे/वार्ताहर**

अमरावती जिल्ह्यातील चांदुर रेल्वे तालुक्यातील श्री क्षेत्र सावंगा (विठोबा) येथील श्री विठोबा संस्थान उर्फ श्रीकृष्ण अवधूत बुवा संस्थान येथे बुधवार,१२ ऑगस्ट २०२६ रोजी श्रावण मास मांड (अखंड भजन) शुभारंभ तसेच अमावस्येनिमित्त चंदनउटी उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

श्रावण मास मांडची सुरुवात सकाळी ५ वाजता लहान मंदिरात ढाल बसवून करण्यात येणार असून, त्यानंतर मुख्य मंदिरात या मांडीचा शुभारंभ महाराजांच्या गणाने विश्वस्त मंडळ व भाविक भक्तांच्या उपस्थितीत हा धार्मिक विधी पार पडणार



आहेत. तसेच दुपारी ४ वाजता संस्थानच्या वतीने अमावस्येनिमित्त भव्य चंदनउटी उत्सव आयोजित करण्यात आला आहे.

श्रावण मास मांडदरम्यान बाहेरगावातील विविध अवधूत भजन मंडळांचा दैनंदिन सहभाग राहणार आहे. यासाठी संस्थानच्या वतीने भजन मंडळांच्या पाळीचे नियोजन करण्यात आले आहे.या सर्व धार्मिक व सामाजिक उपक्रमांना सर्व भाविक भक्तांनी तन-मन-धनाने सहकार्य करून कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन संस्थानचे अध्यक्ष पुंजाराम नेमाडे, उपाध्यक्ष कृपासागर राऊत, सचिव अशोक सोनवाल तसेच विश्वस्त वसंत शेंडे, गोविंद राठोड, फुलसिंग राठोड, चरणदास कांडलकर, प्रविण कुकडकर, लक्ष्मण राठोड, वैभव मानकर, स्वप्नील चौधरी व समस्त विश्वस्त मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

## पी.आर.पोटे पाटील इंटरनॅशनल स्कूलमध्ये क्रांती दिन

**अमरावती/का.प्र.**

पी. आर. पोटे पाटील इंटरनॅशनल येथे क्रांती दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील 'भारत छोडो आंदोलन' आणि स्वातंत्र्यवीरांच्या त्यागाचे स्मरण करून विद्यार्थ्यांनी देशभक्तीची भावना जागृत केली.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला क्रांतिकारकांना आदरांजली अर्पण करण्यात आली. विद्यार्थ्यांनी क्रांती दिनाचे ऐतिहासिक महत्त्व, स्वातंत्र्यसैनिकांचे योगदान आणि देशाच्या स्वातंत्र्यासाठी त्यांनी केलेल्या त्यागाविषयी मनोगत व्यक्त केली. देशभक्तीपर घोषवाक्ये व



विचारांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी स्वातंत्र्यसैनिकांच्या शौर्याला अभिवादन केले.

या प्रसंगी विद्यार्थ्यांना 'करेंगे या मरेंगे' या ऐतिहासिक घोषणेचा आणि भारत छोडो आंदोलनाचा इतिहास समजावून सांगण्यात आला. विद्यार्थ्यांमध्ये देशप्रेम, राष्ट्रनिष्ठा आणि आपल्या देशाच्या उज्ज्वल भविष्यासाठी जबाबदार नागरिक म्हणून योगदान देण्याची प्रेरणा निर्माण झाली.

शाळेचे प्राचार्य सचिन दुर्गे, उपप्राचार्या सोनल निस्ताने तसेच शिक्षकवृंद यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम उत्साहात पार पडला. विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग हे कार्यक्रमाचे विशेष आकर्षण ठरले.'क्रांतीची ज्योत मनामध्ये तेवत ठेवूया,

स्वातंत्र्यवीरांच्या त्यागाचे सदैव स्मरण करूया!'अशा देशभक्तीपूर्ण वातावरणात क्रांती दिनाचा कार्यक्रम उत्साहात झाला.

# 'मध्यान्ह भोजन'ला धान्य तुटवड्याचा फटका

### जिल्ह्यातील निम्म्याहून अधिक शाळांमध्ये उसनवारीवर स्वयंपाक; नियोजनावर प्रश्नचिन्ह

**अमरावती/का.प्र.**

शैक्षणिक वर्ष सुरू होऊन महिनाभराहून अधिक कालावधी उलटला असतानाही अमरावती जिल्ह्यातील अनेक शाळांमध्ये प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण (मध्यान्ह भोजन) योजनेसाठी आवश्यक धान्य व इतर साहित्याचा पुरवठा झालेला नाही. त्यामुळे जिल्ह्यातील निम्म्याहून अधिक शाळांना विद्यार्थ्यांचे मध्यान्ह भोजन सुरू ठेवण्यासाठी स्थानिक पातळीवर उसनवारी करावी लागत असल्याचे समोर आले आहे.काही तालुक्यातील शाळांना फक्त तांदुळ देण्यात आला आहे पण इतर धान्य,साहीत्य मिळाले नाही.त्यामुळे पोषण आहाराची चव बिघाडली असुन मुख्याध्यापक व शिक्षक यांच्यावर या खर्चाचा आर्थिक भार पडला आहे.

मध्यान्ह भोजन ही आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाची योजना आहे.वर्ग पहीली ते आठवी करीता ही योजना असली तरी इतर विद्यार्थी सुध्दा याचा लाभ मिळतो. मात्र, पुरवठ्यातील विलंबामुळे विद्यार्थ्यांच्या पोषणाचा प्रश्न निर्माण झाला आहे. शाळांच्या नियोजनावरही याचा परिणाम होत असल्याचे दिसून येत आहे.

जिल्ह्यातील अनेक शाळांमध्ये विद्यार्थ्यांना भोजन मिळावे यासाठी मुख्याध्यापकांना स्थानिक पातळीवरून धान्याची व्यवस्था करावी लागत आहे. काही ठिकाणी शाळांनी उसनवारीवर धान्य घेऊन भोजन सुरू ठेवले आहे. त्यामुळे शाळांवर अतिरिक्त आर्थिक व प्रशासकीय भार पडत आहे. भातकुली,अमरावती



तालुक्यातील शाळांना फक्त तांदुळ मिळाला आहे.पण इतर धान्य व साहीत्य मिळाले नाही.

शिक्षण विभागाकडून धान्याचा पुरवठा वेळेवर होणे अपेक्षित असताना अद्यापही काही शाळांना पुरेसा साठा मिळालेला नाही. यामुळे विद्यार्थ्यांना भोजन देताना शाळांना अडचणींचा सामना करावा लागत आहे.

दरम्यान, जिल्ह्यातील ५० टक्क्यांहून अधिक शाळांमध्ये ही परिस्थिती असल्याचे वृत्तात नमूद करण्यात आले आहे.भातकुली, अमरावती, चिखलदरा,धारणी आदी भागांतील शाळांमध्येही धान्याच्या उपलब्धतेचा प्रश्न निर्माण झाल्याचे सांगण्यात आले आहे.काही शाळांनी योजनेच्या शासकीय स्तरावरील प्रक्रियेमुळे धान्य मिळण्यास विलंब झाल्याने स्थानिक स्तरावरून धान्य घेऊन मध्यान्ह भोजन सुरू ठेवले आहे. मात्र, ही व्यवस्था किती दिवस चालणार,असा प्रश्न मुख्याध्यापकांकडून उपस्थित केला जात आहे.

शाळांनी पुरवठा व शाळेत येणाऱ्या धान्याचे नियोजन वेळेत करण्याची मागणी केली आहे. विद्यार्थ्यांना नियमित व पौष्टिक भोजन मिळण्यासाठी धान्याचा पुरवठा तातडीने सुरळीत करणे आवश्यक असल्याचेही सांगण्यात येत आहे.तसेच उत्तम पोषण आहारा करीता भाजीपाला विकत आणावा लागतो त्या करीता निधी वेळेवर दिला जात नाही.याकरीता शाळांना ॲडव्हान्स स्वरुपात निधी देण्याची मागणी होत आहे.तसेच स्वयंपाकी आणि मदतनिस यांच्या मानधनात वाढ होणे आवश्यक आहे.

## संक्षिप्त

### विद्यार्थ्यांना मोफत शालेय साहित्याचे वाटप



**ब्राह्मणवाडा थडी -** येथील श्री नागनाथ विद्यालयात श्री संत गाडगेबाबा आश्रम शाळेच्या वतीने इयत्ता ५ वी ते १० वीच्या सर्व विद्यार्थ्यांना मोफत शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे मुख्याध्यापक जयदीप देशमुख होते. या प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून संत गाडगेबाबा आश्रम शाळा नागरवाडीचे संचालक मा.सागर देशमुख आणि संत गाडगेबाबा धर्मशाळा नाशिकचे संचालक कुणाल देशमुख उपस्थित होते.कार्यक्रमाची सुरुवात विद्यालयाचे मुख्याध्यापक जयदीप देशमुख सर यांच्या प्रास्ताविकाने झाली. त्यांनी आपल्या प्रास्ताविकेतून कार्यक्रमाची रूपरेषा व उद्देश उपस्थितांसमोर मांडला. यानंतर मान्यवरांच्या हस्ते गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वितरण करण्यात आले.या कार्यक्रमाला व्ही. एन. देशमुख, एन. देशमुख सर, पी. पी. मोहोड, ए. डी. ठाकरे, व्हि. एस. काळे, आर. बी. केवट,पी. बी. अगुधरे, एस. के. वेलकर, वर्षा मेसकर, धनंजय इंगळे, रसिका तायडे यांच्यासह नागरवाडी आश्रम शाळेचे शिक्षक, कर्मचारी व विद्यार्थी तसेच श्री नागनाथ विद्यालयाचे सर्व विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे संचालन पी.पी.मोहोड यांनी केले, तर उपस्थितांचे आभार व्ही.एन. देशमुख यांनी मानले. अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात हा कार्यक्रम पार पडला.

### गुरुपौर्णिमेनिमित्त तबलावादनातून गुरुचरणी स्वरांजली

**अमरावती -** मुकुंद सराफ शिष्य परिवार, अमरावती यांच्या वतीने गुरुपौर्णिमा उत्सव मोठ्या उत्साहात व भक्तिमय वातावरणात झाला. दस्तूरनगर येथील प्रयास सेवांकुर भवन येथे आयोजित या कार्यक्रमात तबलानवाज गुरुवर्य मुकुंद सराफ यांचे शिष्य परिवाराच्या वतीने गुरुपूजन करण्यात आले.ज्येष्ठ शिष्य किशोर वावरकर यांनी गुरुवर्य मुकुंद सराफ यांचे विधिवत गुरुपूजन केले. यानंतर शिष्यांनी आपल्या गुरूंच्या चरणी तबलावादनाची स्वरांजली अर्पण केली. यावेळी राहुल बालखंडे, प्रशांत दुधे, समीर जगताप, स्वप्नील सरदेशमुख, मीनल फुकटे, स्वरांग केतकर, हेतन बोडे, अर्पित सावरकर, सोहम खुरपे, मोहक घाटोळ, रुद्र घोंगटे, निशांत अथिलकर व प्रथमेश गई यांनी तबलावादन सादर केले. कार्यक्रमास ज्येष्ठ गायक नारायणराव दरेकर, ॲड. मिलिंद वैष्णव व प्रा. गजानन केतकर प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. श्रीकांत पुंडलिक यांनी संचालन केले.या गुरुपौर्णिमा सोहळ्याच्या यशस्वी आयोजनासाठी वेदांत येते, आराध्या गायकवाड, निलेश रूमने, अक्षय ताम्हणकर, प्रसाद पांडे, संदीप दलाल, विनोद अथिलकर, मधुरा सहस्त्रबुद्धे, अजिंक्य इनामदार, रूपक हिवसे, शौर्य गुहे, श्रीकांत तेल्हारकर सर, कुंदन इंगोले, शिवम इंगळे, सोहम जगताप, रत्नाकर मोहदरकर, राधेय इंगळे, धनोरकर सर, प्रा. सुहास उमाळे सर, अनामय पवार, प्रिती बलखंडे, मीनल जगताप, संपदा पवार, प्राची पिंपळकर व मंजिरी जगताप यांनी परिश्रम घेतले.गुरु-शिष्य परंपरेचा गौरव करणारा हा कार्यक्रम तबलावादन, संगीत व गुरुभक्तीच्या सुरांनी अविस्मरणीय ठरला.

### आदर्श हायस्कूलमध्ये क्रांती दिन उत्साहात



**खल्लार**-आदर्श हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, दर्यापूर येथे क्रांती दिन उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे उपमुख्याध्यापक व्ही. पी. मुळे होते. प्रमुख अतिथी म्हणून पी. एम. काळे शिक्षकेतर कर्मचारी प्रतिनिधी प्रदिप भारसाकळे, शिक्षिका पी. पी. होले कार्यक्रम प्रभारी एस. एस. राठोड व चंद्रशेखर माहुरे उपस्थित होते.कार्यक्रमाच्या प्रारंभी डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख व राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या प्रतिमेचे पूजन करून हारार्पण करण्यात आले. भारताच्या स्वातंत्र्यलढ्यातील 'भारत छोडो' आंदोलनाची पार्श्वभूमी स्पष्ट केली. 'करेंगे या मरेंगे' या निर्धाराने देशभर स्वातंत्र्याची चळवळ तीव्र झाली. अध्यक्षीय भाषणातून उपमुख्याध्यापक व्ही. पी.मुळे यांनी क्रांती दिनाचे महत्त्व विशद केले. यावेळी विद्यालयातील टोपले कनखर,एच.एस. सोळंके, सिरसाट, भोगे,राखोंडे, बिहाडे, बिराजदार,कलाने,मानवते शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### आदिवासी बांधवांना न्यायासाठी पोलीस अधीक्षकांना निवेदन



**अमरावती** -अखिल भारतीय ग्राहक कल्याण परिषद, अमरावती जिल्ह्याच्या वतीने जिल्हा पोलीस अधीक्षक यांना धारणी तालुक्यातील काकरमल येथील आदिवासी बांधव दीपक जांभेकर यांच्या आर्थिक फसवणुकीबाबत निवेदन देण्यात आले. संघटनेचे पदाधिकारी दीपक जांभेकर यांची ६,१० लाख रुपयांची फसवणूक झाल्याची तक्रार संघटनेला प्राप्त झाली होती. या प्रकरणी न्याय मिळणे बाबत जिल्हा पोलीस अधीक्षक यांनी निवेदनाची गंभीर दखल घेत संबंधित प्रकरणात धारणीचे पोलीस निरीक्षक यांना तात्काळ कारवाई करण्याचे निर्देश दिले. संघटनेचे राज्य चेअरमन गजानन मुदगल,राज्य सचिव ॲड. प्रभाकर वानखडे, संजय जाधव,निलेश टवलारे,मयूर बासुंदे, नंदा राऊत व आदी पदाधिकारी यांनी जिल्हा सामान्य रुग्णालयाचे प्रशासकीय अधिकारी यांना रुग्णांना वैद्यकीय सेवा, स्वछता आदी सुविधा उपलब्ध करून देणे बाबत निवेदन दिले. तसेच झेनिथ सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल मधील डॉक्टर यांच्या तर्फे रुग्णांना देण्यात येणारी अपमानस्पद वागणूक, अतिरिक्त बिल आकारणे, महत्वाच्या सुविधेचा अभाव या प्रकरणी निवेदन दिले.याप्रसंगी संघटनेचे महिला राज्य सचिव जोत्स्ना शेटे, उपाध्यक्ष उज्वला महाजन, पवन सुर्जेकर, विजय अनासने, संगीता ओकार, सविता इंगोले, रुपाली देशमुख, मंगला अस्वार,बबीता राठोड, सीमा नागोचा, वैशाली जवंजाळ आदी पदाधिकारी, सदस्य उपस्थित होते.

# नोकरी नाही मिळाली तरी चालेल, पण काम हवे!

अलीकडे देशभर झालेल्या विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला प्रश्नपत्रिका फुटीची तात्कालिक पार्श्वभूमी होती. पण त्याचबरोबर त्यामागे रोजगाराची चिंता होती. 'नीट' किंवा यूपीएससीसारख्या परीक्षेत यश मिळवणे हे लाखो तरुणांसाठी एक मोठे ध्येय असते. कारण अजूनही स्थिर, सुरक्षित आणि बऱ्यापैकी पगाराच्या नोकरीकडे जाणारे मार्ग फार कमी आहेत. ही परीक्षा नीट झाली नाही किंवा प्रश्नपत्रिका फुटली किंवा भरती पुन्हा लांबली तर अतोनात ताणाखाली काही विद्यार्थी खचून जातात; त्यांना पुढे काहीच मार्ग दिसत नाही आणि आत्महत्येचे विचारही मनात येतात. आणखी एक वर्ष हातातून निसटते. म्हणून ही आंदोलने परीक्षांबद्दल होतीच; पण त्याहून अधिक ती नोकऱ्यांबद्दल होती.

सरकारी नोकरीसाठीच्या स्पर्धा परीक्षा हे देशातील पदवीधर तरुणांचे आता एक मोठे प्रतीक्षागृह झाले आहे. वयाच्या बाविसाव्या-तेविसाव्या वर्षी पदवी पूर्ण झाल्यानंतर अनेक युवा पाच-सात वर्षे पुन:पुन्हा परीक्षा देतात. ते इतकी वर्षे थांबतात, ते काही उगीच नाही. खासगी क्षेत्रातील सुरुवातीचे पगार (स्टार्टिंग सॅलरी) अनेक वर्षे जवळजवळ स्थिर राहिले आहेत. एका अभ्यासानुसार तरुण पुरुष पदवीधराचे सरासरी मासिक उत्पन्न २०११ मध्ये सुमारे २१,८०० रुपये होते. २०२३ मध्ये ते १९,५७३ रुपयांवर आले. हा नाममात्र आकडा आहे; महागाई धरली, तर खरी घसरण आणखी मोठी आहे. सरकारी नोकरीत तुलनेने चांगला पगार, नियमितता, आरोग्यविमा, सामाजिक प्रतिष्ठा आणि नोकरीची सुरक्षितता मिळते. त्यामुळे यूपीएससीचा आणखी एक प्रयत्न करू, असा विचार तरुण करतात.

या अस्वस्थतेमागची आकडेवारीही बोलकी आहे. २००४ ते २०२३ या काळात दरवर्षी सुमारे ५० लाख पदवीधर श्रमबाजारात आले; पण त्यापैकी फक्त सुमारे २८ लाखांना काम मिळाले. मात्र बेरोजगारीचा अधिकृत दर सगळे चित्र दाखवत नाही. २०२५ मध्ये देशातील बेरोजगारीचा दर ३.१ टक्के आणि तरुणांचा बेरोजगारी दर ९.९ टक्के असल्याचे आवर्ती श्रमशक्ती सर्वेक्षण सांगते. पण नवीन सर्वेक्षणात काही बदल करण्यात आले. 'नेहमीची स्थिती' (युज्वल स्टेट्स) ची व्याख्याच बदलली. त्यानुसार आता एखाद्या व्यक्तीने वर्षभरात फक्त ३० दिवस काही पूरक आर्थिक काम केले असेल, तरीही तिला रोजगार आहे असे धरले जाऊ शकते. पण त्यातून घर चालेल एवढे उत्पन्न मिळतेच असे नाही. म्हणून रोजगाराचा प्रश्न फक्त 'काम आहे की नाही' असा नाही. अपुरा रोजगार, छुपी बेरोजगारी, कमी वेतन, अनियमित तास, लेखी कराराचा अभाव आणि सामाजिक सुरक्षेची कमतरता हे प्रश्नही तितकेच महत्त्वाचे आहेत. शेती हे त्याचे सर्वात स्पष्ट उदाहरण आहे. अनेक दशके कमी होत गेलेला शेतीचा रोजगारातील वाटा २०१७-१८ मधील ४४.१ टक्क्यांवरून २०२३-२४ मध्ये ४६.१ टक्क्यांवर गेला. उद्योग आणि सेवा क्षेत्राने पुरेशा प्रमाणात कामगार सामावून घेतले नाहीत, हेही तितकेच महत्त्वाचे कारण आहे. अलीकडच्या एका अंदाजानुसार २०२० नंतर शेतीत काम करणाऱ्यांची संख्या सुमारे आठ कोटींनी वाढली. वेगाने विकसित होणाऱ्या अर्थव्यवस्थेत कामगार शेतीतून उद्योग आणि सेवांकडे जातात. आपल्याकडे काही काळ उलट घडले. वेतनाचे चित्रही फार उत्साहवर्धक नाही. पुरुष प्रासंगिक कामगारांची सरासरी रोजची कमाई २०२४ मध्ये ४५६ रुपये होती; २०२५ मध्ये ती ४५५ रुपये झाली. रोजची कमाई २९९ रुपयांवरून ३१५ रुपयांपर्यंत वाढली. म्हणजे कृषी क्षेत्रात रोज काम मिळाले तरी वास्तविक उत्पन्न फारसे वाढलेले नाही. याच पार्श्वभूमीवर प्लॅटफॉर्म किंवा 'गिग' अर्थव्यवस्थेची कामे वाढत आहेत. अलीकडे एका ॲपने 'एका तासाचे घरकाम २९ रुपयांत करून घ्या' अशी जाहिरात केली होती. ती कंपनीने ग्राहकांना दिलेली सवलत होती (प्रमोशनल ऑफर). अशा ॲपवर काम करणाऱ्या काही




महिलांनी जुन्या पद्धतीच्या घरकामापेक्षा अधिक उत्पन्न मिळत असल्याचेही सांगितले. त्यामुळे या नव्या व्यवस्थेचे फायदे नाकारता येणार नाहीत.

पण त्याचबरोबर त्याला दुसरी बाजूही आहे. रजा किती घ्यायची, जेवणाची सुट्टी कधी मिळणार, कोणते काम स्वीकारायचे, उशीर झाला तर किती दंड आणि आपले रेटिंग कमी झाले तर पुढे काम मिळणार की नाही, हे सर्व ॲप ठरवते. काही कामगारांनी आजारपण किंवा घरातील आपत्कालीन प्रसंगातही रजा घेणे अवघड असल्याचे सांगितले. त्यामुळे कामगाराला 'भागीदार' म्हटले म्हणून तो खरोखर स्वतंत्र उद्योजक ठरत नाही. तो कमी अधिकार असलेला कामगारच राहिला आहे, व्यवसाय भागीदार नाही. अर्थात, अशा प्लॅटफॉर्म अर्थव्यवस्थेचे फायदे मोठे आहेत. ग्राहक आणि कामगार यांना पटकन जोडता येते. काम शोधण्याचा वेळ आणि खर्च कमी होतो.

पण या सगळ्यात जोखीम कोण उचलणार, हा प्रश्न आहे. मागणी कमी झाली, कामगार आजारी पडला, अपघात झाला, अल्गोरिदमने त्याचे खाते बंद केले किंवा नव्या तंत्रज्ञानामुळे त्याचे कौशल्य कालबाह्य झाले, तर सगळी जोखीम फक्त कामगारावर टाकता येणार नाही पूर्वी सुरक्षित मानल्या जाणाऱ्या माहिती-तंत्रज्ञान क्षेत्रातही ही अस्थिरता दिसते आहे. आयटी कर्मचाऱ्याचा 'बेंच'वरचा कालावधी कमी करणे, कामगिरी सुधारणा योजना, बदललेल्या कौशल्यांच्या नावाखाली बाहेर पडण्याचा दबाव किंवा राजीनामा देण्यास सांगणे, अशा मार्गांनीही ती होते. त्यामुळे, वेगवेगळ्या कौशल्यांच्या आयटी कामगारांच्या उत्पन्नामध्ये वाढती विषमता दिसून येत आहे. म्हणजे एकाच आयटी क्षेत्रात दोन टोकांचे चित्र दिसते. वरच्या टोकाला मोजक्या लोकांना फार मोठा मोबदला; तर नियमित कोडिंग, चाचणी, डेटा प्रक्रिया, कॉल सेंटर आणि बॅक-ऑफिसमधील प्राथमिक कामांवर वाढता दबाव.

एका अंदाजानुसार भारतातील आठ ते बारा टक्के बिगरशेती रोजगारांवर कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे काही प्रमाणात बदलीचा धोका आहे. आयटी क्षेत्रातील भरती मंदावली आहे, कंत्राटी काम वाढते आहे आणि सुरुवातीचे पगार अनेक वर्षे ठप्प आहेत. वाढत्या अर्थव्यवस्थेत काम भरपूर असेल. पण ते नेहमीच्या कायमस्वरूपी नोकरीच्या रूपात असेलच असे नाही. एकाच नियोक्त्याशी (एम्प्लॉयर) दीर्घ संबंध, ठरावीक मासिक पगार, निश्चित तास आणि काही सामाजिक सुरक्षा ही पारंपरिक नोकरीची कल्पना आहे. पुढील काळात काम प्रकल्प, कंत्राट, स्वतंत्र असाइनमेंट, ॲप आणि एकाच वेळी अनेक ग्राहक यांच्या माध्यमातून होईल. व्यापक अर्थाने गिग कामगार हा अपवाद राहणार नाही; तो श्रमबाजाराचा मोठा भाग बनेल. नव्या उद्योगांनाही त्यातून चालना मिळेल. पण नियम नसतील, तर मालकाची लवचीकता ही कामगाराची असुरक्षितता बनते. भारताला म्हणून दोन गोष्टी एकाच वेळी कराव्या लागतील. गिग आणि प्लॅटफॉर्म अर्थव्यवस्था वाढण्यासाठी अनुकूल वातावरण द्यायचे; पण त्यातील काम सन्मानजनकही ठेवायचे. आरोग्यविमा, अपघात संरक्षण आणि निवृत्ती बचत यांसारखे लाभ एका नोकरीशी नव्हे, तर कामगाराशी जोडले पाहिजेत. तो एका प्लॅटफॉर्मवरून दुसऱ्यावर गेला, तरी हे लाभ त्याच्यासोबत गेले पाहिजेत. मोबदला, रेटिंग, कामाचे वाटप आणि खाते बंद करण्याचे निर्णय कसे घेतले जातात, याची माहिती कामगाराला मिळाली पाहिजे. वेळेवर पैसे, सोपी तक्रारनिवारण व्यवस्था आणि मनमानी पद्धतीने काम बंद करण्याविरुद्ध संरक्षणही हवे

प्लॅटफॉर्म अर्थव्यवस्थेतील सन्मानजनक कामाबाबतच्या आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेच्या (आयएलओ) करारावर मात्र यंदाच भारत सरकारने तटस्थ भूमिका दाखवली. विशेष म्हणजे भारतातील कामगार आणि नियोक्ते प्रतिनिधींनी कराराच्या बाजूने मत मांडले होते; सरकारी प्रतिनिधीने मात्र तटस्थ राहणे पसंत केले. या कराराला विरोध कशासाठी? हा करार काही प्लॅटफॉर्म व्यवसाय थांबवण्याबद्दल नाही. नव्या व्यवसायपद्धती वाढू द्यायच्या; पण त्याच वेळी कामगारांचे किमान संरक्षण, पारदर्शकता आणि न्याय्य नियम असावेत, एवढाच त्याचा आग्रह आहे. भारताला अधिक नोकऱ्या हव्यातच. पण पुढचा प्रश्न फक्त किती नोकऱ्या निर्माण झाल्या एवढाच राहणार नाही. किती काम मिळाले, त्यातून किती उत्पन्न मिळाले, किती सातत्य होते आणि कामगाराला कोणते संरक्षण मिळाले, हेही प्रश्न विचारावे लागतील. उद्याचा तरुण कदाचित असे म्हणेल, ''मला नोकरी नाही मिळाली तरी चालेल; मला काम हवे. आणि त्या कामाला योग्य मोबदला, प्रतिष्ठा आणि सुरक्षितताही हवी.''

**डॉ.अजित रानडे**
**ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ**

## त-ड-का

### मॅरेज ॲनिर्व्हसरी

ॲनिव्हर्सरी
सेलीब्रेशनच्या
निमीत्ताने प्रश्न येतो
मनात
खरचं का हे सुखी
आहेत
आपल्या वैवाहीक
जीवनात ..

केवळ लोकोपचार
म्हणून तर नाही ना ?
साजरी करताहेत
मॅरेज ॲनिर्व्हसरी ..

चिंतन करा प्रेम
जिव्हाळा
आहे का परस्पर अंतरी
विश्वास समर्पण
तडजोडीने
सुखाची अनुभूती येते
संसारी ..



**प्रा.अशोक सारडा, मेहकर**
मो.९४२१३९४३३९

# वाटांशी जडले नाते..

मला समजायला, उमजायला लागल्यापासून विविध वाटांचे विशेष आकर्षण निर्माण झाले. लहानपणीपासून शेतातून जाणारी पायवाट, डोंगरावर चढणारी पाऊलवाट तसेच नदीच्या किनाऱ्यावरून जाणारी नदीत गुप्त होणारी वाट. या वाटांवर माझ्या लहान पावलांचे ठसे उमटले त्या वाटा कायम स्मरणात राहिल्या. गावाकडची मातीची पाणंदीतून जाणारी पायवाट आजही आठवली, की मन नकळत बालपणात हरवून जाते. त्या पायवाटेवरून जाता-येता बालपण संपले. फांदीच्या दोन्ही बाजूने गर्द झाडी, त्यावर पसरलेल्या हिरव्यागार वेली. चिंचा, बोरीची झाडे. दगड मातीची ती पाऊलवाट पावसाळ्यात मात्र घसरडी व्हायची आणि त्या वाटेवरून जाताना एकदा तरी आपटी खाल्ल्याशिवाय पुढचा प्रवास व्हायचा नाही. त्या फांदीतून सरसर आवाज करत झाडीतून झिम्माडत येणारा पाऊस अंगावर घेताना मन पाऊस होऊन नाचू लागे. पावसाचे ते रूप कायमच मनात राहिले. पाणंदीच्या पाऊलवाटे सोबत. शाळेत जाणारी जराशी रुंद वाट म्हणजे गाडी रस्ता... या वाटेवर प्रचंड खाचखळगे असायचे. पावसाळ्यात त्या खड्ड्यांमध्ये पाणी साठायचे. एकमेकांच्या अंगावर पाणी शिंपडत त्या वाटेने जाताना पावसाळ्यात चिखलात उमटलेले पावलांचे ठसे, उन्हाळ्यात धुळीने भरलेले पाय आणि वाटेत भेटणारी झाडे, पक्षी, ओढे – हे सारे आजही



स्मरणात जिवंत आहे. त्या वाटा साध्या होत्या, पण त्यांच्यात आपलेपणाचा गंध होता.

खरं तर रस्ता म्हणजे केवळ एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाण्याचा मार्ग नव्हे; तो आपल्या आयुष्याच्या प्रवासाचा साक्षीदार असतो. प्रत्येक रस्त्याला इतिहास तसेच भूगोल असतो. रस्त्याची एक कथा असते, त्यानुसार त्याला नावे दिलेली असतात. ती त्यांची ओळख असते. त्या त्या मातीनुसार त्याला रंग-रूप आलेले असते. प्रत्येक वाटेचा एक स्वभाव असतो. वाकड्यातिकड्या वळणावरून गुंडाळलेल्या वाटा मला आवडतात. कारण प्रत्येक वळण एखादा नवा अनुभव देऊन जाते. काही रस्ते गजबजलेले असतात, काही एकाकी; तर काही निर्जन असतात. काही धुळीने माखलेले, तर काही डांबरी चकाचक उजळलेले. काही निरुंद तर काही ऐसपैस पसरलेले असतात. प्रत्येक रस्ता माणसाला पुढे चालत राहण्याची प्रेरणा देत असतो.

डोंगरातून जाणाऱ्या निमुळत्या नागमोडी वाटा मात्र वेगळाच अनुभव देतात. मोठमोठाली जुनी झाडे दाटीवाटीने उभी असलेली त्यांना बिलगून वर गेलेल्या हिरव्यागार शुभ्र पांढऱ्या, निळ्या, पिवळ्या फुलांचे घोश, लगडलेल्या वेली वाटसरूंचे लक्ष आकर्षित करतात. त्या आपल्याला आधाराचे महत्त्व सांगतात. डोंगर चढत उंचावर गेलं की, तिथून खालचे सौंदर्य अप्रतिम दिसते. वरती निळेशार आकाश, भराऱ्या घेणारे पक्षी आणि खालती हिरवा गालिचा अंथरलेली धरती. प्रत्येक वळणानंतर नवे दृश्य दिसते. कधी धुक्याची शाल, कधी हिरवाईचा नजराणा, कधी खोल दरी, तर कधी आकाशाला स्पर्श करणारे शिखर. या वाटा सांगतात की माणसाचे आयुष्य हे सरळ रेषेसारखे नसते, तर ते सुख-दुःखाच्या वळणवाटांनी व्यापलेले असते म्हणूनच आयुष्य सुंदर असते

जंगलातील पाऊलवाटा निसर्गाशी संवाद साधायला उसंत देतात. तिथे अनुभवायला येणारी पक्ष्यांची किलबिल, पानांची सळसळ, वाऱ्याची थंडगार झुळूक यामुळे मन शांत होत जाते. त्या वाटांवर चालताना माणूस सुखाचा अनुभव करतो. तसेच स्वतःच्या आतल्या आवाजालाही ऐकू लागतो. म्हणूनच पूर्वी ऋषी मुनी जंगलात जाऊन तपश्चर्या करायचे. कधी संध्याकाळच्या वेळेला नदी किनाऱ्याच्या वाटेने गेला आहात का? नसाल गेला तर निवांत वेळ काढून नक्की जा. सूर्य मावळण्याची वेळ, नदीवर पसरलेलं उन्हाचं केशर आणि नदीकिनाऱ्याची वाट मनाला विलक्षण प्रसन्न करते. वाहणाऱ्या पाण्याबरोबर विचारही वाहू लागतात. नदीचा तो खळखळ आवाज सारा परिसर मोहून टाकतो. नदी शिकवते थांबू नकोस. वाटेत दगड भेटतील, वळणे येतील, अडथळे उभे राहतील, ऊन, वारा, पाऊस या सर्वांना सामावून घेत जीवनाचा आनंद शोधत चालत राहा.

मी आधी म्हटले त्याप्रमाणे रस्त्यालाही इतिहास असतो. आपले थोर संत, महात्मे आणि समाजसुधारकांनीही पुढील पिढीसाठी त्यांच्या कल्याणासाठी वेगवेगळ्या वाटा दाखवल्या. संत ज्ञानेश्वरांनी भक्तीची वाट दाखवली, तर संत तुकारामांनी नामस्मरणाची, महात्मा गांधींनी सत्य आणि अहिंसेची, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शिक्षण आणि समतेची वाट दाखवली. या वाटा आजही समाजाला दिशा देत आहेत. या वाटेवरून जाणाऱ्याचे कल्याण होते. आयुष्यभर आपण कोणत्या ना कोणत्या वाटेवरून चालत असतो. रस्ते कधीच संपत नाहीत, संपतो तो फक्त एक टप्पा. पुढे पुन्हा एक नवा रस्ता उभा असतो, नवी वाट खुणावत असते. म्हणूनच जीवन म्हणजे चालत राहण्याची अखंड प्रक्रिया आहे. पाय थकतील, पण वाटा थांबत नाही. अशा या आपल्या जीवनाशी अतूट नाते सांगणाऱ्या वाटा मनाला विलक्षण मोहून टाकतात.

**- लता गुठे**

# 'जंक फूड' ऐवजी मुलांना घरचे अन्न द्या!

गेल्या काही वर्षांत भारतात जंक फूडची क्रेझ भलतीच वाढली आहे. अन्न व औषध प्रशासन विभागाचे आयुक्त तुकाराम मुंडे यांनी शाळेच्या परिसरात जंक फूडच्या विक्रीवर बंदी आणल्याने जंक फूड पुन्हा एकदा चर्चेचा विषय बनला आहे. पोटाच्या भुकेसह जिभेचे चोचले पुरवणारे हे जंक फूड महाग असले, तरी यांच्या जिभेवर तरळणाऱ्या चवीमुळे आणि यांच्या जाहिरातबाजीमुळे तरुणवर्ग या पदार्थांकडे मोठ्या प्रमाणात आकर्षिला जाऊ लागला आहे. पूर्वी घरी आवडीने 'बैंगनका भरता' आणि 'आलू के पराठे' खाणारा चित्रपटातील नायक हल्लीच्या चित्रपटांतून पिझ्झा-बर्गरवार ताव मारताना दिसू लागल्याने या पदार्थांविषयी आजच्या तरुणवर्गासह शाळकरी मुलांमध्येही कमालीची आवड निर्माण होऊ लागली आहे. 'जंक फूड'विषयी तरुणांमधील वाढत्या क्रेझमुळे आज मुंबई ठाण्यासह राज्यातील विविध शहरांमध्ये आणि नगरांमध्ये नाक्या नाक्यावर 'मॅक्डोनाल्ड', 'बर्गर किंग', 'केएफसी', 'डोमिनोझ', 'पिझ्झा हट' यांची वातानुकूलित आउटलेट्स उभी राहू लागली आहेत.

महाविद्यालयीन तरुण तरुणींसह शाळकरी मुले-मुलीही याठिकाणी प्रतिदिन हजेरी लावताना दिसून येतात.मुलांना शालेय अभ्यासक्रमात घरचे अन्न, पालेभाज्या, कडधान्य, फळे खाण्याचे महत्व सांगितले जाते. पालक सभांमधूनसुद्धा शिक्षक मुलांना घरगुती आहार देण्याचा सल्ला देतात; मात्र शहरांसारख्या ठिकाणी आईवडील दोघेही नोकरी करत असल्याने प्रतिदिन मुलांना डबा बनवून देणे आणि त्यांची आवड निवड जोपासणे त्यांना शक्य होत नाही. मुलांनाही तेच हवे असते. या पैशांत मुले 'जिभेचे चोचले पुरवणारे' 'जंक फूड', कोल्ड्रिंक्स यांसारखे शरीराला घातक पदार्थ विकत घेऊन खातात. शाळांनी मुलांच्या डब्यात 'जंक फूड' आणण्यावर बंदी घातली असली, तरी शाळकरी मुले नाक्या-नाक्यावर जाऊन हे पदार्थ प्रतिदिन खात असतात.



मॅकडोनाल्डसारख्या नामांकित कंपनीकडून त्यांच्या आउटलेटमध्ये ग्राहकांकडून अधिक पैसे घेऊन पदार्थामध्ये निकृष्ट दर्जाचे घटक वापरले जातात हे महाराष्ट्राच्या अन्न आणि औषध प्रशासनाने अनेक वेळा उघड केले आहे. शाळकरी मुले आणि तरुणांमध्ये दैनंदिन खाण्यात 'जंक फूड'चे वाढते प्रमाण खरेतर चिंतेचा विषय आहे. लहान वयातच हृदयविकार,मधुमेह, लठ्ठपणा असे विविध आजार 'जंक फूड'च्या नियमित सेवनाने जडू शकतात.

'जंक फूड' आणि पाकिटबंद पदार्थांच्या नियमित सेवनाने शरीरात साखरेचे आणि सोडियमचे प्रमाण वाढते ज्यामुळे कर्करोग, उच्च रक्तदाब यांसाखे गंभीर विकारही उद्भवू शकतात. जंकफूडच्या सेवनाने मुलांमध्ये आळस, थकवा आणि सुस्ती यांचे प्रमाण वाढते. जंकफूडच्या नियमित सेवनामुळे एडेमा सारखा आजार होऊन त्यामुळे किडनीवरही गंभीर परिणाम होऊ शकतो. 'जंक फूड'मध्ये पोषक तत्वांचा अभाव असल्याने शाळांमध्ये असे पदार्थ आणण्याला बंदी घालण्यात आली आहे. हृदयविकार, मधुमेह, रक्तदाब यांसारखे आजार पूर्वी केवळ श्रीमंतांच्या घरात पाहायला मिळत आज ते सामान्यजणांच्या घरांपर्यंत पोहोचले आहेत. खाण्यातील 'जंक फूड'चा वापर हेसुद्धा यामागील एक कारण आहे. 'जंक फूड'च्या सेवनामुळे होणाऱ्या दुष्परिणामांची जाणीव मुलांना शालेय अभ्यासक्रमातून, घरी पालकांकडून केली जाणे आज गरजेचे बनले आहे. त्यासोबतच मुलांमध्ये घरच्या अन्नाविषयी आवड निर्माण करणेही आवश्यक आहे. रोज मुलांना डब्यासाठी नवीन काय बनवायचे हाही प्रश्न शाळकरी विद्यार्थ्यांचा मातांना पडलेला असतो. यासाठी युट्युबवर मुलांसाठी पौष्टिक आणि रुचकर खाद्यपदार्थांच्या अनेक रेसिपी उपलब्ध आहेत त्यांचाही अभ्यास करावा. कधीतरी बदल म्हणून 'जंक फूड' खाणे चुकीचे नाही मात्र त्याची सवय लागून त्याचे नियमित सेवन करणे म्हणजे आजारांना निमंत्रण देणे आहे हेही आपण लक्षात ठेवायला हवे.

**जगन घाणेकर**
मो.९६६४५५९७८०


# UPI च्या यशाची किंमत ग्राहकांनीच का मोजायची?

भक्तांनी तुम्हाला कितीही भूल पाडायचे प्रयत्न केले तरी तुम्ही UPI वर शुल्क लावण्याचा विरोध केला पाहिजे. त्याची काही ठळक कारणे

१. भक्त म्हणतात की क्रेडिट कार्डवर शुल्क आहे तर इथेही लावू द्या! मात्र UPI ही गोष्ट सरकारने स्वतः म्हणजे मोदींचा चेहरा वापरून लोकांना वापरायला लावली होती. UPI हा क्रेडिट कार्डासारखा प्रकार नाही. कारण क्रेडिट कार्ड खासगी कंपन्या काही ठराविक श्रीमंत/उच्चमध्यमवर्गीयांना विकतात, UPI ही सरकारने राबवलेली योजना होती. दोघांमध्ये मुळातच खूप फरक आहे.

२. अर्थमंत्री निर्मला सीतारामन म्हणतात की फक्त मोठ्या व्यापाऱ्यांवर मर्चंट चार्जेस स्वरूपाचे शुल्क लावू. हीच टेप भक्त सगळीकडे वाजवत फिरत आहेत. मुळात मोठे व्यापारी म्हणजे कोण हे सरकार ठरवणार! त्यात पुरेशी स्पष्टता नाही, त्याबाबत सध्या २ कोटी टर्नओव्हर असा उल्लेख केला जात आहे. २ कोटी टर्नओव्हर असलेला व्यापारी हा मोठा व्यापारी असतो काय? बऱ्याच धंद्यांमध्ये मार्जिन अत्यंत कमी असतं. काही ठिकाणी ते १% वगैरे असतं. म्हणजे तुम्ही जेव्हा १ कोटीचा माल विकणार तेव्हा तुम्हाला फक्त १ लाख मिळतात.मग २ कोटींचा टर्नओव्हर असणारा व्यापारी हा मोठा व्यापारी कसा झाला?

३. कोणतंही मर्चंट चार्जेस स्वरूपाचे शुल्क जर थेट व्यवहारावर लावले तर व्यापारी अर्थातच तो वाढीव खर्च ग्राहकाकडून वसूल करणार. कारण निर्मलाबाई किंवा मोदीभक्तमंडळी यांचा काहीही भ्रम असला तरी व्यापारी हे काही परोपकार म्हणून व्यापार करत नाहीत. आपल्यावर शुल्क लागल्यावर ज्याप्रमाणे जीएसटी किंवा अन्य खर्च ग्राहकाकडून वसूल केले जातात तसे UPI MDR बाबतही होणारच!




४. आता भक्त म्हणतात की UPI व्यवस्थेसाठी खर्च होतो तो वसूल केला पाहिजे! इथे एक गोष्ट लक्षात घ्या की UPI हा बँकिंग व्यवस्थेची एक पायाभूत सुविधा आहे. त्यावर सरकारने स्वतःच खर्च केला पाहिजे. याउपर रिझर्व्ह बँकेकडून सरकारला लाखो कोटींचा लाभांश दरवर्षी मिळतो. या लाभांशाचा गेल्या वर्षीचा आकडा साधारण २,९०,००० कोटी इतका आहे. याउलट युपीआय व्यवस्था राबवण्याचा खर्च म्हणजे ऑपरेशनल कॉस्ट जवळपास २५,००० कोटींच्या घरात सांगितली जाते. असे असताना सरकारने UPI चालवण्यासाठी लोकांकडून वसुली काय म्हणून करावी? रिझर्व्ह बँकेच्या लाभाशांतून इथे खर्च करा, नक्की काय अडचण आहे?

५. बाकी निर्मला सीतारामन आणि एकूणच मोदी सरकारच्या बोलण्यावर डोळे झाकून विश्वास ठेवावा अशी मुळातच परिस्थिती नाही. म्हणजे आज त्यांनी कायदा करून घेतला आहे, उद्या त्याचाच वापर ते ग्राहकांकडूनही UPI MDR वसूल करण्यासाठी करू शकतात. याचं एक खास उदाहरण म्हणून तुम्ही लॉंग टर्म कॅपिटल गेन्स म्हणजे LTCG टॅक्स बघा. कॉंग्रेसकाळात हा कर रद्द करून एक व्यवहारावर आधारित कर आणला गेला होता. Securities Transaction Tax म्हणजे STT. आता निर्मलाबाईंनी LTCG परत आणला! तेव्हा खरंतर हिशोबाने STT रद्द केला पाहिजे होता. पण त्यांनी तोही तसाच ठेवला आणि LTCG वसूली करायला सुरुवात केली!! म्हणजे कॅपिटल गेन्स या एकाच उत्पन्नावर लोकांकडून डबल वसूली सक्तीने केली जात आहे...

आता हे मुद्दे वाचल्यावर भक्तांचे या विषयावरील निबंध किती दर्जाचे आहेत हे तुम्हाला लक्षात आले असेलच! मोदीभक्त अगदीच एक वाया गेलेली प्रजा आहे!! त्यांना फक्त वारेमाप चाटायची एवढीच कला येते, ते करताना स्वतःच नुकसानसुद्धा त्यांना दिसत नाही.

UPI वर शुल्क लावणे हे धोरण म्हणून अक्कलशत्रू आहेच, मोदी सरकारकडे धोरणंसुद्धा बऱ्याचदा सरकारी बाबू लोकच ठरवत असल्यामुळे ही असली वेडेपणाची कामे वेळोवेळी होतच असतात. त्याउपर मोदी सरकार निव्वळ आपल्या राजकीय फायद्यासाठी लाडक्या बहिणी स्वरूपाच्या रेवडी योजना चालवण्यासाठी दरवर्षाला लाखो कोटी यथेच्छ उधळत असताना UPI सारख्या यशस्वी राष्ट्रीय उपक्रमावर MDR स्वरूपात अधिकची वसूली लादणे हे यांच्या निर्लज्ज कारभाराचे अजून एक उदाहरण आहे...

**- मकरंद देसाई**

# सावरगाव ग्रामपंचायतीच्या कारभाराची अखेर जिल्हास्तरीय चौकशी

## तत्कालीन सीईओंच्या आदेशाला सहा महिन्यांनी जाग ; अभिलेखांची तपासणी सुरू

■ प्रतिनिधी | खेट्री ■

पातूर पंचायत समितीअंतर्गत सावरगाव ग्रामपंचायतीच्या सन २०२४-२५ व २०२५-२६ या आर्थिक वर्षातील कारभाराची सखोल आर्थिक तपासणी करण्यासाठी तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी अनिता मेश्राम यांनी दिलेल्या आदेशाची तब्बल सहा महिन्यांनी अंमलबजावणी करण्यात आली आहे. जिल्हास्तरीय समितीने ६ ऑगस्ट रोजी सावरगाव ग्रामपंचायतीला भेट देत विविध अभिलेखांची तपासणी सुरू केल्याने ग्रामपंचायतीच्या कारभाराबाबत पुन्हा एकदा चर्चेला उधाण आले आहे.

सावरगाव ग्रामपंचायतीच्या आर्थिक व्यवहारांची सखोल तपासणी करून सात दिवसांत अहवाल सादर करण्याच्या सूचना तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी अनिता मेश्राम यांनी १० फेब्रुवारी २०२६ रोजी दिल्या होत्या. त्यासाठी समितीही गठीत करण्यात आली होती. मात्र आदेशानंतर तातडीने चौकशी होणे अपेक्षित असताना प्रत्यक्षात तब्बल सहा महिन्यांनंतर समिती ग्रामपंचायतीत पोहोचल्याने आदेशाच्या अंमलबजावणीतील विलंबावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

अकोट पंचायत समितीचे सहाय्यक गटविकास अधिकारी राजेश खुमकर, विस्तार अधिकारी मदनसिंग वहुरे, शाखा अभियंता रशिका देशमुख तसेच सहायक लेखाधिकारी गजानन वानखडे यांचा समावेश असलेल्या समितीने ६ ऑगस्ट रोजी सावरगाव ग्रामपंचायतीला भेट देऊन उपलब्ध अभिलेखांची तपासणी केली. आर्थिक व्यवहार, विकासकामांशी संबंधित कागदपत्रे, खर्चाची नोंद, मंजुरी व प्रत्यक्ष कामांची स्थिती यासह विविध बाबींची पडताळणी करण्यात येत असल्याची माहिती आहे. मात्र, सहा महिन्यांपूर्वी आदेश काढण्यात आल्यानंतरही चौकशीसाठी समितीला एवढा कालावधी का लागला, आदेशाची अंमलबजावणी कोणत्या कारणामुळे रखडली आणि या कालावधीत संबंधित अधिकाऱ्यांकडून नेमकी कोणती कार्यवाही करण्यात आली, असे अनेक प्रश्न आता ग्रामस्थांकडून उपस्थित केले जात आहेत.

चौकशीचा आदेश प्रशासनाच्या पातळीवरच प्रलंबित राहिल्याने त्यामागे नेमके कारण काय होते, याचीही स्वतंत्रपणे तपासणी व्हावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे. चौकशीला विलंब करणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांचीही वरिष्ठ पातळीवरून जबाबदारी निश्चित करण्यात यावी, अशी भूमिका ग्रामस्थांनी घेतली आहे. दरम्यान, या संपूर्ण प्रकरणात आता जिल्हास्तरीय समितीच्या अहवालाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. समितीने केलेल्या अभिलेख तपासणीत



ग्रामपंचायत कार्यालय नादुरुस्त असल्याने गावातील आरोग्य केंद्राच्या एका खोलीत अभिलेखाची तपासणी झाली.

आर्थिक अनियमितता, नियमबाह्य खर्च अथवा विकासकामांशी संबंधित काही त्रुटी आढळतात का, याकडे ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे. सात दिवसांत अहवाल सादर करण्याचे मूळ निर्देश असल्याने समितीचा अहवाल कोणत्या निष्कर्षापर्यंत पोहोचतो आणि त्यावर विद्यमान मुख्य कार्यकारी अधिकारी कोणती प्रशासकीय कारवाई करतात, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

ग्रामपंचायतीच्या कारभाराबाबत यापूर्वीही तत्कालीन ग्रामपंचायत सचिवांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे तक्रारीच्या स्वरूपात गंभीर आरोप केल्याचे समोर आले आहे. त्यामुळे सध्याची चौकशी केवळ कागदोपत्री न राहता प्रत्यक्ष कामे, खर्च आणि संबंधित अभिलेख यांची ताळमेळ तपासून करण्यात यावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

### निधीचा गैरवापर : तत्कालीन सचिवांचा आरोप !

सावरगाव ग्रामपंचायतीच्या कारभारासंदर्भात तत्कालीन सचिव समाधान साळोकार यांनी २ फेब्रुवारी २०२६ रोजी तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना दिलेल्या पत्रात गंभीर स्वरूपाचे आरोप केले होते. ग्रामपंचायतीच्या १५व्या वित्त आयोगाच्या निधीतून जानेवारी २०२४ ते नोव्हेंबर २०२४ या कालावधीत सुमारे २८ लाख रुपये खर्च करण्यात आल्याचा दावा त्यांनी केला होता. मात्र, संबंधित निधीतून दाखविण्यात आलेली कामे प्रत्यक्षात करण्यात आली नसल्याचा आरोपही पत्राद्वारे करण्यात आला होता. तसेच ग्रामपंचायतीच्या सरपंच बसंतीबाई राधेश्याम राठी या वाडेगाव येथे वास्तव्यास असून ग्रामपंचायतीच्या कारभारात त्यांच्याऐवजी त्यांचे पती व मुलगा स्वाक्षऱ्या करून कारभार पाहत असल्याचा आरोपही तत्कालीन सचिवांनी पत्रातून केला होता. सरपंच केवळ मासिक सभेसाठी महिन्यातून एकदा उपस्थित राहत असल्याचाही दावा करण्यात आला होता.

मात्र, हे सर्व आरोप असून त्यांची सत्यता अधिकृत चौकशीअंतीच स्पष्ट होणार आहे. त्यामुळे सध्याच्या जिल्हास्तरीय समितीने संबंधित आर्थिक व्यवहारांची कागदपत्रे, ठराव, बिले, व्हाउचर, मोजमाप पुस्तिका, कामांची प्रत्यक्ष स्थिती तसेच संबंधित नियमांचे पालन झाले आहे की नाही, याची वस्तुनिष्ठ पडताळणी करणे अपेक्षित आहे. विशेष म्हणजे, ग्रामपंचायतीच्या निधीच्या खर्चासंदर्भात कोणतीही अनियमितता आढळल्यास संबंधितांची जबाबदारी निश्चित करण्याबरोबरच नियमांनुसार पुढील प्रशासकीय अथवा कायदेशीर कार्यवाही होणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे आरोपांमध्ये तथ्य नसल्यास संबंधित ग्रामपंचायत पदाधिकारी व कर्मचाऱ्यांवरील आरोपांबाबतही वस्तुस्थिती स्पष्ट होणे गरजेचे आहे. सध्या समितीने अभिलेखांची तपासणी सुरू केली असून चौकशीचा अंतिम निष्कर्ष अद्याप समोर आलेला नाही. त्यामुळे समितीच्या अहवालापूर्वी कोणावरही गैरव्यवहाराचा ठपका ठेवणे योग्य ठरणार नाही. मात्र, तत्कालीन सीईओंच्या आदेशाला सहा महिन्यांनी मिळालेली अंमलबजावणी आणि त्याआधी तत्कालीन सचिवांनी केलेले गंभीर आरोप यामुळे सावरगाव ग्रामपंचायतीच्या कारभाराची ही चौकशी प्रशासनासाठीही कसोटीची ठरणार आहे. या प्रकरणी ग्रामपंचायतीच्या सरपंच बसंतीबाई राधेश्याम राठी यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता त्यांनी प्रतिसाद दिला नाही.

आता जिल्हास्तरीय समितीचा अहवाल नेमका काय निष्कर्ष नोंदवतो, चौकशीला झालेल्या विलंबाची जबाबदारी निश्चित होते का आणि आर्थिक अनियमितता आढळल्यास संबंधितांवर कोणती कारवाई केली जाते, याकडे सावरगाव ग्रामस्थांसह संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

---

## जाहीर नोटीस

**वि.०२ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ११८६/२०२६ — प्रोसेस नं.९४३०/२०२६
चौ.ता. ०४/०८/२०२६ — दिनांक : २३/०७/२०२६

**अर्जदार :** १. लक्ष्मी विठ्ठल सोनोने, रा. आपातापा रोड, खरब बु., दमानी हॉस्पीटल मागे, अकोला, ता. जि. अकोला. २. शिलाबाई शिवराम जगदाळे, रा. डॉ. आंबेडकर मार्ग, अशोक नगर, भिम चौक, अकोला. ३. सुरेश विठ्ठल सोनोने, रा. आपातापा रोड, दमानी हॉस्पीटल रोड, सारनाथ नगर, अकोला, ता. जि. अकोला ४. रामदास विठ्ठल सोनोने, रा. खरब बु. अकोला, ता. जि. अकोला. ५. कु. शालू विठ्ठल सोनोने, रा. आपातापा रोड, खरप बु., राम दमानी हॉस्पीटल जवळ, अकोला, ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : विठ्ठल किसन सोनोने,
**पत्ता :-** रा. आपातापा रोड, खरब बु., दमानी हॉस्पीटल मागे, अकोला, ता. जि. अकोला.

या अर्थी उपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत विठ्ठल किसन सोनोने यांचे दि. २२/०७/२०११ रोजी अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक. ०४/०८/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २३/०७/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

**वि.०२ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १२५१/२०२६ — प्रोसेस नं.९७४८/२०२६
चौ.ता. ०९/०९/२०२६ — दिनांक : ३०/०७/२०२६

**अर्जदार :** १. श्रीमती जिजाबाई विश्वनाथ राजगुरू रा. भौरद, ता. जि. अकोला. २. सौ. पुष्पा ज्ञानदेव खराटे रा. आळंदा (रूस्तमाबाद), ता. बार्शिटाकळी, जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : सिताबाई मारोती वाघमारे
**पत्ता :-** रा. व्दारा जिजाबाई विश्वनाथ राजगुरू रा भौरद, ता. जि. अकोला

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत सिताबाई मारोती वाघमारे यांचे दि. १३/१०/२०२२ रोजी राहते घरी भौरद, ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०९/०९/२०२६ रोजी सकाळी १:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही, असे गृहीत धरून सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ३०/०७/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
प्र.अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## चौकशीची जाहिर नोटीस

**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अकोला विभाग अकोला**

जा.क्र. /२२४७/२०२६ — दि. ०७/०८/२०२६
अर्ज क्रमांक :- ८०/२०२६ कलम - १९

**सार्वजनिक न्यासाचे नाव -** श्री. निर्गुनेश्वर शिव मंदिर ट्रस्ट, सस्ती, ता. पातुर जि. अकोला
अर्जदार :- सौ.भाग्यश्री संतोष गिर्हे रा. मु.पो. सस्ती ता. पातुर जि. अकोला

सर्व संबंधित लोकांस या जाहिर नोटिसीने कळविण्यांत येते की, सहाय्यक धर्मादाय आयुक्त अकोला विभाग अकोला हे वर नमुद केलेल्या अर्ज यासंबंधी मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम २२ / १९ अन्वये खालील मुद्यावर चौकशी करणार आहेत.

१) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय ? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय ?

२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?

अ)जंगम मिळकत (वर्णन) **:-७००/- रुपये सौ. भाग्यश्री संतोष गिर्हे यांचे जवळ जमा.** आ) स्थावर मिळकत (वर्णन) **: - निरंक**

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची केलेली कैफियत ही नोटिस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसाचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठविणे. नंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरिल मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरि केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील. ही नोटिस माझे सहीनिशी व मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त - १, अकोला यांच्या शिक्कयानीशी आज दिनांक-०७/०८/२०२६ रोजी दिली.

शिक्का

**अधिक्षक**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
अकोला विभाग अकोला

# वृक्षसंवर्धनाचा संदेश देणारी चित्रकला स्पर्धा उत्साहात

## विद्यार्थ्यांच्या कुंचल्यातून साकारला 'हरित अकोला'चा संदेश



■ प्रतिनिधी | अकोला ■

विद्यार्थ्यांमध्ये वृक्षसंवर्धनाबाबत जनजागृती निर्माण करण्यासोबतच पर्यावरण संरक्षणाची भावना दृढ व्हावी आणि त्यांच्या सुप्त कलागुणांना व्यासपीठ मिळावे, या उद्देशाने आयोजित करण्यात आलेली 'वृक्ष संवर्धन चित्रकला स्पर्धा-२०२६' रविवारी उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. विद्यार्थ्यांनी आपल्या कुंचल्यातून वृक्षसंवर्धन, पर्यावरण संरक्षण आणि हरित अकोल्याचा प्रभावी संदेश दिला.

अकोला गार्डन क्लबच्या संकल्पनेतून रोटरी क्लब ऑफ अकोला ईस्ट, मुंगीलाल बाजोरिया कॉन्व्हेंट, अकोला आणि अकोला जिल्हा कलाध्यापक संघ यांच्या संयुक्त विद्यमाने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. शहरातील विविध शाळांमधील विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला. कार्यक्रमाचे उद्घाटन अकोला गार्डन क्लबचे अध्यक्ष संजय शर्मा, रोटरी क्लब ऑफ अकोला ईस्टचे अध्यक्ष अजय सेंगर, हिंदी गुजराती शिक्षा मंडळाचे अध्यक्ष उमेश बगडिया, माजी अध्यक्ष बी. एम. अग्रवाल, अकोला जिल्हा कलाध्यापक संघाचे जिल्हाध्यक्ष संदीप शेवलकार तसेच विद्यार्थी प्रतिनिधी यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाले. यावेळी उपविभागीय अधिकारी प्रा. संजय खडसे प्रमुख उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना पर्यावरणाचे महत्त्व, मानवी जीवनातील वृक्षांचे स्थान आणि वृक्षसंवर्धनाची गरज अधोरेखित केली.

### दोन गटांत रंगली स्पर्धा

इयत्ता पाचवी ते सातवी आणि इयत्ता आठवी ते दहावी अशा दोन गटांत ही चित्रकला स्पर्धा घेण्यात आली. विद्यार्थ्यांनी कल्पकतेने साकारलेल्या चित्रांमधून 'झाडे वाचवा, पर्यावरण वाचवा', 'वृक्ष आहेत तर जीवन आहे', 'हरित अकोला' यांसह विविध पर्यावरणपूरक संदेश प्रभावीपणे मांडले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाविषयी संवेदनशीलता निर्माण होण्यासोबतच त्यांच्या कलागुणांना योग्य व्यासपीठ मिळाले. विद्यार्थ्यांच्या कल्पनाशक्तीला पर्यावरण संवर्धनाची जोड देणारा हा उपक्रम शहरात प्रेरणादायी ठरला.

### विजेत्यांचा वार्षिक पुष्प प्रदर्शनात गौरव

स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांचा बक्षीस वितरण समारंभ अकोला गार्डन क्लबच्या वार्षिक पुष्प प्रदर्शनात आयोजित करण्यात येणार आहे. तसेच स्पर्धेतील निवडक चित्रांचे विशेष प्रदर्शनही भरविण्यात येणार आहे. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी अकोला जिल्हा कलाध्यापक संघाचे जिल्हाध्यक्ष संदीप शेवलकार, सचिव चंद्रकांत वाघ, स्पर्धा प्रमुख संजय आगाशे यांच्यासह सुभाष धार्मिक, मुकेश गव्हाणकर, संजय गोपनारायण, आनंदा फुलारी, दिनेश पाटील, महेंद्र कोकणे, संजय तायडे, विठ्ठल इढोळे, गोपाल देशमुख, उमेश जोशी, सुनील बोचरे, राहुल राठोड, विवेक फोकमारे, दीपक आप्पा भुसारी, संतोष सहारे, मनोज वाडेकर, रवींद्र काळबांडे, गणेश ठाकरे, रवींद्र पांडे, राजेश टाले, प्रतीक वाघ, अर्चना बोरोकार, मेघमाला काठोके, शीतल चिकटे, रूपाली कुलकर्णी, शिरीकर मॅडम, कल्याणी खुमकर, शुभम धामणकर, आनंद वाघमारे, देशमुख सर, सचिन पाईक यांच्यासह शहरातील अनेक कला शिक्षकांनी परिश्रम घेतले.

# 'करेंगे या मरेंगे'च्या मंत्राला उजाळा; हुतात्मा स्मारकाला मानवंदना!

■ प्रतिनिधी | अकोला ■

स्वातंत्र्यलढ्याच्या इतिहासातील निर्णायक दिवस असलेल्या ऑगस्ट क्रांती दिनानिमित्त काँग्रेस व मित्रपक्षांच्या वतीने रविवारी हुतात्मा स्मारक येथे स्वातंत्र्यसैनिकांना मानवंदना देण्यात आली. महात्मा गांधी यांनी ९ ऑगस्ट १९४२ रोजी दिलेल्या 'करेंगे या मरेंगे' या प्रेरणादायी मंत्राला उजाळा देत उपस्थितांनी स्वातंत्र्यसैनिकांच्या त्यागाला अभिवादन केले.

माजी उपमहापौर निखीलेश दिवेकर यांच्या आयोजनातून झालेल्या या कार्यक्रमाच्या प्रारंभी हुतात्मा स्मारकाला पुष्प अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी काँग्रेससह राष्ट्रवादी काँग्रेस, आम आदमी पक्ष, कम्युनिस्ट पक्ष तसेच विविध सामाजिक क्षेत्रातील मान्यवर सहभागी झाले. त्यामुळे कार्यक्रमाला सर्वपक्षीय स्वरूप प्राप्त झाले.

### ९ ऑगस्ट १९४२... भारत छोडो आंदोलनाची हाक!

ब्रिटिश सत्तेविरोधातील स्वातंत्र्यलढ्याला निर्णायक वळण देणाऱ्या या दिवशी महात्मा गांधी यांनी मुंबईतून 'भारत छोडो' आंदोलनाची अंतिम हाक दिली. 'करेंगे या मरेंगे'चा नारा देत देशवासीयांना स्वातंत्र्यासाठी सर्वस्व पणाला लावण्याचे आवाहन करण्यात आले होते. याच ऐतिहासिक दिवसाचे स्मरण करत उपस्थितांनी स्वातंत्र्यसैनिकांच्या बलिदानाला अभिवादन केले.

**क्रांती दिनानिमित्त काँग्रेससह मित्रपक्षांचा एकत्रित कार्यक्रम; स्वातंत्र्यसैनिकांच्या त्यागाचे स्मरण**



यावेळी उपस्थित मान्यवरांनी मनोगत व्यक्त करत स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी असंख्य स्वातंत्र्यसैनिकांनी केलेल्या संघर्षाची आठवण करून दिली. त्यांच्या त्यागामुळेच आज आपण स्वतंत्र भारतात मुक्तपणे श्वास घेत असल्याचे नमूद करण्यात आले. स्वातंत्र्यलढ्याचा इतिहास आणि त्यामागील बलिदानाची जाणीव नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याची गरजही व्यक्त करण्यात आली.

कार्यक्रमाला माजी जिल्हाध्यक्ष अशोक अमाणकर, प्रशांत गावंडे, शहराध्यक्ष महेंद्र गवई, राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्याध्यक्ष देवानंद टाले, खान सरदार खान, माजी सरपंच राजेश मते, आपचे अध्यक्ष मसूद खान, ॲड. सुरेश ढाकोळकर, पंकज जायले, काँग्रेसचे पूर्व ब्लॉक अध्यक्ष विनोद नालट, संदेश वानखडे, कपिल रावदेव, पंकज देशमुख, तश्वर पटेल, कम्युनिस्ट पक्षाचे अध्यक्ष नयन गायकवाड, जय वाठुरकर, डॉ. मिलिंद पवार, सय्यद यासीन (बब्बू भाई), ॲड. पंकज किर्तक, राजेश जेरपोतले, ॲड. अंकुश गावंडे, मनीष मिश्रा, दक्षिण ब्लॉक अध्यक्ष प्रशांत प्रधान आदी उपस्थित होते. याशिवाय फैजान लीडर, आक्रोश सायखेडे, रहमान बाबू, राजकुमार परदेसी, मोहम्मद शकील, सुगत भटकर, राहुल इंगोले, निलेश तोरणे, सोमेश डीगे, मंथन शिरसाट, नितीन पवार, गणेश टाले, मनोज गामे, संतोष यादव, जे.के. राजा, इस्माईल टीव्ही वाले, महादेव मेहेंगे, दीपक ठाकूर, गणेश धोत्रे आदींची उपस्थिती होती.

# उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवारांकडून शत्रुघ्न बिडकरांच्या कार्याचे कौतुक



■ प्रतिनिधी | अकोला ■

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या माध्यमातून अकोला जिल्ह्यात विविध सामाजिक, राजकीय व संघटनात्मक उपक्रम प्रभावीपणे राबविणारे पक्षाचे कार्यकर्ते शत्रुघ्न बिडकर यांच्या कार्याची दखल घेत महाराष्ट्राच्या उपमुख्यमंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेसच्या राष्ट्रीय अध्यक्षा सुनेत्रा पवार यांनी त्यांचे कौतुक केले. मुंबई येथे झालेल्या भेटीदरम्यान बिडकर यांनी अकोला जिल्ह्यात राबविलेल्या विविध उपक्रमांचा कार्यअहवाल सादर केला. यावेळी त्यांच्या कार्याचे आणि कार्यक्रमांच्या प्रभावी नियोजनाचे कौतुक करण्यात आल्याची माहिती राष्ट्रवादी काँग्रेसचे उपाध्यक्ष विनोद मिरगे यांनी दिली.

मूर्तिजापूरचे माजी आमदार स्वर्गीय तुकाराम बिडकर यांचे लहान बंधू असलेले शत्रुघ्न बिडकर हे राष्ट्रवादी काँग्रेसच्या माध्यमातून

**जिल्ह्यात राष्ट्रवादीच्या विविध उपक्रमांचे प्रभावी आयोजन; मुंबईतील भेटीत कार्याचा अहवाल सादर**

अकोला जिल्ह्यात पक्ष संघटन मजबूत करण्यासाठी सातत्याने विविध उपक्रम राबवत आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसच्या वर्धापन दिनानिमित्त तसेच स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त जिल्ह्यात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेसच्या राष्ट्रीय नेत्या सुनेत्रा पवार यांच्याबद्दल प्रदेश काँग्रेस अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केलेल्या कथित आक्षेपार्ह वक्तव्याच्या निषेधार्थ बिडकर यांच्या पुढाकारातून जोडेमारो आंदोलन करण्यात आले होते. या आंदोलनासह पक्षाच्या विविध कार्यक्रमांचे नियोजन आणि आयोजन त्यांनी प्रभावीपणे केले.

# गुन्हेशोधक श्वान 'जोया'ला शासकीय सलामीने भावपूर्ण निरोप

### सात वर्षांच्या सेवेत ४ खून, ५ चोरीचे गुन्हे उकलण्यात मोलाचे योगदान

■ प्रतिनिधी | अकोला ■

अकोला पोलीस दलाच्या श्वान पथकातील गुन्हेशोधक डोबरमन श्वान 'जोया' हिचे रविवारी निधन झाले. तिच्या निधनानंतर पोलीस श्वान पथकाच्या आवारात शासकीय सलामी देत भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. पोलीस दलातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी 'जोया'च्या कार्याची आठवण काढत कृतज्ञता व्यक्त केली.

'जोया'चा जन्म २ जानेवारी २०१८ रोजी झाला होता. १२ मार्च २०१८ रोजी तिची अकोला पोलीस दलासाठी खरेदी करण्यात आली. त्यानंतर राष्ट्रीय श्वान प्रशिक्षण केंद्र, एस.एस.बी. डेरा, अलवर (राजस्थान) येथे ४ सप्टेंबर २०१८ ते १८ मे २०१९ या कालावधीत तिला विशेष प्रशिक्षण देण्यात आले. प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर 'जोया'ने अकोला पोलीस दलाच्या श्वान पथकात गुन्हेशोधक म्हणून सेवा बजावली. सन २०१९ ते २०२६ या सात वर्षांच्या कालावधीत तिने तब्बल ४ खून आणि ५ चोरीचे असे एकूण ९ गुन्हे उकलण्यात पोलिसांना महत्त्वपूर्ण मदत



केली. गुंतागुंतीच्या गुन्ह्यांच्या तपासात तिच्या कौशल्याचा अनेकदा पोलिसांना मोठा फायदा झाला. 'जोया'ची सेवा हस्तक म्हणून जीपीएसआय आनंद मंगल गायकवाड आणि पोलीस कॉन्स्टेबल क्रमांक २२५७ किरण लक्ष्मण अहिर यांनी जबाबदारी सांभाळली. या काळात त्यांनी 'जोया'च्या प्रशिक्षणासह तिच्या सेवेत महत्त्वाची भूमिका बजावली.

रविवारी पोलीस श्वान पथक येथे डीवायएसपी (होम) संतोष ताले यांच्या हस्ते 'जोया'ला शासकीय सलामी देण्यात आली. यावेळी आरएसआय गुलाब पाटनकर यांची उपस्थिती होती. अकोला पोलीस दलाच्या वतीने 'जोया'च्या उल्लेखनीय सेवेला उजाळा देत कृतज्ञता व्यक्त करण्यात आली.

गुन्हे उकलण्यात 'जोया'ची कामगिरी अविस्मरणीय सात वर्षांच्या सेवेत 'जोया'ने गुन्ह्यांच्या तपासात दिलेले योगदान पोलीस दलासाठी महत्त्वपूर्ण ठरले. विशेषतः खून आणि चोरीच्या गुन्ह्यांचा माग काढताना तिच्या कौशल्यामुळे तपासाला दिशा मिळाली. तिच्या निधनाने अकोला पोलीस दलातील एक विश्वासू सहकारी गमावल्याची भावना व्यक्त करण्यात आली.

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

संपादक - प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक २४१
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

मुख्य कार्यालय :– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

# विश्व आदिवासी दिनानिमित्त धारणीत आदिवासी एकजुटीचा हुंकार

## पारंपरिक वेशभूषा, वाद्यांचा निनाद अन् घोषणांनी दुमदुमले शहर

**धारणी/प्रतिनिधीः-** विश्व आदिवासी दिनानिमित्त मेळघाटातील धारणी शहरात रविवारी आदिवासी समाजाच्या वतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. पारंपरिक संस्कृती, सामाजिक एकजूट आणि आदिवासी अस्मितेचा जागर करणाऱ्या या उपक्रमांना समाजबांधवांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. त्यामुळे संपूर्ण शहरात दिवसभर उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.

या निमित्ताने धारणी मधुआ नाला परिसरातून भव्य आदिवासी रॅली काढण्यात आली. रॅलीदरम्यान 'एक तीर, एक कमान—आदिवासी एक समान', 'जल, जंगल, जमीन आमची', 'जय जोहार', 'जय आदिवासी' अशा घोषणांनी धारणी शहराचा परिसर दुमदुमून गेला. मोठ्या संख्येने सहभागी झालेल्या समाजबांधवांनी आपल्या हक्क, परंपरा आणि अस्मितेचा बुलंद आवाज यावेळी व्यक्त केला.

रॅलीतील सहभागींची पारंपरिक वेशभूषा हे विशेष आकर्षण ठरले. महिला, युवक-युवती तसेच ज्येष्ठ नागरिकांनी पारंपरिक पोशाख परिधान करून आदिवासी समाजाच्या समृद्ध संस्कृतीचे दर्शन घडविले. पारंपरिक वाद्यांच्या तालावर 'गदली सुसून' हे पारंपरिक आदिवासी नृत्य सादर करण्यात आले. नृत्याच्या ठेक्यावर सहभागींचा उत्साह ओसंडून वाहत होता.



पारंपरिक वाद्यांचा गजर, नृत्य आणि घोषणांनी भारलेली ही रॅली शहरातील प्रमुख मार्गांवरून मार्गक्रमण करत जयस्तंभ चौकात पोहोचली. येथे आदिवासी समाजाच्या संघर्ष, शौर्य आणि अस्मितेचे प्रतीक असलेल्या भगवान बिरसा मुंडा, टंट्या मामा भील आणि आबा रेंगा कोरकू यांच्या प्रतिमांचे पूजन करून अभिवादन करण्यात आले.

विश्व आदिवासी दिनानिमित्त आयोजित या भव्य रॅलीतून आदिवासी समाजाची सांस्कृतिक ओळख, परंपरांवरील अभिमान आणि एकतेची ताकद प्रभावीपणे अधोरेखित झाली. धारणी शहरातील ही रॅली आदिवासी अस्मिता, हक्क आणि समृद्ध संस्कृतीच्या जतनाचा संदेश देणारी ठरली.

# परतवाडा बस आगारात घाणीचे साम्राज्य

**परतवाडा/प्रतिनिधीः-** परतवाडा बस आगार परिसरात झाडे - झुडपे, घाणीचे साम्राज्यामुळे प्रवाशांचा आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. परतवाडा बस आगार परिसरात बाहेरगावी जाण्यासाठी प्रवाशी वर्गाची नेहमी गर्दी असते .मात्र परतवाडा बस आगार परिसरातील मुख्य प्रवेश द्वार जवळच झाडे - झुडपे वाढली आहे आणि परिसरात अनेक ठिकाणी झाडे - झुडपे दिसतात .तासोचा परिसरात घाणीचे साम्राज्य पाहायला मिळाले .यामुळे प्रवाशी वर्गाच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे.



# शिवीगाळीचा वाद विकोपाला; १७ वर्षीय मुलावर चाकूने वार



**अमरावती/प्रतिनिधीः-** किरकोळ शिवीगाळीच्या वादातून १७ वर्षीय मुलाला रस्त्यात अडवून तिघांनी चाकूने हल्ला केल्याची घटना रामपुरी कॅम्प परिसरात घडली. मोपेडवरून घरी जात असलेल्या मुलाच्या पाठीमागील बाजूस बगलजवळ चाकूने वार करण्यात आल्याने तो जखमी झाला. याप्रकरणी गाडगेनगर पोलिसांनी तिघांविरुद्ध गुन्हा नोंदविला आहे.

वेदांत किसनराव जायले (वय १७, रा. रामपुरी कॅम्प, गल्ली क्रमांक ४) हा शनिवारी, ८ ऑगस्ट रोजी सायंकाळी पाच वाजताच्या सुमारास मोपेडवरून घराकडे जात होता. मिठूची चक्कीसमोरील रस्त्यावर महालक्ष्मी प्रोव्हिजनजवळ तीन तरुणांनी त्याचा रस्ता अडविला. तिघांनी वेदांतला शिवीगाळ केल्याने त्यानेही प्रत्युत्तरात शिवीगाळ केली. यानंतर वाद वाढला आणि आरोपींपैकी एकाने मोपेडच्या डिक्कीत ठेवलेला चाकू बाहेर काढला. त्याने वेदांतच्या पाठीमागील बाजूस, बगलजवळ चाकूने वार केला. अचानक झालेल्या हल्ल्यामुळे वेदांतच्या जखमेतून रक्तस्राव झाला. घटनेनंतर जखमी वेदांतच्या जबानीवरून गाडगेनगर पोलिसांनी तिघांविरुद्ध बीएनएसच्या कलम ११८(२), ३५२ आणि ३(५) अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपींचा शोध सुरू असून, या घटनेचा पुढील तपास गाडगेनगर पोलिस करीत आहेत.

# घराचे कुलूप तोडून दागिने, रोकड आणि मोबाईल लंपास

**अमरावती/प्रतिनिधीः-** घर बंद असल्याची संधी साधून अज्ञात चोरट्याने लोखंडी गेटचे कुलूप उघडून घराच्या लाकडी दरवाजाचे कुलूप तोडत आत प्रवेश केला. चोरट्याने सोन्याचे दागिने, रोकड, मोबाईल आणि चांदीच्या दागिन्यांसह तब्बल १ लाख २१ हजार रुपयांचा मुद्देमाल लंपास केला. ही घटना अकोली रिंग रोड परिसरातील संकल्प लेआउट येथे घडली. पोलिसांच्या माहितीनुसार, ७ ऑगस्ट रोजी दुपारी १२.१० ते सायंकाळी ५.३० वाजेच्या दरम्यान संबंधित महिलेच्या घरात कोणीही नव्हते. ही संधी साधून अज्ञात चोरट्याने प्रथम घराबाहेरील लोखंडी गेटचे कुलूप उघडले. त्यानंतर घराच्या लाकडी दरवाजाचे कुलूप तोडून घरात प्रवेश केला. चोरट्याने घरातील सॅमसंग कंपनीचा जुना वापरातील मोबाईल, टीव्ही कपाटाजवळ ठेवलेला नोकिया कंपनीचा मोबाईल, तसेच देवघरातील ड्रॉवरमध्ये ठेवलेली अंदाजे २५ ग्रॅम वजनाची जुनी सोन्याची पोत आणि सुमारे ५ ग्रॅम वजनाची लहान सोन्याची पोत असा अंदाजे ६८ हजार ५०० रुपयांचा सोन्याचा ऐवज चोरून नेला. याशिवाय घरातील ३५ हजार रुपयांची रोकड, चांदीचे जोडवे तीन जोड आणि चांदीचा आकडा असा अंदाजे १० हजार रुपयांचा ऐवजही चोरट्याने लंपास केला. मोबाईल व दागिन्यांसह चोरीला गेलेल्या मुद्देमालाची एकूण किंमत १ लाख २१ हजार रुपये असल्याचे पोलिसांनी नमूद केले आहे. याप्रकरणी ८ ऑगस्ट रोजी मध्यरात्री १२.२० वाजता खोलापुरी गेट पोलिस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध बीएनएस कलम ३०५ व ३३१(३) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांकडून चोरट्याचा शोध घेण्यासाठी पुढील तपास सुरू आहे.


## फ्लॅट विकणे आहे

टोपे नगर बोर्ड ऑफिस जवळ असलेला डुप्लेक्स फ्लॅट विकणे आहे . एक बेड रूम , किचन स्वतंत्र डायनिंग , प्रशस्त हॉल आणि एक रूम असा फ्लॅट आहे.

**संपर्कः ९४२२८५७१६९, ९४२२९१८५६९**


## संत ज्ञानेश्वर नागरी सहकारी पतसंस्था मर्या. अमरावती
### आमसभेची जाहीर सुचना

संत ज्ञानेश्वर नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित अमरावती (नोंदणी क्र.६६९) या संस्थेची आमसभा (वार्षिक सर्वसाधारण सभा) रविवार दि. २३ ऑगस्ट २०२६ ला सकाळी ११.०० वाजता घेण्याचे ठरविले असुन सदर सभेस सर्व सदस्यांनी वेळेवर हजर रहावे. ही विनंती.

**स्थळ - भक्त निवास, श्री एकविरा देवी संस्थान एच.व्ही.पी.एम. जवळ अमरावती**

**सचिव**
**संत ज्ञानेश्वर नागरी सहकारी पतसंस्था मर्या. अमरावती र.नं.६६९**

## पवित्र प्रणालीद्वारे शिक्षक भरती जाहीरात-२०२५

**निळकंठ व्यायाम मंडळ, अमरावती**
**(संस्था कोड 270715SC036) द्वारा संचालित**
**श्री निळकंठ माध्यमिक विद्यालय, भातकुली रोड, अमरावती**

श्री निळकंठ माध्यमिक विद्यालय, जुना भातकुली नाका, भातकुली रोड, अमरावती (मराठी माध्यम १००% अनुदानीत) या विद्यालयात शासनाने शिक्षक भरती प्राधान्यक्रम दिलेल्या पवित्र प्रणाली मार्फत (मुलाखतीद्वारे) शिक्षक सेवक भरती करण्यासाठी जाहिरात देण्यात येत आहे.

| क्र. | वर्ग | पद | व्यवसायीक व शैक्षणिक अर्हता | विषय | संवर्ग | मानधन |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ९ ते १० | १ | बी.एस.सी./बी.एड. | विज्ञान | इ.मा.व. (OBC) | १८०००/- |
| २ | ९ ते १० | १ | बी.ए./बी.एड | मराठी | वि.जा.(अ) (V.J.A) | १८०००/- |

**टिप :** वरील पदांसाठी शिक्षक भरती संदर्भात पवित्र पोर्टलवर दिलेल्या अटी व नियम उमेदवारांसाठी बंधनकारक राहील व पात्र उमेदवारवारांनी अर्ज https://tait2025mahateacherrecruitment.org.in या संकेतस्थळावर करावे.

**अध्यक्ष** श्री निळकंठ व्यायाम मंडळ अम.
**सचिव** श्री निळकंठ व्यायाम मंडळ अम.
**मुख्याध्यापक** श्री निळकंठ व्यायाम मंडळ अम.

जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक ३३३**
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

## पवित्र प्रणालीद्वारे शिक्षक भरती जाहीरात-२०२५

**शिक्षक अभियोग्यता व बुद्धिमत्ता चाचणी-२०२५** (मान्य दिनांक २१.०७.२०२६) (प्रसिध्दी दिनांक २४.०७.२०२६)

**संस्थेचे नांव-** (270707SC004) SHRIKRISHNA VYAYAM SHALA (Secondary/Higher Secondary) - With Interview

शैक्षणिक स्तर- Secondary/Higher Secondary

SHRIKRISHNA VYAYAM SHALA या व्यवस्थापनाच्या शाळेमध्ये खाली नमुद केलेल्या पदांसाठी आवश्यक शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता धारण करीत असलेल्या व पवित्र प्रणालीमध्ये नोंदणी केलेल्या पात्र उमेदवारांकडून ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.

**आरक्षण निहाय रिक्त पदांचा तपशील**

| अ. क्र. | प्रवर्ग | महिला | माजी | अंशकालीन | प्रकल्पग्रस्त | भुकंपग्रस्त | खेळाडू | समांतर आरक्षणा व्यतिरिक्त(उर्वरित) पदे | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | अनु.जाती | १ | ० | ० | ० | ० | ० | १ | २ |
| २ | वि.जा.(अ) | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| ३ | एकूण | १ | ० | ० | ० | ० | ० | २ | ३ |

**शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता, विषय व पदनिहाय रिक्त पदांचा तपशिल** (प्रसिध्दी दिनांक २४.०७.२०२६)

| अ. क्र. | माध्यम | पद | वेतनश्रेणी/ मानधन | अनुदान प्रकार | विषय | शिकविण्याचे माध्यम | आवश्यक शैक्षणिक पात्रता | आवश्यक व्यावसायिक पात्रता | TET/CTET | एकुण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. | Marathi | Graduate Teacher Std.(6-8) | Consolidated Pay - GT 6-8 (16000) | Aided | Mathe Matics -Science | Marathi | Graduation | Diploma/ Graduation | TET Paper2 (Math-Science)/ CTET Paper2 (Math-Science) | 1 |
| 2. | Marathi | Graduate Std.(9-10) | Consolidated Pay - GT 9-10 (18000) | Aided | Mathe Matics -Science | Marathi | Graduation | Graduation | | 1 |
| | | | | | | | | Total | - | 2 |

**सर्वसाधारण सुचना -**१)अभियोग्यता व बुद्धिमत्ता चांचणी २०२५ (TAIT) प्रविष्ट झालेल्या उमेदवारापैकी ज्या उमेदवारांनी पवित्र प्रणाली (https://tait2025mahateacherrecruitment.org.in) या संकेतस्थळावर वैयक्तिक माहिती नोंदवून स्वप्रमाणित केलेली आहे असे उमेदवार जाहिरातीनुसार ऑनलाईन अर्ज करु शकतील. २)ईच्छुक व अर्हता प्राप्त करणारे उमेदवार ऑनलाईन जाहिरातीच्या अनुषंगाने पात्र असलेल्या पदासाठी पसंती क्रमांक नमुद करुन पोर्टलवर ऑनलाईन अर्ज करतील.

**सचिव** श्रीकृष्ण व्यायाम शाळा, आमला वि. ता. चांदूर रेल्वे जि. अमरावती
**अध्यक्ष** श्रीकृष्ण व्यायाम शाळा, आमला वि. ता. चांदूर रेल्वे जि. अमरावती

## पवित्र प्रणालीद्वारे शिक्षक भरती जाहीरात

**शिक्षक अभियोग्यता व बुद्धिमत्ता चाचणी-२०२५** (मान्य दिनांक २५.०६.२०२६) (प्रसिध्दी दिनांक ०६.०८.२०२६)

**संस्थेचे नांव-** (270707SC007) Vanita samaj chandur railway dist amravati (Primary) - With Interview

शैक्षणिक स्तर-Primary

Vanita samaj chandur railway dist amravati या व्यवस्थापनाच्या शाळेमध्ये खाली नमुद केलेल्या पदांसाठी आवश्यक शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता धारण करीत असलेल्या व पवित्र प्रणालीमध्ये नोंदणी केलेल्या पात्र उमेदवारांकडून ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.

**आरक्षण निहाय रिक्त पदांचा तपशील**

| अ. क्र. | प्रवर्ग | महिला | माजी सैनिक | अंश-कालीन | प्रकल्प-ग्रस्त | भुकंप-ग्रस्त | खेळाडू | समांतर आरक्षणा व्यतिरिक्त (उर्वरित) पदे | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | अनु. जमाती | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| २. | ई. डब्लू. एस. | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |

**शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता, विषय व पदनिहाय रिक्त पदांचा तपशिल**

| अ. क्र. | माध्यम | पद | वेतनश्रेणी/ मानधन | अनुदान प्रकार | विषय | शिकविण्याचे माध्यम | आवश्यक शैक्षणिक पात्रता | आवश्यक व्यावसायिक पात्रता | TET/CTET | एकुण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. | Marathi | Graduate Teacher Std.(6-8) | S-14 : 38600 122800 | Unaided | Mathe matic-Science | English | Graduation | Diploma/ Graduation | TET Paper 2(Math Science)/ CTET Paper2 (Math-Science) | 1 |
| 2. | Marathi | Graduate Teacher std (6-8) | S-14 : 38600 122800 | Unaided | Language (English) | -- | Graduation | Diploma/ Graduation | TET Paper 2(Any Subject)/ CTET Paper2 (Any Subject) | 1 |
| | | | | | | | | Total | | 2 |

**सर्वसाधारण सुचना -**

१) अभियोग्यता व बुद्धिमत्ता चांचणी २०२५ (TAIT) प्रविष्ट झालेल्या उमेदवारापैकी ज्या उमेदवारांनी पवित्र प्रणाली (https://tait2025mahateacherrecruitment.org.in) या संकेतस्थळावर वैयक्तिक माहिती नोंदवून स्वप्रमाणित केलेली आहे असे उमेदवार जाहिरातीनुसार ऑनलाईन अर्ज करु शकतील.
२) ईच्छुक व अर्हता प्राप्त करणारे उमेदवार ऑनलाईन जाहिरातीच्या अनुषंगाने पात्र असलेल्या पदासाठी पसंती क्रमांक नमुद करुन पोर्टलवर ऑनलाईन अर्ज करतील.
३) इ.१ ली ते इ.५ वी व इ.६ वी ते इ.८ वी या गटातील पदांसाठी अभियोग्यता व बुद्धिमत्ता चांचणी-२०२५(TAIT) परीक्षेपुर्वी शिक्षक पात्रता परीक्षा (TET/CTET) उत्तीर्ण असणारे उमेदवारच अर्ज करु शकतील.
४) इ.६ वी ते इ.८ वी या गटातील इतिहास/भूगोल/सामाजिक शास्त्र या विषयांसाठी उमेदवार शिक्षक पात्रता परीक्षा (TET/CTET) सामाजिकशास्त्र विषय घेऊन TET-Paper-2/CTET-Paper-2 उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.
५) इ.६ वी ते इ.८ वी या गटातील विज्ञान/गणित-विज्ञान या विषयांसाठी उमेदवार शिक्षक पात्रता परीक्षा (TET/CTET) गणित-विज्ञान विषय घेऊन TET-Paper-2/CTET-Paper2 उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.
६) इ.६ वी ते इ.८ वी या गटातील भाषा या विषयांसाठी उमेदवार शिक्षक पात्रता परीक्षा (TET/CTET) गणित-विज्ञान किंवा सामाजिक शास्त्र यापैकी कोणताही विषय घेऊन TET-Paper2/CTET-Paper-2 उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.
७) इ.१ ली ते ८ वी/इ.९ वी ते १२ वी/अध्यापक विद्यालय, या गटातील पदांसाठी अर्ज करणारा उमेदवार अभियोग्यता व बुद्धिमत्ता चांचणी-२०२५ ((TAIT)) या चाचणीस प्रविष्ट असणे आवश्यक आहे.
८) शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता व अध्यापनाचे विषय, वयोमर्यादा, आरक्षण, अन्य पात्रता व आवश्यक कागदपत्रे इत्यादीसाठी सर्वसाधारण सुचना सविस्तर तपशिलासह https://tait2025.mahateacherrecruitment.org.in या संकेतस्थळावर पवित्र प्रणालीमध्ये **उमेदवारांसाठी सर्वसाधारण सूचना** या शिर्षाखाली उपलब्ध आहेत. सदर सुचना व सुचनामध्ये नमुद आवश्यक शासन आवश्यक शासन निर्णय यांचे अवलोकन करुन स्वतःची खात्री करुनच ऑनलाईन अर्ज करावेत.
९) व्यवस्थापनाने जाहिरातीत दर्शविलेल्या एकुण पदांमध्ये दिव्यांग आरक्षणाच्या पदांचा समावेश आहे.
१०) व्यवस्थापनाने जाहिरातीत दर्शविलेल्या एकुण पदांमध्ये अनाथ आरक्षणाच्या पदांचा समावेश आहे.
११) व्यवस्थापनाच्या जाहिरातीत दर्शविलेल्या आरक्षणामध्ये व पदसंख्येमध्ये बदल होण्याची शक्यता आहे.
१२) उच्च माध्यमिक/कनिष्ठ महाविद्यालयांच्या अध्यापनाच्या दोन विषयांसाठी एक पूर्णकालीन पदाची जाहिरात असल्यास, या पदासाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारांची शैक्षणिक अर्हता दोन्ही विषयांमध्ये पदव्युत्तर पदवी (किमान द्वितीय श्रेणीमध्ये) उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.
१३) जिल्हा परिषद शाळांमध्ये नव्याने नियुक्त होणाऱ्या शिक्षकांना शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग दिनांक २१.०६.२०२३ मधील तरतुदीनुसार जिल्हा बदलीचा हक्क असणार नाही, याचीउमेदवारांनी नोंद घ्यावी.
१४) महाराष्ट्र राज्यातील सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गाकरीता आरक्षण अधिनियम दि.२६.०२.२०२४ अनुसार सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गाकरीता आरक्षणाची तरतूद विहितकरण्यात आली आहे. या आरक्षणाची कार्यपध्दती सदर आरक्षणाच्या अनुषंगाने मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल याचिका क्र.३४६८/२०२४ तसेच त्या अनुषंगिक इतर याचिकांवरील अंतिम निर्णयाच्या अधीन राहील.

**अध्यक्ष**
**वनिता समाज चांदूर रेल्वे जि.अमरावती**

## पवित्र प्रणालीद्वारे शिक्षक भरती जाहीरात-२०२५

**शिक्षक अभियोग्यता व बुद्धिमत्ता चाचणी-२०२५**
**अतुल विद्या मंदिर (वर्धा) चांदुर रेल्वे ता. चांदुर रेल्वे जि. अमरावती द्वारा संचालित**
(मान्य दिनांक २०.०७.२०२६) (प्रसिध्दी दिनांक २४.०७.२०२६)

**संस्थेचे नांव-** (270707SC003) Atul Vidya Mandir Wardha (Secondary/Higher Secondary) - With Interview

**शैक्षणिक स्तर-** Secondary/Higher Secondary

Atul Vidya Mandir Wardha या व्यवस्थापनाच्या शाळेमध्ये खाली नमुद केलेल्या पदांसाठी आवश्यक शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता धारण करीत असलेल्या व पवित्र प्रणालीमध्ये नोंदणी केलेल्या पात्र उमेदवारांकडून ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.

**आरक्षण निहाय रिक्त पदांचा तपशील**

| अ. क्र. | प्रवर्ग | महिला | माजी | अंशकालीन | प्रकल्पग्रस्त | भुकंपग्रस्त | खेळाडू | समांतर आरक्षणा व्यतिरिक्त(उर्वरित) पदे | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | भ.ज.(ड) | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| २ | इ.मा.व | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| | एकूण | ० | ० | ० | ० | ० | ० | २ | २ |

**शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता, विषय व पदनिहाय रिक्त पदांचा तपशिल** (मान्य दिनांक २०.०७.२०२६)

| अ. क्र. | माध्यम | पद | वेतनश्रेणी/ मानधन | अनुदान प्रकार | विषय | शिकविण्याचे माध्यम | आवश्यक शैक्षणिक पात्रता | आवश्यक व्यावसायिक पात्रता | TET/CTET | एकुण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. | Marathi | Graduate Teacher Std.(9-10) | Consolidated Pay - GT 9-10 (18000) | Aided | Physical Education | Marathi | Graduation | Graduation | -- | 1 |

**सर्वसाधारण सुचना** - १)अभियोग्यता व बुद्धिमत्ता चांचणी २०२५ (TAIT) प्रविष्ट झालेल्या उमेदवारापैकी ज्या उमेदवारांनी पवित्र प्रणाली (https://tait2025mahateacherrecruitment.org.in) या संकेतस्थळावर वैयक्तिक माहिती नोंदवून स्वप्रमाणित केलेली आहे असे उमेदवार जाहिरातीनुसार ऑनलाईन अर्ज करु शकतील. २)ईच्छुक व अर्हता प्राप्त करणारे उमेदवार ऑनलाईन जाहिरातीच्या अनुषंगाने पात्र असलेल्या पदासाठी पसंती क्रमांक नमुद करुन पोर्टलवर ऑनलाईन अर्ज करतील.

**अध्यक्ष** अतुल विद्या मंदिर (वर्धा) चांदुर रेल्वे ता.चांदुर रेल्वे जि. अमरावती
**सचिव** अतुल विद्या मंदिर (वर्धा) चांदुर रेल्वे ता.चांदुर रेल्वे जि. अमरावती

## पवित्र प्रणालीद्वारे शिक्षक भरती जाहीरात

**शिक्षक अभियोग्यता व बुद्धिमत्ता चाचणी-२०२५** (मान्य दिनांक २३.०७.२०२६) (प्रसिध्दी दिनांक ०६.०८.२०२६)

संस्थेचे नांव- **महाराष्ट्र शिक्षण समिती शिराळा, ता.जि.अमरावती द्वारा संचालित**
**महाराष्ट्र प्राथमिक शाळा, चांदूर बाजार, जि.अमरावती**
**संस्था संकेतांक** - (270702SC014)

**महाराष्ट्र शिक्षण समिती शिराळा** या व्यवस्थापनाच्या शाळेमध्ये खाली नमुद केलेल्या पदांसाठी आवश्यक शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता धारण करीत असलेल्या व पवित्र प्रणालीमध्ये नोंदणी केलेल्या पात्र उमेदवारांकडून ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.

**आरक्षण निहाय रिक्त पदांचा तपशील**

| अ. क्र. | प्रवर्ग | महिला | माजी सैनिक | अंश-कालीन | प्रकल्प-ग्रस्त | भुकंप-ग्रस्त | खेळाडू | समांतर आरक्षण व्यतिरिक्त (उर्वरित) पदे | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | एसईबीसी | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| | **एकुण** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **१** | **१** |

**शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता, विषय व पदनिहाय रिक्त पदांचा तपशिल** (मान्य दिनांक २३.०७.२०२६)

| अ. क्र. | माध्यम | पद | वेतनश्रेणी/ मानधन | अनुदान प्रकार | विषय | शिकविण्याचे माध्यम | आवश्यक शैक्षणिक पात्रता | आवश्यक व्यावसायिक पात्रता | TET/CTET | मुलाखत प्रकार | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. | Marathi | Under Graduate Teacher Std.(1-4/5) | Consolidated Pay - UGT (16000) | Aided | All Sub-jects | Marathi | HSC (Std. 12th) | Diploma | TET Paper 1/CTET Paper-1 | with Inter-view | 1 |
| | | | | | | | | | **Total** | - | **1** |

**सर्वसाधारण सुचना -**
१) अभियोग्यता व बुद्धिमत्ता चांचणी २०२५ (TAIT) प्रविष्ट झालेल्या उमेदवारापैकी ज्या उमेदवारांनी पवित्र प्रणाली (https://tait2025mahateacherrecruitment.org.in) या संकेतस्थळावर वैयक्तिक माहिती नोंदवून स्वप्रमाणित केलेली आहे असे उमेदवार जाहिरातीनुसार ऑनलाईन अर्ज करु शकतील.

**अध्यक्ष-**
**श्री.मनोज नि. देशमुख**
**महाराष्ट्र शिक्षण समिती शिराळा**
**जि.अमरावती**

## पवित्र प्रणालीद्वारे शिक्षक भरती जाहीरात

**शिक्षक अभियोग्यता व बुद्धिमत्ता चाचणी-२०२५** (मान्य दिनांक २०.०७.२०२६) (प्रसिध्दी दिनांक ०६.०८.२०२६)

**संस्थेचे नांव-** (270714SC014) Shri Shikshan Prasarak Education Society, Loni (Secondary/Higher Secondary - With Interview

**शैक्षणिक स्तर** - (Secondary/Higher Secondary

Shri Shikshan Prasarak Education Society, Loni या व्यवस्थापनाच्या शाळेमध्ये खाली नमुद केलेल्या पदांसाठी आवश्यक शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता धारण करीत असलेल्या व पवित्र प्रणालीमध्ये नोंदणी केलेल्या पात्र उमेदवारांकडून ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.

**आरक्षण निहाय रिक्त पदांचा तपशील**

| अ. क्र. | प्रवर्ग | महिला | माजी सैनिक | अंश-कालीन | प्रकल्प-ग्रस्त | भुकंप-ग्रस्त | खेळाडू | समांतर आरक्षण व्यतिरिक्त (उर्वरित) पदे | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | अनु.जाती | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| २. | भ. ज. (ब) | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| ३. | इ. मा. व | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |

**दिव्यांग (४ टक्के)**

| अस्थिव्यंग (१ टक्का) | कर्णबधिर (१ टक्का) | अंध/अल्पदृष्टी (१ टक्का) | Intellectual Disability and Multiple Disability (1%) ID | MD | एकुण |
|---|---|---|---|---|---|
| ० | ० | ० | 0 | 0 | ० |

**अनाथ (१ टक्के)**

| अनाथ संस्थात्मक | अनाथ संस्थाबाह्य |
|---|---|
| ० | ० |

| अ. क्र. | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ४. | **एकुण** | ० | ० | ० | ० | ० | ० | ३ | ३ |

**शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता, विषय व पदनिहाय रिक्त पदांचा तपशिल** (प्रसिध्दी दिनांक ०६.०८.२०२६) (मान्य दिनांक २०.०७.२०२६)

| अ. क्र. | माध्यम | पद | वेतनश्रेणी/ मानधन | अनुदान प्रकार | विषय | शिकविण्याचे माध्यम | आवश्यक शैक्षणिक पात्रता | आवश्यक व्यावसायिक पात्रता | TET/CTET | एकुण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. | Marathi | Under Graduate Teacher Std.(1-4/5) | Consolidated Pay - UGT (16000) | Aided | All Sub-jects | Marathi | HSC (Std. 12th) | Diploma | TET Paper 1/CTET Paper-1 | 1 |
| 2. | Marathi | Graduate Teacher Std (6-8) | Consolidated Pay - GT 6-8 (16000) | Aided | Mathe-matics | Marathi | Gradua -tion | Diploma/ Gradua-tion | TET Paper 2 (Maths/ Science) CTET Paper 2 (Maths/ Science) | 1 |
| 3. | Marathi | Graduate Teacher Std (6-8) | Consolidated Pay - GT 6-8 (16000) | Aided | Special Teacher (Work Educa-tion | Marathi | Gradua-tion | Diploma/ Gradua-tion | -- | 1 |
| | | | | | | | | Total | - | 3 |

**सर्वसाधारण सुचना -**

१) अभियोग्यता व बुद्धिमत्ता चांचणी २०२५ (TAIT) प्रविष्ट झालेल्या उमेदवारापैकी ज्या उमेदवारांनी पवित्र प्रणाली (https://tait2025mahateacherrecruitment.org.in) या संकेतस्थळावर वैयक्तिक माहिती नोंदवून स्वप्रमाणित केलेली आहे असे उमेदवार जाहिरातीनुसार ऑनलाईन अर्ज करु शकतील.
२) ईच्छुक व अर्हता प्राप्त करणारे उमेदवार ऑनलाईन जाहिरातीच्या अनुषंगाने पात्र असलेल्या पदासाठी पसंती क्रमांक नमुद करुन पोर्टलवर ऑनलाईन अर्ज करतील.
३) इ.१ ली ते इ.५ वी व इ.६ वी ते इ.८ वी या गटातील पदांसाठी अभियोग्यता व बुद्धिमत्ता चांचणी-२०२५ (TAIT) परीक्षेपुर्वी शिक्षक पात्रता परीक्षा (TET/CTET) उत्तीर्ण असणारे उमेदवारच अर्ज करु शकतील.
४) इ.६ वी ते इ.८ वी या गटातील इतिहास/भूगोल/सामाजिक शास्त्र या विषयांसाठी उमेदवार शिक्षक पात्रता परीक्षा (TET/CTET) सामाजिकशास्त्र विषय घेऊन TET-Paper 2/CTET-Paper-2 उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.
५) इ.६ वी ते इ.८ वी या गटातील विज्ञान/गणित-विज्ञान या विषयांसाठी उमेदवार शिक्षक पात्रता परीक्षा (TET/CTET) गणित-विज्ञान विषय घेऊन TET-Paper-2/CTET-Paper2 उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.
६) इ.६ वी ते इ.८ वी या गटातील भाषा या विषयांसाठी उमेदवार शिक्षक पात्रता परीक्षा (TET/CTET) गणित-विज्ञान किंवा सामाजिक शास्त्र यापैकी कोणताही विषय घेऊन TET-Paper2/CTET-Paper-2 उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.
७) इ.१ ली ते ८ वी/इ.९ वी ते १२ वी/अध्यापक विद्यालय, या गटातील पदांसाठी अर्ज करणारा उमेदवार अभियोग्यता व बुद्धिमत्ता चांचणी-२०२५ ((TAIT)) या चाचणीस प्रविष्ट असणे आवश्यक आहे.
८) शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता व अध्यापनाचे विषय, वयोमर्यादा, आरक्षण, अन्य पात्रता व आवश्यक कागदपत्रे इत्यादीसाठी सर्वसाधारण सुचना सविस्तर तपशिलासह https://tait2025.mahateacherrecruitment.org.in या संकेतस्थळावर पवित्र प्रणालीमध्ये **उमेदवारांसाठी सर्वसाधारण सूचना** या शिर्षाखाली उपलब्ध आहेत. सदर सुचना व सुचनामध्ये नमुद आवश्यक शासन आवश्यक शासन निर्णय यांचे अवलोकन करुन स्वतःची खात्री करुनच ऑनलाईन अर्ज करावेत.
९) व्यवस्थापनाने जाहिरातीत दर्शविलेल्या एकुण पदांमध्ये दिव्यांग आरक्षणाच्या पदांचा समावेश आहे.
१०) व्यवस्थापनाने जाहिरातीत दर्शविलेल्या एकुण पदांमध्ये अनाथ आरक्षणाच्या पदांचा समावेश आहे.
११) व्यवस्थापनाच्या जाहिरातीत दर्शविलेल्या आरक्षणामध्ये व पदसंख्येमध्ये बदल होण्याची शक्यता आहे.
१२) उच्च माध्यमिक/कनिष्ठ महाविद्यालयांच्या अध्यापनाच्या दोन विषयांसाठी एक पूर्णकालीन पदाची जाहिरात असल्यास, या पदासाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारांची शैक्षणिक अर्हता दोन्ही विषयांमध्ये पदव्युत्तर पदवी (किमान द्वितीय श्रेणीमध्ये) उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.
१३) जिल्हा परिषद शाळांमध्ये नव्याने नियुक्त होणाऱ्या शिक्षकांना शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग दिनांक २१.०६.२०२३ मधील तरतुदीनुसार जिल्हा बदलीचा हक्क असणार नाही, याचीउमेदवारांनी नोंद घ्यावी.
१४) महाराष्ट्र राज्यातील सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गाकरीता आरक्षण अधिनियम दि.२६.०२.२०२४ अनुसार सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गाकरीता आरक्षणाची तरतूद विहितकरण्यात आली आहे. या आरक्षणाची कार्यपध्दती सदर आरक्षणाच्या अनुषंगाने मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल याचिका क.३४६८/२०२४ तसेच त्या अनुषंगिक इतर याचिकांवरील अंतिम निर्णयाच्या अधीन राहील.

**मुख्याध्यापक,** श्रीमती रामप्यारीबाई चांडक विद्यालय, लोणी, ता.वरुड, जि.अमरावती
**अध्यक्ष** शिक्षण प्रसारक मंडळ, लोणी ता.वरुड, जि.अमरावती

# वनतलावात रात्री 'मुरूम माफिया'चा धुमाकूळ

## परवानगी-रॉयल्टीचा पत्ता नाही; दोन डम्पर पोलिसांच्या ताब्यात, पोकलँडही अडकले

**आष्टी शहीद/जनमाध्यम**

आष्टी उपसा सिंचन योजनेच्या उद्घाटनाचा जल्लोष सुरू असतानाच थार येथे रात्रीच्या अंधारात वनतलावातून गौण खनिजाच्या कथित बेकायदा उत्खननाचा प्रकार उघडकीस आला. शासनाची परवानगी आणि रॉयल्टी नसतानाही मुरूम काढून डम्परद्वारे वाहतूक सुरू असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला. सुमारे दहा डम्पर मुरूम वाहत असल्याची माहिती समोर येताच ग्रामस्थांनी धाव घेत वाहतूक रोखली. अखेर आष्टी पोलिसांनी दोन डम्पर आणि पोकलँड ताब्यात घेतल्याने खळबळ उडाली.

८ ऑगस्ट रोजी उपसा सिंचन योजनेचे उद्घाटन पार पडल्यानंतर रात्री सुमारे आठ वाजता थार वनतलावातून मुरूम भरलेले डम्पर ये-जा करत असल्याचे ग्रामस्थांच्या निदर्शनास आले. थार ग्रामपंचायतीचे उपसरपंच संदीप परतेती, माजी ग्रामपंचायत सदस्य तसेच प्रफुल उईके, मंगेश उईके यांच्यासह ग्रामस्थांनी घटनास्थळी धाव घेतली.

रॉयल्टी कुठे? परवानगी कुठे? वनतलावातून नेमके कोणाच्या परवानगीने उत्खनन सुरू होते गौण खनिजाची रॉयल्टी भरली होती का? उत्खननासाठी संबंधित विभागाची मंजुरी घेतली होती का या प्रश्नांनी आता महसूल व वन विभागाच्या कार्यपद्धतीवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

उपसा सिंचन योजनेचे काम करणाऱ्या कंत्राटदाराकडून मुरूम काढला जात असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला. विरोध होताच वाहतूक थांबविण्यात आली. विशेष म्हणजे डम्पर ग्रामपंचायत कार्यालय परिसरातून जात असताना थार ग्रामपंचायतीची पिण्याच्या पाण्याची पाइपलाइन फुटल्याचा आरोप आहे. त्यामुळे गावच्या पाणीपुरवठ्यावर संकट ओढवण्याची शक्यता निर्माण झाली.




**अधिकारी म्हणे, हे आमचे काम नाही**

ग्रामस्थांनी संबंधित अधिकाऱ्यांना दूरध्वनी करून कारवाईची मागणी केली. मात्र काही अधिकाऱ्यांनी 'हे आमचे काम नाही' अशी भूमिका घेतल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला. तलाठी बम्बलकर यांच्याशी संपर्क करण्याचा प्रयत्न झाला; मात्र प्रतिसाद मिळाला नसल्याचे ग्रामस्थांनी सांगितले. अखेर पोलिसांना पाचारण करण्यात आले. आष्टी पोलिसांनी घटनास्थळी पोहोचून परिस्थिती नियंत्रणात आणली. MH12YQ1836 आणि MH12YQ1837 क्रमांकाचे दोन डम्पर तसेच SY215C9LC क्रमांकाचे पोकलँड पोलिसांनी ताब्यात घेतले. उत्खननासाठी वापरलेले पोकलँड थार गावातच थांबविण्यात आले. या कारवाईपूर्वी सुमारे दोन तास ग्रामस्थांचा आक्रोश सुरू होता.

**वनतलावाच्या उत्खननाला हिरवा कंदील कोणी दिला**

रात्रीच्या अंधारात वनतलावातून गौण खनिज काढले जात असताना संबंधित विभाग झोपेत होता का रॉयल्टी आणि परवानगी नसल्यास एवढ्या मोठ्या प्रमाणात डम्परची वाहतूक कोणाच्या आशीर्वादाने सुरू होती ग्रामपंचायतीची पाणीपुरवठ्याची पाइपलाइन फुटल्यानंतरही प्रशासनाने तातडीने धाव का घेतली नाही असे प्रश्न ग्रामस्थ उपस्थित करीत आहेत.

विना परवानगी गौण खनिज उत्खनन व वाहतूक करणाऱ्यांवर कठोर दंडात्मक कारवाई करावी, तसेच संबंधित डम्पर मालकांविरुद्ध गुन्हा दाखल करावा, अशी मागणी उपसरपंच संदीप परतेती यांनी तक्रारीद्वारे केली आहे.

आता वन विभाग, महसूल विभाग आणि प्रशासन या कथित मुरूम उत्खननाची चौकशी करून दोषींवर कारवाई करणार का, की हा प्रकारही कागदोपत्रीच संपणार याकडे थार ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.

### अमली पदार्थांविरोधात पोलिसांचा ऑलआऊट' मोर्चा

**ड्रग्स फ्री वर्धा अभियानाला वेग; तस्करांवर MCOCA, PIT NDPSची कारवाई**

**वर्धा/जनमाध्यम**

जिल्ह्यात अमली पदार्थांची विक्री, तस्करी आणि सेवनाला आळा घालण्यासाठी वर्धा पोलिसांनी व्यापक मोहीम हाती घेतली आहे.'ड्रग्स फ्री वर्धा' अभियानांतर्गत पोलिसांकडून संशयित ठिकाणांची तपासणी,नाकाबंदी, निर्जन स्थळांची पाहणी तसेच गोपनीय माहितीच्या आधारे कारवायांना वेग देण्यात आला आहे.

७ ऑगस्ट रोजी पोलीस अधीक्षक कार्यालयात जिल्हातील सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी, ठाणेदार आणि अमली पदार्थविरोधी पथकांची व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे बैठक घेण्यात आली. १ जानेवारी ते ३१ जुलैदरम्यान करण्यात आलेल्या कारवायांचा आढावा घेत अमली पदार्थांच्या गुन्ह्यात सहभागी आरोपींवर कठोर प्रतिबंधात्मक कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले. अमली पदार्थांची खरेदी-विक्री करणाऱ्या टोळ्यांविरुद्ध कठोर पावले उचलण्यात आली असून हिंगणघाट पोलिसांनी एका टोळीतील सहा आरोपींवर मकोका अंतर्गत कारवाई केली आहे. तसेच अमली पदार्थ गुन्हेगारांविरुद्ध PIT NDPS कायद्यांतर्गतही कारवाई करण्यात आली आहे.युवकांना व्यसनाच्या विळख्यात जाण्यापासून रोखण्यासाठी शाळा, महाविद्यालये आणि गर्दीच्या ठिकाणी जनजागृती कार्यक्रम घेतले जात आहेत. या उपक्रमात वैद्यकीय अधिकारी, मानसोपचारतज्ञ, व्यसनमुक्ती केंद्रे आणि सामाजिक संस्थांचा सहभाग घेतला जात आहे.

अमली पदार्थांची विक्री, साठवणूक, वाहतूक किंवा सेवनाची माहिती मिळाल्यास नागरिकांनी तत्काळ पोलिसांना कळवावे. माहितीदाराची ओळख गोपनीय ठेवण्यात येईल, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.


# शाळेच्या दारातच पट्टेदार वाघाची दहशत

## सालई कला येथे दिवसाढवळ्या वाघाचा वावर; शेतकऱ्याची थरारक भेट, चिमुकल्यांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर

**सेलू/जनमाध्यम**

तालुक्यातील हिंगणी परिसरालगतच्या सालई (कला) गावात पट्टेदार वाघाच्या वावरामुळे ग्रामस्थ आणि शेतकऱ्यांमध्ये प्रचंड भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. गावातील इंदिरा हायस्कूल तसेच शाळा परिसराच्या आसपास वाघाचा वावर असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे असून, दिवसाढवळ्या शेतशिवार आणि वस्तीच्या दिशेने वाघ फिरत असल्याने नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

सालई परिसरात गेल्या काही दिवसांपासून वन्यप्राण्यांचा उपद्रव वाढल्याचे ग्रामस्थ सांगत आहेत. त्यातच पट्टेदार वाघाचा वावर आढळून येत असल्याने शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. शेतात काम करण्यासाठी जाणाऱ्या नागरिकांना जीव मुठीत घेऊन वावरावे लागत आहे. विशेष म्हणजे, सालई येथील शेतकरी उमेशराव चावरे यांचा वाघाशी थेट सामना झाल्याची माहिती आहे. सुदैवाने या प्रसंगात कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र, या थरारक घटनेनंतर परिसरातील शेतकऱ्यांमध्ये भीती आणखी वाढली आहे.



**चिमुकल्यांच्या सुरक्षेचा प्रश्न**

इंदिरा हायस्कूल आणि परिसरातील शाळेजवळ वाघाचा वावर असल्याच्या माहितीनंतर पालकांमध्येही चिंता व्यक्त होत आहे. दररोज शाळेत ये-जा करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या सुरक्षेबाबत पालक धास्तावले आहेत. वाघाने वस्तीच्या दिशेने मोर्चा वळविल्यास मोठा अनर्थ होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

**वनविभागाने गस्त वाढविण्याची मागणी**

दरम्यान, वनविभागाने या परिसरात तातडीने गस्त वाढवावी, वाघाच्या हालचालींवर लक्ष ठेवण्यासाठी ट्रॅप कॅमेरे बसवावेत आणि आवश्यक त्या ठिकाणी पिंजरा लावावा, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे. तसेच शेतकरी आणि नागरिकांना वन्यप्राण्यांपासून सुरक्षित राहण्यासाठी आवश्यक मार्गदर्शन व जनजागृती करावी, अशी मागणी आहे. वाघाचा वावर नेमका कोणत्या भागात आहे, त्याच्या हालचाली किती प्रमाणात आहेत आणि तो एकच वाघ आहे की अन्य वन्यप्राणी, याबाबत वनविभागाने तातडीने पाहणी करून वस्तुस्थिती स्पष्ट करणे गरजेचे आहे. संभाव्य धोका लक्षात घेता प्रशासनाने विलंब न करता उपाययोजना कराव्यात, अशी अपेक्षा सालई परिसरातील नागरिक व्यक्त करीत आहेत.

### संक्षिप्त

**पुतण्याने काकाची बनावट स्वाक्षरी केली**

**आर्वी** - शेतीवरून न्यायालयीन वाद सुरू असतानाही पुतण्याने काकाची बनावट स्वाक्षरी करून शेतात वीजपुरवठा घेण्याचा प्रयत्न केल्याचा प्रकार देऊरवाडा रस्त्यावर उघडकीस आला. मोहनलाल मालुराम अग्रवाल (७४) आणि त्यांचा पुतण्या प्रशांत अग्रवाल यांच्यात शेतीवरून वाद सुरू आहे.या प्रकरणात न्यायालयातही दावा सुरू असल्याचे सांगण्यात आले. दरम्यान, प्रशांतने मोहनलाल यांच्या नावाची बनावट स्वाक्षरी केल्याचे समोर आले. या स्वाक्षरीच्या आधारे शेतात वीजपुरवठा मिळण्यासाठी वीजवितरण कंपनीकडे मागणी केली. कागदपत्रांची पडताळणी केल्यानंतर हा प्रकार मोहनलाल यांच्या निदर्शनास आला.त्यांनी याबाबत पोलिसांकडे तक्रार दाखल केली. तक्रारीवरून पोलिसांनी प्रशांत अग्रवाल याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला असून प्रकरणाचा तपास सुरू आहे.

**दोन ट्रकची समोरासमोर धडक**

**पुलगाव**-अमरावती मार्गावरील एका दुकानासमोर दोन ट्रकची समोरासमोर जोरदार धडक होऊन झालेल्या अपघातात एक चालक जखमी झाला. ही घटना शुक्रवारी दुपारी सुमारे २.४५ वाजताच्या सुमारास घडली.या अपघातामुळे मार्गावरील वाहतुकीचा काही काळ खोळंबा झाला. मिळालेल्या माहितीनुसार, एमएच २७ डीटी ४४४६ आणि एमएच ४० सीडी ४८३४ क्रमांकाचे दोन ट्रक अमरावती मार्गाकडून जात होते. दुकानासमोर दोन्ही वाहनांची अचानक समोरासमोर धडक झाली. या धडकेत एमएच २७ डीटी ४४४६ क्रमांकाच्या ट्रकचा चालक गौरव गजानन गुल्हाने (रा. धामणगाव रेल्वे) जखमी झाला. त्याच्यावर उपचार करण्यात आले. दुसऱ्या ट्रकचा चालक सुरेश श्रीधर शेंद्रे (रा. सोराती, जि. यवतमाळ) हा या अपघातात सुखरूप बचावला. धडकेची तीव्रता मोठी असल्याने दोन्ही ट्रकचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. अपघातानंतर वाहनांचा रस्त्यावरच खोळंबा झाल्याने काही काळ वाहतूक विस्कळीत झाली. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली आणि रस्त्यावरील वाहतूक सुरळीत केली. अपघात नेमका कोणत्या कारणामुळे झाला, याबाबत अद्याप स्पष्टता नाही. मंगरूळ दस्तगीर पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे.

**बसला दुचाकीची मागून धडक**

**वर्धा**-भरधाव दुचाकीने एसटी बसला मागून धडक दिल्याने दुचाकीस्वार जखमी झाल्याची घटना सेवाग्राम बसस्थानकासमोर घडली. कवडू महादेव मसकोल्हे (४१) हे एमएच ३२-क्यू ६२०२ क्रमांकाच्या एसटी बस रस्त्याच्या कडेला उभी करून प्रवासी उतरवत होते. त्याचवेळी अभय नामदेव भोयर (रा. करंजी, भोगे) हा एमएच ३२-एई ३२८२ क्रमांकाची दुचाकी भरधाव वेगाने चालवत आला. त्याचे दुचाकीवरील नियंत्रण सुटल्याने त्याने बसला मागून जोरदार धडक दिली.

## अण्णाभाऊंच्या साहित्यातून समता-बंधुतेचा जागर

**वर्धा येथे बहुजन रयत परिषदेतर्फे १०६ वी जयंती उत्साहात**

**वर्धा/जनमाध्यम**

साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या १०६ व्या जयंतीनिमित्त बहुजन रयत परिषद वर्धातर्फे अण्णाभाऊ साठे चौक, नगर परिषद सिव्हिल लाईन्स येथे विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. साहित्यप्रेमी, लेखक, वाचक व समाजहितचिंतकांच्या उपस्थितीत जयंती उत्साहात साजरी झाली.

कार्यक्रमाचे उद्घाटन नगराध्यक्ष सुधीर पांगुळ यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी बहुजन रयत परिषदेचे विदर्भ तथा जिल्हाध्यक्ष अजय डोंगरे होते. प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा पोलीस अधीक्षक सौरभकुमार अग्रवाल, मुख्याधिकारी विजय देशमुख, राजेंद्र निखाडे, प्रा. डॉ. अशोक चोपडे, इमरान राही,



नीरज त्रिपाठी, प्रविण धोपटे, अजित शेख, भिमराव डोंगरे, हिरा खडसे आदी उपस्थित होते.

भिमराव डोंगरे यांनी समाजाची दशा व दिशा यावर विचार मांडले. इमरान राही यांनी समाज आणि साहित्य यांचा अतूट संबंध स्पष्ट करत एकजुटीचा संदेश दिला. प्रा. डॉ. चोपडे यांनी अण्णाभाऊंच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकला.

अध्यक्षीय भाषणात अजय डोंगरे यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यातून समता, बंधुता व मानवतेचा संदेश मिळतो, असे सांगितले. विषमतेविरुद्ध विद्रोही साहित्याची भूमिका मांडणारे अण्णाभाऊ हे मराठी भाषेचे खरे मानकरी असल्याचे त्यांनी नमूद केले. यावेळी नाट्य दिग्दर्शक राजू बावणे यांना साहित्यरत्न पुरस्कार तर आयुष सुभाष तिळले याला गुणवंत विद्यार्थी म्हणून सन्मानित करण्यात आले. विशाल आमटे व संचाचा प्रबोधनात्मक गीतांचा कार्यक्रम झाला.

**जुन्या वादाचा वचपा; दुचाकीस्वारांवर चाकू, रॉडने हल्ला**

## दोघे गंभीर जखमी, तिघांविरुद्ध गुन्हा

**पुलगाव/जनमाध्यम**

जुन्या वादाचा राग मनात धरून दुचाकीवरून जाणाऱ्या दोघांना रस्त्यात अडवत चाकू आणि लोखंडी रॉडने हल्ला केल्याची धक्कादायक घटना पंचधारा रोडवरील इदगाहखाली हरिरामनगरकडे जाणाऱ्या टी-पॉईंटजवळ घडली. या हल्ल्यात इमरान उर्फ राजा शेख आणि रोशन भोंगे हे दोघे गंभीर जखमी झाले असून, त्यांच्यावर सावंगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

इमरान आणि रोशन दुचाकीवरून जात असताना प्रथमेश ऐतबान, आयुष ऐतबान आणि दुष्यंत मडले यांनी त्यांना अडविले. जुन्या वादाच्या कारणावरून त्यांच्यात वाद झाला. त्यानंतर तिघांनी दोघांवर हल्ला केला. इमरानच्या पोटावर चाकूने वार करण्यात आला, तर रोशनच्या डोक्यावर लोखंडी रॉडने प्रहार करण्यात आला. अचानक झालेल्या हल्ल्याने परिसरात काही काळ खळबळ उडाली.

या घटनेत दोघेही गंभीर जखमी झाल्याने त्यांना उपचारासाठी सावंगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. याप्रकरणी आयुष गुलालकर यांच्या तक्रारीवरून पुलगाव पोलिसांनी प्रथमेश ऐतबान,आयुष ऐतबान आणि दुष्यंत मडले यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. घटनेमागील नेमका वाद आणि हल्ल्याचे कारण याबाबत पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे.

**गळफास घेऊन आत्महत्या**

**वर्धा**-मानसिक तणावात असलेल्या २८ वर्षीय युवकाने राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना बोरगाव (मेघे) परिसरात उघडकीस आली.अनिकेत अरविंद गेडाम असे मृत युवकाचे नाव आहे.अनिकेतला दारूचे व्यसन होते. मागील काही दिवसांपासून तो मानसिक तणावात असल्याची माहिती आहे. दरम्यान, घरातील इतर सदस्य बाहेर गेले असताना त्याने लाकडी मयालीला दोरी बांधून गळफास घेतला.काही वेळाने कुटुंबीय घरी परतल्यानंतर हा प्रकार त्यांच्या निदर्शनास आला. त्यांनी तातडीने घटनेची माहिती पोलिसांना दिली.

**एकास मारहाण**

**हिंगणघाट**- कव्वाली म्हणण्यास नकार दिल्याच्या कारणावरून दोघांनी एका व्यक्तीला मारहाण करून जखमी केल्याची घटना संत तुकडोजी वॉर्ड परिसरात घडली. महेश चंद्रप्रकाश शेंद्रे (४३) यांना नितीन तडस याने 'एक कव्वाली म्हणून दाखव', असे सांगितले.

## सावधगिरी बाळगा, सुरक्षित रहा'

**विद्यार्थ्यांना वाहतूक नियम, अमली पदार्थ व सायबर गुन्ह्यांबाबत मार्गदर्शन**

**वर्धा/जनमाध्यम**

न्यू इंग्लिश कनिष्ठ महाविद्यालय, वर्धा येथे विद्यार्थ्यांसाठी वाहतूक सुरक्षा, अमली पदार्थांचे दुष्परिणाम, बाल संरक्षण, पॉक्सो कायदा आणि सायबर गुन्हे या विषयांवर एकदिवसीय जनजागृती कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेत सुमारे ३५० ते ३७५ विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला.



वाहतूक नियंत्रण शाखेचे सहाय्यक फौजदार रियाज खान यांनी विद्यार्थ्यांना वाहतुकीच्या नियमांचे महत्त्व पटवून देताना, सावधगिरी बाळगा, सुरक्षित रहा हा मंत्र अंगीकारण्याचे आवाहन केले. हेल्मेटचा वापर करणे, ट्रिपल सीट टाळणे, मद्यप्राशन करून वाहन न चालवणे, वाहन चालविताना मोबाईलचा वापर न करणे, स्टंटबाजी टाळणे, विना परवाना वाहन न चालवणे, झेब्रा क्रॉसिंग व पादचारी मार्गाचा वापर करणे अशा नियमांचे पालन केल्यास अनेक अपघात टाळता येतात, असे त्यांनी सांगितले. यावेळी त्यांनी अमली पदार्थांच्या वाढत्या विळख्याबाबतही विद्यार्थ्यांना सावध केले. गुटखा, तंबाखू, सिगारेट यांसारख्या व्यसनांपासून सुरुवात होऊन गांजा, चरस, एमडीसारख्या घातक अमली पदार्थांच्या आहारी जाण्याचा धोका वाढतो. त्यामुळे शारीरिक, मानसिक आणि आर्थिक नुकसान होऊन आयुष्य उद्ध्वस्त होऊ शकते, असे त्यांनी स्पष्ट केले.

चाइल्डलाइन समन्वय अधिकारी आशिष मोहळ यांनी बालकांवरील लैंगिक अत्याचार, अनैतिक संबंध, मानसिक छळ, पॉक्सो कायदा आणि बालहक्क याविषयी माहिती दिली. अडचणीच्या प्रसंगी चाइल्ड हेल्पलाइन क्रमांक १०९८ वर मोफत संपर्क साधून मदत घेण्याचे आवाहन त्यांनी केले

दामिनी पथकाच्या सहाय्यक पोलीस निरीक्षक माधुरी वाघाडे यांनी फेसबुक, इन्स्टाग्रामसारख्या सामाजिक माध्यमांद्वारे होणारी फसवणूक, सायबर गुन्हे, मुलींचा छळ आणि महाविद्यालय परिसरातील गैरप्रकारांबाबत विद्यार्थ्यांना सतर्क राहण्याचे आवाहन केले. कोणतीही संशयास्पद घटना घडल्यास पोलीस हेल्पलाइन ११२ वर तातडीने संपर्क साधावा, असेही त्यांनी सांगितले. वर्धा जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल अप्पर पोलीस अधीक्षक सदाशिव वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक विजयकुमार घुले वाहतूक नियंत्रण शाखा यांच्या आदेशाने कार्यशाळा घेण्यात आली, कार्यक्रमाला महाविद्यालयाच्या प्राचार्या पुष्पा फरताळे, प्राध्यापक गिरीश काळे, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन वंदना जोगे यांनी केले.

**नावात बदल**

माझे पूर्वी ZEENOFER FIRDOUS SAYYED AFZAL असे नाव होते. माझ्या आधार व पॅन कार्ड वरील JINOFAR AFASAR MOHAMMAD नाव नमूद असून, या नावाने ओळखले जात आहे.
पत्ता :-वॉर्ड नं १३ हनुमान नगर बोरगाव मेघे जिल्हा वर्धा ४४२००१

**नावात बदल**

माझे पासपोर्ट नंबर L1805859 वरील माझे MOHAMMAD AZHAR ABDUL RASHID SHEIKH असे नाव होते. माझ्या पॅन कार्ड व बँक पासबुक वरील MOHAMMED AZHAR ABDUL RASHID नाव नमूद असून, या नावाने ओळखले जात आहे.
पत्ता :-हनुमान नगर वॉर्ड नं १३ बोरगाव मेघे वर्धा ४४२००१

**नावात बदल**

माझे पूर्वी NAUSHEEN AKHTAR SHEIKH AHMAD असे नाव होते. माझ्या आधार व पॅन कार्ड वरील MOHAMMAD NAUSHEN MOHAMMAD ATHAR नाव नमूद असून, या नावाने ओळखले जात आहे.
पत्ता: हनुमान नगर बोरगाव मेघे जिल्हा वर्धा ४४२००१

**नावात बदल**

माझे पूर्वी MOHMMAD ATTHER MOHMMAD RASHID असे नाव होते. माझ्या आधार व पॅन कार्ड वरील MOHAMMAD ATHAR ABDUL RASHID नाव नमूद असून, या नावाने ओळखले जात आहे.
पत्ता :- वॉर्ड नं २९ हनुमान नगर बोरगाव मेघे जिल्हा वर्धा ४४२००१

**नावात बदल**

माझे पूर्वी SAJILA SYED SALIM असे नाव होते. माझ्या आधार व पॅन कार्ड वरील MOHAMMED SAJILA MOHAMMED AZHAR नाव नमूद असून, या नावाने ओळखले जात आहे.
पत्ता :- बोरगाव मेघे जिल्हा वर्धा ४४२००१

**नावात बदल**

माझे पासपोर्ट नंबर N8375991 वरील माझे MOHAMMAD HASIBUR RAHMAN असे नाव होते. माझ्या पॅन कार्ड व बँक पासबुक वरील MOHAMMAD HASIBURRAHMAN JAMSED ALI नाव नमूद असून, या नावाने ओळखले जात आहे.
पत्ता :-हनुमान नगर वॉर्ड नं २९ बोरगाव मेघे वर्धा ४४२००१

**नावात बदल**

माझे पूर्वी MOHM JENOFAR MOHM APSAR असे नाव होते. माझ्या आधार व पॅन कार्ड वरील JINOFAR AFASAR MOHAMMAD नाव नमूद असून, या नावाने ओळखले जात आहे.
पत्ता :-वॉर्ड नं १३ हनुमान नगर बोरगाव मेघे जिल्हा वर्धा ४४२००१

**नावात बदल**

माझे पासपोर्ट नंबर J9292183 वरील माझे MOHAMMAD APSAR MOHAMMAD RASHID असे नाव होते. माझ्या पॅन कार्ड व बँक पासबुक वरील MOHAMMAD AFSAR ABDUL RASHID नाव नमूद असून, या नावाने ओळखले जात आहे.
पत्ता :-हनुमान नगर वॉर्ड नं २ बोरगाव मेघे वर्धा ४४२००१

जनमाध्यम न्युज अँड पब्लिकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

संपादक-प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

वर्धा आवृत्ती वर्ष-१४ अंक २५४
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३

मुख्य कार्यालय- अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

## संक्षिप्त



### शेतीच्या मशागतीला वेग...

पावसाने विश्रांती घेतल्याने रावळगाव वाढोणा शिवारातील शेतकऱ्यांनी सोयाबीन व तूर पिकांमध्ये डवरणीच्या कामाला वेग दिला आहे. डवरणी करताना टिपलेले दृश्य.



### फवारणी करताना...

मजूरटंचाईच्या पार्श्वभूमीवर पावसाने उघडीप दिल्याने शेतकऱ्यांनी शेतीकामांना वेग दिला आहे. शेतातील तण नियंत्रणासाठी शेतकरी तणनाशक औषधांची फवारणी करताना.



### शेतात निंदण करताना शेतमजूर...

पिकांसोबतच शेतात तणही मोठ्या प्रमाणात वाढल्याने पिकांच्या वाढीवर परिणाम होत आहे. त्यामुळे पिकांची तणापासून मुक्तता करण्यासाठी शेतमजूर शेतात निंदण-खुरपणी करताना.

**सर्व छायाचित्रे : किशोर मोकलकर,** आसेगाव पूर्णा

## आदिवासी दिनानिमित्त अमरावतीत भव्य शोभायात्रा

**अमरावती-** जागतिक आदिवासी दिनानिमित्त आदिवासी बांधवांच्या वतीने शहरात भव्य शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले. श्री संत गाडगेबाबा समाधीस्थळापासून सुरू झालेली ही शोभायात्रा पंचवटी, इर्विन चौक मार्गे गर्ल्स हायस्कूल चौकात पोहोचली. याठिकाणी शोभायात्रेचा समारोप करण्यात आला.शोभायात्रेत आदिवासी संस्कृती आणि पारंपरिक कला यांचे विशेष दर्शन घडले. आदिवासी बांधवांनी पारंपरिक वेशभूषेत सहभागी होत विविध पारंपरिक नृत्यांचे सादरीकरण केले. यामुळे मार्गावरील वातावरण आदिवासी संस्कृतीच्या रंगात रंगून गेले.शोभायात्रेत भगवान बिरसा मुंडा, राणी दुर्गावती, विठोबा-रुक्माई, शंकर-पार्वती, हनुमानजी आदींच्या आकर्षक झांक्यांचा समावेश होता. विविध झांक्या आणि पारंपरिक नृत्यांनी नागरिकांचे लक्ष वेधून घेतले.इरविन चौक ते गर्ल्स हायस्कूल चौक या मार्गावर विविध प्रकारच्या पारंपरिक नृत्यांचे सादरीकरण करण्यात आले. आदिवासी संस्कृती, परंपरा आणि इतिहासाची ओळख करून देणाऱ्या या शोभायात्रेला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.









## चिखलदरा मार्गावर वाहन तपासणी अभियान



**अचलपूर-** शनिवार आणि रविवार या सुट्टीच्या दोन दिवसांत चिखलदऱ्याकडे जाणाऱ्या पर्यटकांच्या वाहनांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढते. या पार्श्वभूमीवर अचलपूर-परतवाडा स्वतंत्र वाहतूक नियंत्रण शाखेतर्फे चिखलदरा स्टॉप परिसरात वाहन तपासणी अभियान राबविण्यात येत आहे.

चिखलदरा येथे पावसाळ्यात पर्यटकांची मोठी गर्दी होत असल्याने वाहतूक कोंडीसह अपघातांच्या घटनांमध्येही वाढ होते. त्यामुळे वाहनांचा वेग नियंत्रित ठेवावा, धोकादायक वळणांवर वाहने सावकाश चालवावीत, मद्यपान अथवा अन्य व्यसन करून वाहन चालवू नये, याबाबत वाहनचालकांना मार्गदर्शन करून जनजागृती केली जात आहे. तसेच दुचाकीस्वारांनी हेल्मेटचा वापर करावा, असे आवाहनही वाहतूक शाखेकडून करण्यात येत आहे. पर्यटकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने राबविण्यात येत असलेल्या या अभियानामुळे वाहनचालकांमध्ये सुरक्षिततेबाबत जागरूकता निर्माण होत आहे.चिखलदरा मार्गावरील वाढती वाहनांची गर्दी आणि अपघातांची शक्यता लक्षात घेता, अचलपूर-परतवाडा स्वतंत्र वाहतूक नियंत्रण शाखेने वाहन तपासणी अभियान यापुढेही सातत्याने सुरू ठेवावे, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

## पर्यावरण संवर्धनासाठी वृक्षारोपणाची गरज-आ. प्रविण पोटे

**अमरावती/का.प्र.**

भविष्यातील पिढीला स्वच्छ हवा, निरोगी पर्यावरण आणि सुरक्षित भविष्य देण्यासाठी प्रत्येक नागरिकाने किमान एक झाड लावून त्याचे संगोपन केले पाहिजे, असे आवाहन आ.प्रविण पोटे पाटील यांनी केले. अमरावती येथील आर्ट ऑफ लिविंग आश्रम, भाणखेडा येथे आर्ट ऑफ लिविंग परिवार आणि क्रेडाई ग्रुप यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित भव्य वृक्षारोपण कार्यक्रमात आ. प्रविण पोटे पाटील यांनी उपस्थित राहून वृक्षारोपण केले. यावेळी पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व अधोरेखित करत त्यांनी नागरिकांनी वृक्षारोपणासोबतच लावलेल्या झाडांचे संगोपन करण्याची गरज व्यक्त केली. 'झाडे ही केवळ निसर्गाचे सौंदर्य वाढवत नाहीत, तर ती मानवी जीवनाचा मुख्य आधार आहेत. वाढते प्रदूषण, बदलते हवामान आणि पर्यावरणीय असमतोलाच्या पार्श्वभूमीवर वृक्षसंवर्धन ही काळाची



गरज आहे. प्रत्येकाने किमान एक झाड लावून ते जगविण्याचा संकल्प करावा,' असे आ. प्रविण पोटे पाटील यांनी सांगितले. त्याचप्रमाणे रहाटगाव येथील आरोग्यसेवा कॉलनीत (स्वामी समर्थ मंदिराजवळ) नगरसेवक विनोदजी तनवैस यांच्या माध्यमातून आयोजित वृक्षारोपण कार्यक्रमास आ. प्रविण पोटे पाटील यांनी प्रमुख उपस्थिती लावून वृक्षारोपण केले. या दोन्ही कार्यक्रमांना मान्यवर, आयोजक, कार्यकर्ते तसेच परिसरातील नागरिकांची उपस्थिती होती. 'हरित अमरावती, सुंदर अमरावती' या संकल्पनेतून अधिकाधिक वृक्षलागवड आणि वृक्षसंवर्धन करण्याचा संदेश यावेळी देण्यात आला.

## बापूसाहेब देशमुख त्यांचे निधन



**चांदूरबाजार-** निष्काम कर्मयोगी श्री संत गाडगेबाबांच्या सेवा, त्याग आणि निष्काम कर्मयोगाचा, वसा व वारसा आयुष्याच्या शेवटच्या श्वासापर्यंत जपणारे. श्री गाडगे महाराज मिशन मुंबईचे उपाध्यक्ष तथा श्री गाडगे महाराज ट्रस्टचे प्रमुख विश्वस्त. संत गाडगे बाबांच्या संकल्पनेतील, उजाड नागरवाडीच्या इंद्रभुवनाचे शिल्पकार. सेवाव्रती स्व. बापूसाहेब देशमुख यांचे, शनिवारी मध्यरात्री नंतर, २.३० सुमारास निधन झाले. मृत्यू समयी त्यांचे वय ७६ वर्षांचे होते. उजाड नागरवाडीचे गाडगेबाबांच्या स्वप्नातील नंदनवन करणारा, एक महान कर्मयोगी हरवला आहे.त्यांनी आपला अंतीम श्वास ही,नागरवाडी येथे घेतला.बापूसाहेबांचे संपूर्ण आयुष्य म्हणजे सेवा, त्याग, समर्पण आणि मानवतेचा अखंड ध्यास होते. आयुष्याच्या शेवटच्या क्षणापर्यंत संत गाडगेबाबांच्या विचारांशी आणि सेवा कार्याशी, निष्ठावंत राहिलेले हे महान सेवाव्रती काल श्री संत गाडगेबाबांच्या चरणी विसावले. त्यांच्या जाण्याने गाडगेबाबांच्या सेवाकार्याची एक दीपज्योत जणू विझली आहे. त्यांच्या निधनाने निर्माण झालेली पोकळी कधीही भरून निघणार नाही.त्यांचे कार्य, त्यांचे संस्कार, त्यांची सेवावृत्ती आणि मानवतेसाठी त्यांनी केलेला त्याग हा पुढील पिढ्यांसाठी सदैव प्रेरणादायी राहील. स्व.बापूसाहेबांना वणी (बेलखेड), चांदूरबाजार शहरात राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचे पुतळ्याजवळ, भक्तीधाम,शिराळा व अमरावती येथे श्री संत गाडगेबाबांच्या समाधी स्थळी , शेकडो नागरिकांनी शाश्रुनयनांनी श्रद्धांजली वाहिली.रविवारी मुर्तिजापूर येथील मोक्ष धाम येथे त्यांचा अंत्यविधी पार पाडला.

# आईचे दूध बाळाच्या निरोगी जीवनाचा पाया

## विदर्भ आयुर्वेद महाविद्यालयात स्तनपान सप्ताहाचे प्रभावी आयोजन

**अमरावती/का.प्र.**

बाळाच्या जन्मानंतर आईचे पहिले दूध हे केवळ अन्न नसून त्याच्या निरोगी आणि सुदृढ जीवनाचा भक्कम पाया आहे. मातृदूधामुळे बाळाची रोगप्रतिकारक शक्ती वाढण्यासोबतच त्याच्या शारीरिक व मानसिक विकासालाही मोठी मदत होते. त्यामुळे स्तनपानाचे महत्त्व समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन स्तनपान जनजागृती कार्यक्रमातील मान्यवरांनी केले.

जागतिक स्तनपान सप्ताहानिमित्त श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाद्वारा संचालित विदर्भ आयुर्वेद महाविद्यालयाच्या कौमारभृत्य विभाग आणि राष्ट्रीय सेवा योजना संघाच्या संयुक्त विद्यमाने स्तनपान जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. मंडळाच्या सचिव डॉ. माधुरी चेंडके यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम उत्साहात पार पडला. जागतिक आरोग्य संघटना आणि युनिसेफ यांच्या मार्गदर्शनाखाली दरवर्षी १ ते ७ ऑगस्टदरम्यान जागतिक स्तनपान सप्ताह साजरा केला जातो.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन आणि भगवान धन्वंतरी पूजनाने झाली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. संजय चोपकर होते.

विदर्भ आयुर्वेद महाविद्यालयाचे संचालक डॉ.



रविंद्र वाघमारे, कौमारभृत्य विभागप्रमुख डॉ. निलेश इंगळे, कायचिकित्सा विभागप्रमुख डॉ. वैशाली वानखेडे तसेच राष्ट्रीय सेवा योजना प्रभारी व शल्यतंत्र विभागप्रमुख डॉ. मंजुषा काळमेघ यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले.

यावेळी प्रमुख अतिथी म्हणून ह. व्या. प्र. मंडळाचे उपाध्यक्ष डॉ. जयंत पांढरीकर, इंडियन ॲकॅडमी ऑफ पेडियाट्रिक्स अमरावतीच्या अध्यक्षा डॉ. प्रतिभा काळे, सचिव डॉ. आदित्य टांक, सोसायटी अमरावतीच्या सचिव डॉ. सायली जहागीरदार तसेच ज्येष्ठ बालरोगतज्ज्ञ डॉ. सोनाली शिरभाते उपस्थित होत्या. कार्यक्रमादरम्यान विविध उपक्रमांमध्ये सहभागी विद्यार्थ्यांना प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते प्रशस्तीपत्रे आणि स्मृतिचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

या प्रसंगी महाविद्यालयातील शिक्षकवृंद डॉ. सुशीलकुमार यानपल्लेवार, डॉ. संदीप जाधव, डॉ. ज्योती डाखोरे, डॉ. प्रज्ञा शिंदे, डॉ. प्रणिता शिंदे, डॉ. क्रांतीकुमार आमले, डॉ. अतुल जैन, डॉ. देवेंद्र चौधरी, डॉ. सुखद चौधरी, डॉ. शिल्पा देशपांडे, डॉ. विलोभ भारतीय, डॉ. ज्योती कंकाळ, डॉ. पायल राठोड, डॉ. निहारिका कांबळे, डॉ. वैभव मांजरे, डॉ. पूनम कुंभारवाड, डॉ. किशोर बोधकर, डॉ. मंगेश पवार यांच्यासह महाविद्यालयातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी डॉ. मंजुषा काळमेघ यांनी उपस्थित मान्यवर, शिक्षकवृंद, विद्यार्थी आणि आयोजकांचे आभार मानले. स्तनपानाबाबत वैज्ञानिक दृष्टिकोन आणि जनजागृती निर्माण करण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये स्तनपानाविषयी वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित होण्यास मदत झाली. तसेच मातृ-शिशू आरोग्य संवर्धनाचा महत्त्वपूर्ण संदेश समाजापर्यंत पोहोचविण्यात कार्यक्रम यशस्वी ठरला.

## पोलिस पाटील महासंघाच्या मागण्यांवर सरकारने तीन महिन्यांत निर्णय घ्यावा

### महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाचे राज्य शासनाला निर्देश

**अमरावती/का.प्र.**

महाराष्ट्र राज्य पोलीस पाटील महासंघाने पोलीस पाटीलांच्या विविध प्रलंबित मागण्यांसंदर्भात दाखल केलेल्या मूळ अर्ज (ओ.ए.) क्र. ५०/२०२४ वर महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाने (ईंऊ) महत्त्वपूर्ण निर्देश दिले आहेत. महासंघाच्या मागण्यांचा उच्चस्तरीय समितीने सखोल विचार करून राज्य शासनाने पुढील तीन महिन्यांच्या कालावधीत योग्य तो अंतिम निर्णय घ्यावा, असे निर्देश न्यायाधिकरणाने दिले आहेत.

गृह विभागाच्या २० ऑगस्ट २०१९ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे पोलीस पाटील महासंघाच्या विविध मागण्यांचा विचार करण्यासाठी उच्चस्तरीय समिती स्थापन करण्यात आली होती. मात्र, या समितीकडे महासंघाच्या काही मागण्या अद्याप प्रलंबित असल्याचे सुनावणी दरम्यान न्यायाधिकरणाच्या निदर्शनास आणून देण्यात आले.

या प्रकरणात महाराष्ट्र राज्य पोलीस पाटील महासंघ व इतर अर्जदारांच्या वतीने ॲड.एम.व्ही. भोसले यांनी बाजू मांडली. तर राज्य शासनाच्या वतीने सादरकर्त्या अधिकारी के. एस. गायकवाड यांनी युक्तिवाद केला. अर्जदारांच्या वकिलांनी मुंबई उच्च न्यायालयाने रिट याचिका क्र. १६००६/२०२२ मध्ये ४ ऑक्टोबर २०२२ रोजी दिलेल्या आदेशाच्या पार्श्वभूमीवर महासंघाच्या मागण्यांवर निर्णय घेण्याची आवश्यकता असल्याचे न्यायाधिकरणाच्या निदर्शनास आणून दिले.

न्यायाधिकरणाने गृह विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिवांनी २५ नोव्हेंबर २०२४ रोजी दाखल केलेल्या उत्तर प्रतिज्ञापत्राचीही दखल घेतली. त्यामध्ये मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार गृह विभागाने १५ मार्च २०२४ रोजी शासन निर्णय काढून पोलीस पाटीलांचे मासिक मानधन ६,५०० रुपयांवरून १५,००० रुपये केल्याचे नमूद करण्यात आले होते. तसेच महासंघाने केलेल्या इतर मागण्यांवरही राज्य सरकार योग्य तो विचार करत असल्याचे शासनाच्या उत्तरात नमूद करण्यात आले होते. आता महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाच्या निर्देशामुळे पोलीस पाटीलांच्या विविध प्रलंबित मागण्यांवर शासनाकडून तीन महिन्यांत निर्णय होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. या निर्णयाचे राज्यातील पोलीस पाटील महासंघाच्या पदाधिकाऱ्यांकडून स्वागत करण्यात येत असून, शासनाने प्रलंबित मागण्यांवर सकारात्मक व तातडीने निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.


## डॉ.पंजाबराव देशमुख वैद्यकीय महाविद्यालयात दहावे किडनी प्रत्यारोपण

### आई ने दिले मुलाला नवजीवन

**अमरावती-** स्थानिक डॉ पंजाबराव देशमुख स्मृती वैद्यकीय महाविद्यालय अमरावती येथे आईने आपल्या पस्तीस वर्षीय मुलाला किडनी दान करून दिला पुनर्जन्म. व डॉ पंजाबराव देशमुख वैद्यकीय महाविद्यालयातील ही यशस्वी ङदहावीङ किडनी प्रत्यारोपण शस्त्रक्रिया ठरली.

सातूर्णा, साईनगर भागातील, अमरावती निवासी, मंगेश किसनराव नेरकर हा गेल्या पाच, सहा महिन्यापासून किडनी आजाराने त्रस्त होता. शहरातील डॉ निखिल बडनेरकर, नेप्रोलॉजिस्ट यांच्याकडे तो उपचार घेत असताना, त्याला डॉक्टरांनी किडनी प्रत्यारोपण हा यावरील प्रभावी उपचार सुचविला, यात मंगेश ची पासष्ट वर्षिय आई शोभा किसनराव नेरकर आपल्या मुलाला किडनी दान देण्यास तयार झाली.

श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख, महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ अनिल देशमुख, वैद्यकीय अधीक्षक डॉ पवन टेकाडे, डॉ सोमेश्वर निर्मळ यांच्या मार्गदर्शनाखाली यूरोलॉजिस्ट डॉ राहुल पोटोडे, डॉ राहुल घुले,डॉ प्रतीक चिरडे, डॉ आयुष हेडा, डॉ अक्षय बोराडे, नेफ्रॉलॉजिस्ट डॉ निखिल बडनेरकर, बधीरीकरण तज्ञ डॉ विजया पाटील, डॉ दिपाली गोटे, डॉ रोहित हातगावकर, डॉ ऐश्वर्या नायर, डॉ अंजली कोथळकर, डॉ कल्याणी तामगाडगे यांचा मोलाचा वाटा होता. चार-पाच तास चाललेली ही दहावी शस्त्रक्रिया यशस्वी पूर्ण झाली. रुग्ण व नातेवाईकांचे समुपदेशन, वैद्यकीय चाचण्या, पोलीस व्हेरिफिकेशन, कायदेशीर बाबीची पूर्तता व इतर कागदपत्राची पूर्तता करून प्राधिकरण समिती समोर सादर करणे व प्रत्यक्ष मुलाखती द्वारे शस्त्रक्रिये करीता मान्यता मिळवून घेणे या सर्व बाबी



ट्रान्सप्लांट कॉर्डिनेटर सतीश वडनेरकर यांनी यशस्वीरित्या पूर्ण केल्या. तसेच शस्त्रक्रिया पूर्व तयारीमध्ये रुग्णालय व्यवस्थापक डॉ श्रीकांत फुटाणे, ऋग्वेद देशमुख, मेट्रन चित्रा देशमुख, एम एस डब्ल्यू, अनिकेत माहोरे, सहाय्यक, आरती मोरांडे यांचे सहकार्य लाभले.

प्राधिकरण समिती अध्यक्ष डॉ अनिल देशमुख, डॉ पवन टेकाडे, डॉ मंगेश मेंढे, उपसंचालक, आरोग्य सेवा, अकोला प्रतिनिधी, डॉ अविनाश लव्हाळे सेवानिवृत्त उपसंचालक, आरोग्य सेवा, डॉ दिनेश वाघाडे, एनजीओ प्रतिनिधी, आयएमए अध्यक्ष, डॉ किशोर बनसोड, डॉ राम अवतार सोनी, डॉ शुभांगी वर्मा यांनी रुग्ण व नातेवाईक यांच्या सोबत प्रत्यक्ष मुलाखती द्वारे संवाद साधून व कागदपत्राची पडताळणी करून शस्त्रक्रिया करिता मान्यता दिली.

ही अत्यंत महागडी असलेली शस्त्रक्रिया शासनाच्या महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत मोफत करण्यात आली. तसेच शस्त्रक्रिया पूर्व देखील बऱ्याच चाचण्या रुग्णालय स्तरावरून मोफत करण्यात आल्यामुळे रुग्णाला बराच दिलासा मिळाला. नातेवाईकांनी शस्त्रक्रियाबाबत व मिळत असलेल्या सेवेबाबत समाधान व्यक्त केले. सध्या रुग्ण व डोनर किडनी आयसीयू मध्ये डॉक्टरांच्या देखरेखीखाली उपचार घेत असून प्रकृती स्थिर आहे. शस्त्रक्रिया दरम्यान व पश्चात परिचारिका संध्या वाघमारे, शितल अंबरते, राणी खेकडे,प्रियंका मैंद, सुमित्रा गाडगे, गंगा पाटील, मोहिनी गोहत्रे, आशिष बोकडे, वैभव नासरे, अरविंना जांभेकर, रोशन मेश्राम, दीप खांडेकर, दामिनी ढवळे, स्मिता वावरे, शशिकांत ढिवर, नेहा घोरमाडे, ममता चव्हाण, रूद्रायणी खंडारे, वनशिका परिमल, अनिता गोमकाळे यांनी जबाबदारी पार पाडली.गोपाल सावरकर, उमेश चव्हाण, उमेश सोनवणे, मंगेश गुडदे, दर्शना खडसे,संगिता ताबंट,मधुर भुयार, अशोक खुरकटे,गौरव पवार, सचिन हनुमंते यांनी सहायक म्हणून कर्तव्य पार पाडले. किडनी प्रत्यारोपण सारखी अत्यंत अवघड व जटिल शस्त्रक्रिया डॉ पंजाबराव देशमुख वैद्यकीय महाविद्यालयात यशस्वी पूर्ण झाल्याबद्दल संस्था अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख व पदाधिकारी यांनी सर्व डॉक्टरांचे, नर्सिंग स्टाफ तसेच महाविद्यालय व रुग्णालय प्रशासनाचे अभिनंदन केले आहे.

# बोजा चढला आता जप्ती आणि निलामी केव्हा?

## बोजा चढला आता जप्ती आणि निलामी केव्हा?

### -बँक खाती, शासकीय कंत्राटी देयके, उद्योग धंदे कारवाईतून वगळले

### -तहसीलदार यांच्याकडून दंडवसुलीत प्रशासकीय कसुरी ?

**ॲड. समीर ठाकूर**

**अकोला :** अकोट तालुक्यातील सातपुड्याच्या पायथ्याशी असलेल्या पोपटखेड गट ग्रामपंचायतीतील मौजे गाजीपूर येथील बहुचर्चित असलेल्या ४८ कोटी दंड वसुली प्रकरणी तहसीलदार यांच्याकडून जाणीवपूर्वक दिरंगाई होत असल्याचा आरोप आता जोर धरू लागला आहे. त्याचे कारणही गंभीर असून या दंड वसुली प्रक्रियेत चांडक यांच्या मालमत्तांवर बोजा चढविण्या पलीकडे ही कारवाई सरकली नसल्याचे दिसून येत आहे. तर दुसरीकडे चांडक यांची बँक खाती, सुरू असलेले उद्योग धंदे, कंत्राटी देयके यांच्या पर्यंत अद्यापही वसुली यंत्रणा प्रमुख असलेल्या तहसीलदार यांचा हात पोहोचत नसल्याने नानाविध प्रकारचे प्रश्न उपस्थित होत आहे.




याबाबत सविस्तर वृत्त असे की, ३० जानेवारी २०२४ रोजी जमिनमालक विलास कालू चिमोटे आणि भाडेपट्टाधारक संतोष चांडक यांना गौण खनिजाचे अतिरिक्त उत्खनन केल्याप्रकरणी ४८ कोटी रुपयांचा दंड ठोठावण्यात आला होता. त्याच वर्षी तहसीलदार यांच्याकडून दंडग्रस्त असलेले चिमोटे यांच्या गट नंबर २७ आणि ३८ वर दंडाचा रक्कमेचा बोजा चढविला होता. सदर प्रकरणी दंडग्रस्त चांडक यांनी उच्च न्यायालय नागपूर खंडपीठात धाव घेतली होती. मात्र न्यायालयाने दंडग्रस्त चांडक यांना ९ ऑक्टोबर २०२५ रोजी महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ कलम २४७ अनुसार अपिलीय अधिकारी यांच्याकडे चार आठवड्याच्या आत अपील याचिका दाखल करण्याचे आदेश देण्यात आले होते, तर अपील दाखल केल्यापासून आठ आठवड्याच्या आता त्यावर निर्णय देण्याचे सुद्धा आदेशात नमूद होते, दुसरीकडे त्याचवेळी दहा आठवड्याचे कालावधीचे अंतरिम संरक्षण सुद्धा देण्यात आले होते. या तिन्ही मुदती संपल्या तरी मात्र ना चांडक यांनी अपील याचिका दाखल केली ना तहसीलदार यांचा दंड वसुलीचा मुहूर्त निघाला. केवळ कागदी घोडे नाचवत दंड वसुलीचा आव मात्र महसूल यंत्रणेच्या वतीने करण्यात आला. याच कालावधीत अकोट एसडीओ यांनी 'आरआरसी' पाओपन करीत दंड वसुली करण्याबाबत दोन वेळा पत्र लिहून तहसीलदार यांना आदेशित केले मात्र त्यानंतर १५ दिवसांच्या विचार विमर्श करीत तहसीलदार यांच्याकडून चांडक यांना दंड वसुलीबाबत नोटीस बजावण्यात आली. याच कालावधीत उच्च न्यायालयाने दिलेली मुदत ओलांडून चार महिने आटोपले एन मग चांडक यांनी अपील याचिका दाखल केली, वास्तविकतेत सदर अपील याचिका त्याच वेळी अकोट एसडीओ यांनी फेटाळून लावणे अपेक्षित होते, मात्र तसे झाले नाही. तर दुसरीकडे उच्च न्यायालयाने सदर प्रकरणी आठ आठवड्याच्या आत गुणवत्तेनुसार निर्णय देण्याचे निर्देशित केल्यानंतरही सदर अपील याचिकेवर तब्बल साडे तीन महिने सुनावण्या चालल्या तद्नंतर मोठा गाजावाजा करीत अपील याचिका फेटाळण्यात आली, आणि तहसीलदार यांनी दिलेला दंड कायम करण्यात आला.

या कालावधीत दंड वसुलीवर कोणत्याही प्रकाराची स्थगिती देण्यात आली नव्हती तरी मात्र तहसीलदार यांच्याकडून मोठा हात आखडता घेत ही दंड वसुलीची प्रक्रिया पार पाडण्यात आली, यामध्ये सुरुवातीला मालमत्ता शोधत आहे, सापडत नाही असा देखावा उभारणाऱ्या तहसीलदार यांना मात्र वृत्तपत्रात मालमत्तांची यादी प्रकाशित होताच मालमत्ता आढळून आल्या, मग घाई गडबडीत बोजा चढविण्यात आला. त्यामध्येही सिलेक्टिव्ह मोड वापरण्यात आला, त्याबाबत आणखीन वृत्त प्रकाशित होताच मग उर्वरित मालमत्तांवर बोजा चढविण्यात आला, मात्र यापुढे असलेली जप्ती आणि लिलाव याबाबत कारवाई पुढे सरकलीच नाही. परिणामी तहसीलदार आणि त्यांचे अधिनस्त असलेले अधिकारी यामध्ये जाणीवपूर्वक दिरंगाई करीत असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

दुसरीकडे चांडक यांची सुरू असलेली उद्योग धंदे, शासकीय कंत्राट यांमुळे त्यांची दैनंदिन कमाई सुरूच असल्याचे बोलले जात आहे. दंड वसुलीच्या प्रक्रियेत व्यापक अधिकार असताना सुद्धा तहसीलदार यांनी चांडक यांचे उद्योग धंदे सील का केले नाहीत ? की त्यासाठी कोणत्या मोठ्या कायदेतज्ज्ञाचा सल्ला तहसीलदार घेत आहे ? असा यक्ष प्रश्न यानिमित्ताने उपस्थित होत आहे. शासकीय कंत्राटदार असलेल्या चांडक यांची प्रधानमंत्री ग्राम सडक योजना, सार्वजनिक बांधकाम विभाग आणि जागतिक बँक प्रकल्प नाबार्ड या शासकीय कार्यालयात कोट्यावधी रुपयांची कंत्राटी शासकीय देयके आणि सुरक्षा ठेव प्रलंबित आहेत, ती सुद्धा महाराष्ट्र जमीन 'महसूल अधिनियम १९६६ चे कलम १७६ नुसार' एक पत्र देऊन दंडाच्या रक्कमेत समायोजित तहसीलदार करू शकतात मात्र तसेही तहसीलदार यांनी केले नाही, एकप्रकारे चांडक यांना ती देयके उचलण्याची मुभाच तहसीलदार यांच्याकडून देण्यात आली असल्याचा आरोप होत आहे. याच प्रकारे चांडक यांच्या बँक खाती गोठवून दंड वसुलीचे सुद्धा अधिकार तहसीलदार यांना आहे, मात्र तेही तहसीलदार यांनी केले नसल्याने तहसीलदार यांना चांडक यांच्या दंड वसुलीप्रकरणात जणुकाही स्वतःच्या अधिकारांचाच विसर पडला असल्याचे दिसून येत आहे. परिणामी यानिमित्ताने तहसीलदार यांची दंड वसुलीची इच्छा शक्ती किती कमकुवत आहे याचाही प्रत्यय सुरू असलेल्या या प्रक्रियेवरून दिसून येत आहे.

### चांडक यांच्यासाठी MLRC ॲक्ट कलम ३६ (अ) चा पडला विसर-

या दंडाच्या प्रकरणा पलीकडे आणखीन महत्वाची बाब आहे, ती म्हणजे चांडक यांचे गाजीपूर परिसरातील आदिवासी जमिनींवर पसरलेले उद्योगसाम्राज्य. चांडक यांच्या मालकीची दोन स्टोन क्रशर आणि एक डांबर हॉट मिक्स प्लांट हे आदिवासी बांधवांच्या जमिनीवर उभारण्यात आली आहे. शासनाची कोणत्याही प्रकाराची परवानगी यासाठी घेण्यात आली नाही, केवळ ९९ वर्षांच्या दीर्घ कालावधीसाठी नोंदणीकृत भाडेपट्टा, दुसरीकडे बाँड वर भाडेपट्टा आणि करारनामा करून ही उद्योग साम्राज्य उभारली आहे. MLRC ॲक्ट कलम ३६ ( अ) नुसार ही कृती बेकायदेशीर असून यामध्ये कडक कायदेशीर कारवाईचे प्रावधान आहे. याची संपूर्ण माहिती अकोट तहसीलदार, एसडीओ यांना आहे तरी मात्र चांडक यांच्या या बेकायदेशीर उद्योगांवर या दोन्ही उच्च पदस्थ आणि जबाबदार अधिकाऱ्यांची वक्रदृष्टी पडत नसल्याने अनेक प्रश्न उपस्थित होत आहे. परिणामी कायद्याच्या थेट भंग करून सुरू असलेल्या या उद्योगातील होणाऱ्या कमाईतून काही वाटा महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांना तर जात नाही ना ? असा यक्ष प्रश्न यानिमित्ताने सुज्ञ नागरिक विचारत आहेत.

---

परवानगी न घेता शाळेच्या आवारातच

# नालीचे अनधिकृत बांधकाम

### -नगर परिषदेचा मनमानी कारभार

### सांडपाण्याच्या निचऱ्यासाठी जिल्हा परिषद शाळेच्या आवाराचा उपयोग



**खल्लार/प्रतिनिधीः-** दर्यापूर शहरातील साईनगर परिसरातील सांडपाण्याचा निचरा करण्यासाठी नगर परिषदेकडून थेट जिल्हा परिषद शाळेच्या आवारातून सिमेंट कॉंक्रीट नालीचे बांधकाम करण्यात आल्याचा प्रकार समोर आला आहे. विशेष म्हणजे, या कामासाठी शिक्षण विभागाची कोणतीही पूर्वपरवानगी घेण्यात आलेली नसल्याचा दावा संबंधित अधिकाऱ्यांनी केला आहे.

याबाबत गटशिक्षण अधिकारी तसेच संबंधित जिल्हा परिषद शाळेच्या मुख्याध्यापकांशी संपर्क साधला असता, 'या कामासाठी आमच्याकडून कोणत्याही प्रकारची परवानगी घेण्यात आलेली नाही. तसेच कोणताही पत्रव्यवहारही प्राप्त झालेला नाही,' असे त्यांनी स्पष्ट केले.

स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, सांडपाण्याचा निचरा सरळ मार्गाने करता आला असता मात्र त्या ठिकाणी असलेल्या पिंपळाच्या झाडामुळे तो मार्ग टाळण्यात आला. त्याऐवजी ☞(पान २ वर)

■ सदर बांधकामाबाबत आमच्याकडे कोणत्याही विभागाकडून कोणतेही पत्र प्राप्त झालेले नाही. तसेच या कामासंदर्भात आमच्याशी कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार करण्यात आला नाही. त्यामुळे या प्रकरणाची आम्हाला कोणतीही माहिती नाही. संबंधित विभागाने शाळा प्रशासनाची पूर्वपरवानगी किंवा लेखी सूचना घेतलेली नाही.

**-नागोराव कुऱ्हाडे,** मुख्याध्यापक, जिल्हा परिषद शाळा, साईनगर, दर्यापूर

---

# एसी कॉम्प्रेसरचे काम करताना सिलेंडरचा स्फोट

### -इलेक्ट्रिशिन गंभीर जखमी, पाय निकामी




**अचलपूर/प्रतिनिधीः-** परतवाडा शहरातील गजबजलेल्या टिळक चौक परिसरात एक अत्यंत भीषण अपघात घडला. एसी कॉम्प्रेसर दुरुस्तीचे काम करत असताना अचानक गॅस सिलेंडरचा जोरदार स्फोट झाला. या दुर्घटनेत इलेक्ट्रिशियनचे काम करणारे प्रवीण डवले हे गंभीर जखमी झाले आहेत. स्फोटाच्या तीव्रतेमुळे त्यांचा एक पाय तुटून वेगळा झाला असून चेहऱ्यालाही गंभीर दुखापत झाली आहे. घटनेनंतर परिसरात एकच खळबळ ☞(पान २ वर)

---

# अमरावती ते धामक बससेवा सुरू करा

### भाजप पदाधिकाऱ्यांचे आमदार प्रताप अडसड यांना निवेदन



**नांदगाव खंडेश्वर / प्रतिनिधीः-** अमरावती ते धामक मार्गावर नियमित बससेवा सुरू करण्यात यावी, या मागणीसाठी भाजप पदाधिकाऱ्यांनी आमदार प्रताप अडसड यांची भेट घेऊन निवेदन सादर केले. या मागणीची तातडीने दखल घेत आमदार अडसड यांनी अमरावती आगार व्यवस्थापकांना तत्काळ कार्यवाही करण्याचे आदेश दिले.

धामक तसेच परिसरातील विद्यार्थी, शेतकरी, व्यापारी आणि नागरिकांना अमरावती शहराशी ये-जा करण्यासाठी सध्या मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. ☞(पान २ वर)

---

# अचलपूर तालुक्यात स्कूल बसमधील विद्यार्थी सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर!

## विद्यार्थ्यांचा सुरक्षेसाठी महिला मदतनीसाची बसमध्ये नियुक्ती कधी?

**अचलपूर/प्रतिनिधीः-** अमरावती जिल्ह्यात मोर्शी तालुक्यातील रिद्धपूर येथे एका शाळेची स्कूल बस मागे घेत असताना त्या बस मधून खाली उतरलेल्या ६ वर्षीय विद्यार्थिनीचा बसच्या समोरील टायरमुळे दुर्दैवी मृत्यू झाला. या घटनेने सर्वत्र शोककळा पसरली आहे. मात्र अचलपूर तालुक्यातही भविष्यात अशा घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही.

अचलपूर तालुक्यातील शहरी व ग्रामीण भागातून जुळ्या शहरातील अनेक खाजगी शाळांमध्ये शिक्षण घेण्यासाठी विद्यार्थी मोठ्या संख्येने संबंधित स्कूल बस मधून दररोज ये - जा करतात. मात्र या सर्व खाजगी स्कूल बस मध्ये महिला



मदतनीसची विद्यार्थ्यांच्या सुरक्षेच्या दृष्टीने बस मध्ये प्रवेश आणि परत घरी जात असताना विद्यार्थ्यांना सुखरूप बस मधून उतरविण्यासाठी नियुक्ती केली आहे क? हा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.सोबतच अचलपूर तालुक्यातील खाजगी स्कूल बस ची कागदपत्रे,त्या बस मध्ये सीसीटीव्ही कॅमेरे,अग्निशमन यंत्र आणि प्राथमिक आरोग्य पेटी उपलब्ध आहे का? याची तपासणी कधी होणार? असे अनेक प्रश्न निर्माण झाले आहे.यावर अचलपूर पंचायत समिती शिक्षण विभाग आणि स्वतंत्र ☞(पान २ वर)

■ तालुक्यातील शाळा सुरू होण्यापूर्वी सर्व खाजगी शाळेतील स्कूल बस वाहनचालकांची बैठक संपन्न झाली होती. कागदपत्र ,विद्यार्थ्यांचा सुरक्षेचा दृष्टीने ठोस उपाययोजना राबविणे ,मदतनीस नियुक्ती आदी सूचनांचे पालन करण्याचे निर्देश देण्यात आले होते.यापुढे ही नियमाचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई केली जाणार आहे.

**-विजय गराड,** प्रभारी निरीक्षक,स्वतंत्र वाहतूक नियंत्रण शाखा,अचलपूर .

■ अचलपूर तालुक्यातील सर्व शाळा व्यवस्थापनांना विद्यार्थ्यांच्या सुरक्षेच्या दृष्टीने शाळा सुरू होण्यापूर्वीच संबंधित विस्तार अधिकारी आणि केंद्र प्रमुख यांनी स्कूल बसबाबत सर्व सूचना दिल्या होत्या. त्याची अंमलबजावणी न करणाऱ्यावर कारवाई केली जाणार आहे. मोर्शी तालुक्यात घडलेल्या दुर्दैवी घटनेची पुनरावृत्ती तालुक्यात होऊ नये यासाठी विद्यार्थ्यांच्या सुरक्षेच्या दृष्टीने ठोस निर्णय घेतले जाणार आहे. **-नंदकिशोर खरात,** गटशिक्षणाधिकारी ,अचलपूर पंचायत समिती.

---

# रेतीची चोरी करताना ट्रॅक्टरसह दोघे जेरबंद

### बहीरम-बैतूल मार्गावर शिरजगाव पोलिसांची कारवाई

**अमरावती/प्रतिनिधीः-** शासनाच्या मालकीच्या गौण खनिजाची परवानगीविना उत्खनन करून रेतीची चोरी करणाऱ्या दोघांना शिरजगाव कसबा पोलिसांनी रंगेहात पकडले. बहीरम ते बैतूल मार्गावर केलेल्या कारवाईत ट्रॅक्टर, ट्रॉली आणि एक ब्रास रेती असा एकूण ३ लाख ६४ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ८ ऑगस्ट रोजी पहाटे ५.१५ ते सकाळी ६.१५ वाजेच्या दरम्यान ग्राम बहीरम ते बैतूल रोडवर दक्षिणेकडे सुमारे १० किलोमीटर अंतरावर पोलिसांची गस्त सुरू होती. यावेळी शासनाच्या मालकीच्या गौण खनिजाची परवानगीविना वाहतूक व चोरी केली जात असल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी कारवाई केली. या कारवाईत फार्मट्रॅक कंपनीचा एमएच २७ ईसी ४०९३ क्रमांकाचा ट्रॅक्टर, किंमत सुमारे ३ लाख रुपये, हिरव्या रंगाची एमएच यू ३०९७ क्रमांकाची ट्रॉली, किंमत ६० हजार रुपये आणि त्यामध्ये भरलेली एक ब्रास रेती, किंमत ४ हजार रुपये, असा एकूण ३ लाख ६४ हजार रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला.

याप्रकरणी ट्रॅक्टर चालक रमेश फगन धुर्वे (वय ३०) आणि ट्रॅक्टर मालक मंजू सद्दू राजने (वय ४५), दोघेही रा. खोमई, ता. भैसदेही, जि. बैतूल (मध्य प्रदेश) यांना अटक करण्यात आली. दोन्ही आरोपींविरुद्ध यापूर्वी कोणताही गुन्हा दाखल नसल्याची माहिती पोलिसांनी दिली.

पोहेकॉ रवी बहादुरे यांच्या फिर्यादीवरून शिरजगाव कसबा पोलिसांनी भा.न्या.सं. कलम ३०३(२), ३(५), पर्यावरण संरक्षण अधिनियमातील कलम ९, १५, सार्वजनिक संपत्ती नुकसान प्रतिबंधक अधिनियम कलम ३, ७ तसेच मोटार वाहन कायद्यातील कलम १९४ अन्वये गुन्हा दाखल केला आहे. अटक करण्यात आलेल्या दोन्ही आरोपींना ८ ऑगस्ट रोजी दुपारी १ वाजता न्यायालयात हजर करण्यात आले. पुढील तपास शिरजगाव कसबा पोलिस करीत आहेत.

---

# सोलर प्लांटची केबल कापून चोरी

### २.३० लाखांचा फटका



**चांदूर रेल्वे/प्रतिनिधीः-** सोलर प्लांटमध्ये वापरण्यात येणाऱ्या महत्त्वाच्या केबल वायर कापून अज्ञात चोरट्यांनी तब्बल २ लाख ३० हजार रुपयांचा ऐवज लंपास केला. सोनगाव शिवारातील माधव इन्फ्रा प्रोजेक्ट लिमिटेडच्या सोलर प्लांटमध्ये ७ ऑगस्टच्या रात्रीपासून ८ ऑगस्टच्या सकाळपर्यंत ही चोरी झाल्याचे समोर आले.

सोनगाव येथील सर्व्हे क्रमांक ३४५७ मध्ये कंपनीचा सोलर प्लांट आहे. कंपनीचे इलेक्ट्रिकल इंजिनिअर सहदेवराम रामाराम चौधरी (वय ३६) हे नेहमीप्रमाणे कंपनीच्या कामानिमित्त ये-जा करीत होते. दरम्यान, प्लांटच्या सुरक्षेसाठी कार्यरत असलेल्या चौकीदारांनी सकाळी चोरी झाल्याचे निदर्शनास आणून दिले.

७ ऑगस्ट रोजी रात्री ८ ते ८ ऑगस्ट रोजी सकाळी ६ या वेळेत चोरट्यांनी प्लांटमधील सोलर प्लेटला जोडलेल्या केबलवर हात साफ केला. लाल रंगाची ४ एमएम केबल तब्बल २२.७५ किलोमीटर, तर काळ्या रंगाची ४ एमएम केबल २२.१८५ किलोमीटर अशी एकूण सुमारे ४४.९३ किलोमीटर केबल वायर चोरीला गेली. या केबलची किंमत सुमारे १ लाख ५० हजार रुपये आहे.

याशिवाय सुमारे १ हजार मीटर डीसी केबल वायर तसेच २५ जोड, म्हणजेच ५० नग केबल हार्नेस वायर असा सुमारे ८० हजार रुपयांचा ऐवजही चोरट्यांनी लंपास केला. त्यामुळे चोरी गेलेल्या साहित्याची एकूण किंमत २ लाख ☞(पान २ वर)

